।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री कृष्ण नवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

## ।। पहिला अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रथम नमुनी तुज गणराया। घेतली लेखणी लिहावया। देऊनी स्फुर्ती हे गणनाथा। करावे मज लिहविता।।१।। विघ्नविनाशक हे गजानन। स्वामी आज्ञे करी मी लेखन। करावे निर्विघ्न मम कार्य पूर्ण। विनंती माझी तव चरणी।।२।। आता नमितो देवी सरस्वती। चारही वाणींची जी स्वामिनी। यावी तवकृपे परावाणी वैखरी। वरदहस्त तुझा ठेवावा शिरी।।३।। तवकृपे स्फुरती शब्दरत्ने मनी। प्रतिभेचे मज वरदान लाभुनी। श्याम सुंदराचे वर्णन करुनी। होईल धन्य माझी लेखणी।।४।। श्रीकृष्णचरणी करीतो वंदन। करण्या तुझेची चरित्र वर्णन। द्यावे या गणेशास वरदान। व्हावी पूर्ण ही कृष्ण नवशती।।५।। जय जय श्री स्वामी समर्थ। तुमचे चरणी ठेवूनी माथा। करीतो वंदन मी स्वामीराया। करीकृपा या लक्ष्मणसिंधुसुतावरी।।६।। श्रीकृष्ण चरित असे सुमधुर। शब्दही तैसेची असावेत सुकोमल। दरवळावा शब्दाशब्दातून परीमळ। अलौकिक दिव्य या चरित्राचा।।७।। तुमची

कृपा हेच मम निधान। तुमचे वरदान अमूल्य धन। तुमच्याच आज्ञे घेतली आण। करवावी पूर्ण मजकडूनी।।८।। आता वंदितो मातापित्यांसी। त्यांचीच थोर पुण्याई ऐशी। लाभले भाग्य या वैद्य गणेशासी। श्रीकृष्ण लीला वर्णन करण्याचे।।९।। साष्टांगे नमितो त्यांचे चरणी। आशीर्वच त्यांचे देवूनी त्यांनी। करावे धन्य तुम्ही मजलागुनी। होईल कृतार्थ तुमचा सुत।।१०।। ठावे असे श्रोते हो आपणासी। असुरप्रभाव माजला भूवरती। झाली होती त्रस्त धरणीदेवी। असुरांचे अत्याचार साहुनी।।११।। केले धरणीने गोरुप धारण। धर्माची ही अवस्था होती विकल। गेले ते उभय ब्रह्मदेवा शरण। म्हणती करावे रक्षण आमुचे।।१२।। तयांच्या समवेत गेले देव। इंद्र आणि ऋषींचाही समुदाय। सर्वही विनविती ब्रह्मालागून। म्हणती शरण आम्ही तुम्हास।।१३।। ब्रह्मदेवे मनी केला विचार। जावे पित्याकडे क्षीरसागरावर। असे तो एकची तारणहार। निवारील तो दुःख सर्वांचे।।१४।। आले ब्रह्मदेव सकलांसमवेत। क्षीरसागरामध्ये होते एक बेट। रत्नभूषणे श्रीवत्सचिन्ह भूषित। होते पहुडले विष्णु शेषासनावर।।१५।। दिव्य तेजस्वी रत्ने विभूषित। शंख, चक्र, गदा, पद्म, युक्त। नितांत सुंदर, सोज्वळ शांत। परम सुंदर रुप श्रीहरीचे।।१६।। तेजोरुप परमात्म्याचे रुप प्रत्यक्ष। पाहुनी सकल झाले हर्षित। करुनी त्यास साष्टांग नमन। करती श्रीहरीचा जयजयकार।।१७।। केली सप्रेम

त्यांनी हरीस्तुती। भगवान विष्णूचे पराक्रम वर्णिती। अवतारलीलांचे वर्णन ते करती। करती ते भगवंताचा गौरव।।१८।। ऐकून त्यांची भक्तियुक्त स्तुती। प्रसन्न श्रीहरी झाले चित्ती। पाहुनी स्मीत तयाचे मुखावरती। करती सकल स्वदुःखवर्णन।।१९।। कंस, चाणूर, कालयवन, जरासंध। महाबलाढय हे सकल असुर। पृथ्वीवर माजविला हलकल्लोळ। असंख्य ते त्यांचे हिंसाचार।।२०।। पीडीती ते गोब्राह्मण सज्जनांस। गांजिती ते संत, मुनी, सकलांस। केले आम्हास असहाय व्यथित। असे आमुचे दुःख वर्णनातीत।।२१।। ते सकल म्हणाले श्रीहरींस। आपण भक्ताभिमानी पतित पावन। संकटत्राता, रक्षणकर्ता एकमात्र। विश्वनियंता तू आमुचा आधार।।२२।। करीतो आम्ही आर्त होऊन धावा। महाप्रभू तूच आधार द्यावा। घेऊनी धाव आम्हास वाचवा। अनन्यभावे शरण तुम्हासी।।२३।। झाली क्षीरसागरातून आकाशवाणी। नको चिंता, भिऊ नका तुम्ही। तुम्हास्तव भूवर अवतार घेऊनी। करीन नाश मी दुष्टांचा।।२४।। घेईन वसुदेवदेवकी उदरी जन्म। घेईन मी पृथ्वीवर अवतार। यादवकुळात घेऊनी जन्म। करीन संहार मी दुष्टांचा।।२५।। त्यावेळी देवांनी व्हावे यादव। उपदेवता सारे होतील गोपाळ। व्हावे सकल मुनींनी गोवत्स। करावे सर्वांनी मज सहाय्य।।२६।। यम वायु आणि इंद्र। तैसेची दोघेही अश्विनीकुमार। व्हावे या साऱ्यांनी पांडव - पंडुपुत्र। बृहस्पती होतील द्रोणाचार्य।।२७।। अग्नि

धृष्टद्युम्न पार्वती द्रौपदी। लक्ष्मी भीमककन्या रुक्मिणी। येईल शेष बलराम होऊनी। ऐसे सर्व माझे सहाय्यक।।२८।। आता आपण निश्चिंत होवोनी। जावे सर्वांनी आपपुले स्थानी। करावे कार्य तुम्ही तेथे जावोनी। करावी व्यवस्था तेणे रीती।।२९।। यादवकुळी एक पुत्रा शूरसेनास। नाव तयाचे होते वासुदेव। याचेच उदरी विष्णूचा अवतार। होणार होते देवांस ठाऊक।।३०।। आनक व दुंदुभी मंगल ध्वनी। आनंदे मग केला देवांनी। पुत्राचे नाव झाले आनकदुंदुभी। तोच कृष्णपिता वसुदेव होय।।३१।। वसुदेवाचा विवाह कंसभगिनीसर्व। जाहल्या होता अतिशय मोद। निघाली वरात वाद्य निनादा मधे। रथसारथी बंधु कंसच होता।।३२।। अरे कंसा, व्हावे तू सावध। याच देवकीचा आठवा पुत्र। करील रे तोच तुझा वध। होईल तुझा काळ तो पुत्र।।३३।। ऐशी आकाशवाणी तितुक्यात। ऐकून कंस जाहला संतप्त। पडले आनंदावर मोठे विरजण। जाहले सर्व लोक स्तब्ध।।३४।। कंस मारु पाही देवकीस। वसुदेवाने अडवले तयास। पातक स्त्रीहत्त्येचे करु नकोस। तिचे पुत्र करीन तुज स्वाधीन।।३५।। साखळदंडांनी जखडले तयांस। घातले दोघांना बंदीवासात। सुरु झाला असा कारागृहातच। संसार बिचाऱ्या वसुदेव देवकीचा।।३६।। जाहला यथावकाश देवकीस प्रथम पुत्र। सुंदर, गुटगुटीत आणि गोंडस। वसुदेवाने नेऊन सोपविला कंसास। कंसामनी जागृत झाला स्नेहभाव।।३७।। म्हणाला तेंव्हा कंस वसुदेवास। जा

परत घेऊन या बालकास। माझा वैरी तुझा आठवा पुत्र। मग याला तरी मी कश्यास मारु।।३८।। आनंदे घेतले हाती बालकास। वसुदेवाने आणुन दिला देवकीस। झाले ते उभयही बहु मुदीत। मानीले आभार त्यांनी देवाचे।।३९।। परी होते विचित्र विधिलिखित। तेंव्हाच नारद आले राजसभेत। ऐकून तेथील सर्व हकिकत। म्हणती 'तू चुकलास' ऐसे कंसास।।४०।। मुनी म्हणती देवांची भाषा अद्‌भूत। न कळे कोणा त्याचा अर्थ। आठवा कोणता हाच असे संभ्रम। म्हणून पुत्रास जीवंत सोडू नकोस।।४१।। बदलला कंसाने आपुला विचार। आला वेगे कंस बंदीगृहात। घेतले ओढून नवजात बालकास। टाकीले मारुन त्यास क्षणात।।४२।। होता झाला कंस अति बेफाम। ऐसेची मारीले त्याने सहा बालक। वसुदेव देवकी होते असहाय्य। नव्हता पारावर त्यांचे दुःखास।।४३।। आता विष्णूने केला निर्धार। घेईन भूवर मी आता अवतार। म्हणाला तो मग शेषास। शेष देई परी विष्णूस नकार।।४४।। म्हणे मी मागील अवतारात। असे सोसला भरपूर त्रास। घडला मज चौदा उपवास। आता तुम्हासवे मी नाही येणार।।४५।। विष्णू मग वदला त्या शेषास। अरे तुजविना मज नच करमत। एकलाची मी कैसा जाऊ भूवर। चल रे सख्या मजसवे चल।।४६।। या अवतारात होईन मी सान। होशील तू मोठा बंधू बलराम। तुझी सर्व आज्ञा मी पाळीन। करीन बघ मी तुझी सेवा।।४७।। रहावे तुझ्या अंशे देवकी गर्भात। पाठवीन मी योगमायेस। ती

देवकी गर्भातून तुज काढून। ठेवील गोकुळी रोहीणीचे गर्भात।।४८।। ती ही घेईल अवतार यशोदेचे पोटी। आठवा पुत्र मी देवकीचे उदरी। जन्मताच वसुदेव नंदाचे घरी। ठेवूनी मज नेईल त्या कन्येस।।४९।। गोकुळात आपण एकत्र खेळू। विविध लीलांनी भक्तांस सुखवू। गाई राखतानाच दैत्यसंहार करु। ऐकून शेष जाहला हर्षित।।५०।। सातव्यांदा देवकी जाहली गर्भिण। गर्भाचा प्रकाश पडे कारागृहात। देवकीचे डोहाळे होते वेगळेच। झाला वसुदेव ते ऐकून चकीत।।५१।। सुरु झाला देवकीस सप्तम मास। झाली योगमाया कारागृही प्रकट। घेतला काढून देवकीचा गर्भ। नेऊनी स्थापिला रोहीणीचे उदरात।।५२।। जागी होता रोहीणी चिंताग्रस्त। होती ती सात महिन्यांची गरोदर। नंद यशोदाही गेले गोंधळून। जाहली तेंव्हाच आकाशवाणी।।५३।। रोहीणी, तू नको करु चिंता। हा गर्भ आहे वसुदेवाचा। प्रत्यक्ष शेष असे उदरी तुझ्या। करील नाश तो दैत्यांचा।।५४।। सरता नऊ महीने झाली प्रसूत। जाहला तिज पुत्र तेजस्वी गोंडस। बलीभद्र, बलराम ठेवले नाम। तेंव्हाच यशोदाही झाली गरोदर।।५५।। इकडे घाबरली देवकी कारागृहात। नाहीसा झाला गर्भ पोटात। म्हणे वसुदेव नाही काही कळत। असे ही ईश्वराची लीला अगाध।।५६।। आठव्या वेळी देवकी झाली गर्भिण। कळले कंसाला हे वृत्त। म्हणे राहावे सर्वांनी खबरदार। ठेवा नजर देवकीवसुदेवावर।।५७।। नारायणाने गर्भात केला प्रवेश। जाहले देवकीस अभूत तेज प्राप्त।

जाहली देवकी पूर्णतः निश्चिंत। राहत होती सदा ती आनंदात।।५८।। एकदा तिजसी म्हणे वसुदेव। करणार कंस याचाही घात। देवकी म्हणे गर्जुन जोरात। मारीन ठार मी त्या कंसास।।५९।। करीन मी दैत्यांचा संहार। घेईन मी माझ्या भक्तांचा कैवार। असे मी सनातन ब्रह्म सर्वेश्वर। मी तर प्रलय कालाचा शासक।।६०।। ऐकून देवांनी केला प्रचंड निनाद। ब्रह्मदेवासह आले बंदी शाळेत। देवकीस प्रदक्षिणापूर्वक नमस्कार। नारायण स्तुती करुन झाले अंतर्धान।।६१।। नेहमी चौकशी करीतसे कंस। खात्रीसाठी येई तिला पाहण्यास। न्याहाळता त्याने तेंव्हा देवकीस। दिसली विष्णूची मूर्ती चतुर्भुज।।६२।। वळायची बोबडी तिला पाहताच। घाबरुन परते ओरडत किंचाळत। देवकीच्या पुत्राने लावले वेड मात्र। चिडून करीतसे तो संतापव्यक्त।।६३।। आले देवकीचे दिवस भरत। श्रावण वद्य अष्टमी मध्यरात्रीस। बुधवारी शुभ रोहिणी नक्षत्रावर। होता पाऊस धो धो कोसळत।।६४।। अष्ट वर्षीय बालकाच्या गोडरुपात। देवकीसमोर झाला विष्णू प्रकट। कारागृहात पडला अद्भूत प्रकाश। उजळल्या तेजाने दाही दिशा।।६५।। आकाशात देवांनी केली गर्दी। केली आनंदाने त्यांनी पुष्पवृष्टी। जाहला प्रचंड निनाद दुंदुभी। जाहली प्रसन्न मनी देवकी।।६६।। केली तिने विष्णूस विनंती। म्हणावे मम पुत्र तुज श्रीहरी। ऐशी कृपा करावी मजवरती। एवढी माझी हौस पुरवावी।।६७।। म्हणे श्रीहरी होतो तुझा पुत्र। परी त्वरीत मज गोकुळी

पाठव। शेष माझा मोठा भाऊ बलराम। कालांतराने येऊ तुमचे भेटीस।।६८।। जाहला तो शिशु क्षणार्धात। जन्मता तो विसरली देवकी सर्व। पसरले त्याचे तेज बंदीशाळेत। म्हणे देवकी याला लपवावे तुम्ही।।६९।। ''घाबरु नका गोकुळी न्या यास''। ''कसे न्यावे'' विचारी वसुदेव। पाहीले वसुदेवाने नवजात शिशुस। पायातील बेडी तुटली क्षणात।।७०।। ठेवीले वसुदेवाने बाळ परडीत। आपला शेला पांघरला तयास। डोळे भरुन देवकी पाही बाळास। निघाला वसुदेव बाळास घेऊन।।७१।। कैदी खान्याची द्वारे उघडली आपोआप। पहारेकरी सारे गेले झोपून। यमुनेच्या दिशेने निघाला वसुदेव। शेषाने भगवंतावर फणा उभारीला।।७२।। यमुनेचे पाणी होते उसळत। भगवंत चरणस्पर्शास यमुना उतावीळ। आले पाणी वसुदेवाच्या गळयापर्यंत। ओळखले भगवंताने तिचे मनोगत।।७३।। भगवंताने आपला उजवा पाय। काढला हळूच परडीतून बाहेर। होता यमुनेस हरीचरणाचा स्पर्श। दिली तिने वसुदेवास वाट करुन।।७४।। आला वसुदेव गोकुळी नंदगृहात। यशोदाही झाली होती प्रसूत। दिला होता तिने जन्म कन्येस। ती कन्या योगमायाच होती।।७५।। तिच्या प्रभावे गेले सारे झोपून। नंदाचे दरवाजे गेले उघडून। वसुदेवाने मग माजघरात जाऊन। ठेवीले बाळास यशोदे जवळ।।७६।। घेतली त्याने कन्या उचलून। आपल्या परडीत तिला ठेवून। निघाला वसुदेव झटकन् तेथून। आला तो कारागृहात परत।।७७।। तो आत येता झाली द्वारे बंद।

पडल्या बेडया वसुदेवाच्या पायात। श्रीहरीने सोडविले होते तुरुंगातून। योगमायेने जखडले परत तयास ।।७८।। कन्या विसावली देवकी कुशीत। कुरवाळी देवकी वात्सल्ये तियेस। मुलीने टाहो फोडला तेव्हढयात। सेवकांनी वृत्त दिले कंसास।।७९।। आला कंस तेथे पळत धावत। खसकन् ओढले त्याने बाळास। झुगारुन देवकीच्या विनंतीस। आला बाहेर घेऊन तियेस।।८०।। फिरविली गरगर कन्या हवेत। निसटली ती त्याच्या हातातून। जाहला विजांचा प्रचंड कडकडाट। प्रचंड तेजाने तळपली आदीमाया।।८१।। भीतीने कंसास सुटला कंप। गर्जली ती उद्देशून कंसास। तुझा वैरी वाढत आहे अन्यत्र। तुझा मृत्यु आता ठरला निश्चित।।८२।। ऐकून कंस संतापला भारी। आला पाय आपटीत तो दरबारी। योगमायाही क्षणात अदृश्य झाली। लागला घोर कंसजीवासी।।८३।। इकडे गोकुळी यशोदा जागली। कुशीत बाळ पाहुनी प्रसन्न झाली। बाळाला हृदयी धरुन धन्य झाली। आनंद तिचा गगनात मावेना।।८४।। सकाळी सर्वत्र गोड वार्ता पसरली। बाळाला पाहण्यास गर्दी जमली। घेतले गर्गमुनींसी बोलावूनी। आला नंद पुत्रमुख पाहण्यास।।८५।। वाद्य गजरात पुण्याहवाचन झाले। नंदाने बाल श्रीहरीस पाहीले। बाळास मधाचे बोट चाटविले। मन त्याचे मोदे न्हाऊन गेले।।८६।। केला नंदाने पुष्कळ दानधर्म। शुभ चिंतीले गोपांनी देऊन वस्त्रालंकार। आल्या गवळणी अगदी नटून थटून। अक्षय वाणांनी केले यशोदेचे कौतुक।।८७।। सजविले

नंदघर मोत्याच्या माळांनी। रत्नजडीत मंचकी यशोदा बाळ घेऊनी। बाळ पाहण्या आले त्रिकालज्ञ गर्गमुनी। पाहीला त्यांनी बाळाचा हात।।८८।। पाहुनी वदले हर्षित होऊनी। यशोदे तू तर अपार भाग्याची। जाहलीस गे तू विष्णूची जननी। सर्वश्रेष्ठ गौरव प्राप्त तुजसी।।८९।। पुत्र तुझा असे ईश्वरी अवतार। करील हा दैत्यकुळांचा संहार। कीर्तिपताका दिगंतरी फडकवील। धर्मरक्षक म्हणून होईल वंदनीय।।९०।। सर्वश्रेष्ठ जगत्पिता वैकुंठीचा राणा। खेळे मौजेने यशोदा हलवी पाळणा। आला असे श्रीहरी लीला करण्या। घेई करवून तो आपुले कौतुक।।९१।। कृष्णजन्माने जाहले गोकुळ प्रसन्न। दिसू लागली सर्वत्र शुभ चिन्ह। देऊ लागल्या गाई भरपूर दूध। वृक्षही फळभारे वाकू लागली।।९२।। पीकही शेतात आले उदंड। झाले जन निरोगी चिंतारहीत। संपन्नता पसरली असे सर्वत्र। जाहले गोकुळी चराचर सुखी।।९३।। मथुरेस जाणवू लागली दुश्चिन्ह। कुत्रे रडती कंस प्रासादासमोर। पडू लागली कंसास दुःस्वप्न। पाहून कंस धास्तावला मनी।।९४।। केला कंसाने प्रधानासवे विमर्श। म्हणे माझा वैरी जन्मला निश्चित। तो जर सापडला तरीच नायनाट। करता येईल माझ्या वैऱ्याचा।।९५।। करुनी त्याचा सर्वत्र शोध। देईल ही बातमी जो मज। त्याची मागणी मी पूर्ण करीन। म्हणे प्रधान तो असे गोकुळात।।९६।। तेंव्हा महाबळ नावाचा दैत्य। म्हणे वेषांतर करुन घेईन बोध। कंसाज्ञे महाबळाने वेषांतर करुन। आला तो नंदाचे

गृहात।।९७।। म्हणे यशोदेस असे बाळ अशुभ। याचेमुळे होईल गोकुळाचा नाश। टाकावे यासी गाडून जीवंत। गेली घाबरुन बिचारी यशोदा।।९८।। दाखविली कृष्णाने आपुली लीला। पडले दहयाचे मडके त्याच्या डोक्यावर। घरातील पाट, वरवंटे आदी वस्तु। चहुकडून तुटून पडल्या त्याच्यावर।।९९।। केले महाबळाने पलायन तेथून। कसाबसा येऊन पोचला मथुरेत। म्हणे निर्जीव वस्तूनी मारील मज। ऐकून कंसही घाबरला मनी।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।
।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। दुसरा अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्थ चरणी नमन। असे तयांसी मी अनन्य शरण। देऊनी तयांनीच मज वरदान। केले लिहीते या गणेशास।।१।। श्रीकृष्ण असे मनमोहन। सर्वांग सुंदर तो कमल नयन। घेतसे तो सर्वांसी मोहवून। तयाच्या लीला काय वर्णाव्या।।२।। बालरुप ते सुंदर गोंडस। वाटले आकर्षण शिवशंकरा। घेऊन मग तो ब्राह्मण वेष। शिव ठाकला नंदगृहा द्वारी।।३।। हाक ऐकूनी यशोदा आली। शिव म्हणे 'मी असे' द्विजमुनी। बाळास हो तुमच्या आणुनी। घडवावे त्याचे दर्शन मजसी।।४।। इकडे कृष्णाने फोडले भोकाड। आली धावुनी यशोदा आत। उचलून घेई कडेवर तयास। आली तैसीच ती बाहेर।।५।। घेतले त्या द्विजाने बालकास। झाला मग बालक शांत। हरीहराचे ते मनोमिलन। काय वर्णावी शोभा त्याची।।६।। आता सांगतो पुतना गोष्ट। होती राक्षसी फार दृष्ट। कंसाने पाठवले तिज गोकुळात। श्रीकृष्णवध करण्यास्तव।।७।। घेऊनी मनमोहक सुंदर रुप। आली पुतना नंदगृहात। पाहुनी तिज

जणु लक्ष्मीचं। वाटले रोहीणी आणि यशोदेस।।८।। बैसवूनी तिज कृष्णासमीप। लागल्या दोघी निजकामास। पुतना उचली हळुच कृष्णास। घेतले कृष्णाला स्तनपानास।।९।। जाणी कृष्ण तियेचे मनोरथ। पिऊ लागला तो दुग्धास। शोषुनी विष शोषितसे प्राण। वेदनेने तडफडू लागली पुतना।।१०।। धरीले तिने आपुले मूळरुप। पडली ती मरुन अस्ताव्यस्त। जाहला तेंव्हा ध्वनी प्रचंड। रुप ते पाहुन गेले घाबरुन सर्व।।११।। बाळकृष्ण खेळीतसे तिचे देहावर। गेल्या भीऊन गोपी सर्व। एकीने घेतले उचलून अलगद। दिले श्रीकृष्णास यशोदेकडे।।१२।। घातले यशोदेने मंत्रपूर्वक स्नान। म्हणे मुखाने देवस्तोत्र। फिरविले तिने गाईचे शेपूट। लावीले मंत्रपूर्वक टीळे तयास।।१३।। असे जो साऱ्या जगाचा रक्षक। त्याचेच करती हे कोडकौतुक। लागू नये तयासी वाईट दृष्ट। म्हणूनी माता करीतसे उपाय।।१४।। अखिल ब्रह्मांडाचा हा नायक। घेई कौतुक करुन आनंदे सर्व। नंतर यशोदेन दिले स्तनपान। गेला झोपी हा चित्तचोर।।१५।। केले दहन मग पुतना शरीराचे। देह जळत असता परिमळ पसरे। मृत्युसमयी लाभल्या कृष्णस्पर्शाने। गेली उध्दरुन पुतना राक्षसी।।१६।। आता उपडा वळू लागला कृष्ण। नंदाने केले त्या निमित्ते उत्सव। घातले कृष्णास अभिषेक स्नान। निजविले तयास रथाखाली।।१७।। यशोदा करीत होती आगतस्वागत। इकडे बाळाची संपली झोप। हलवू लागला तो हातपाय। त्याचा धक्का रथास

लागे।।१८।। बाळाने मग दिला धक्का जोरात। दूरवर तुटून पडला रथ। झाला शकटासूर त्यातून प्रकट। करीतसे वंदन तो श्रीकृष्णास।।१९।। केले प्रकट आपुले मूळ स्वरुप। खरे तर होता तो एक गंधर्व। नमून कृष्णास तो गेला निघून। ऐसे एक अरिष्ट टळले।।२०।। पूतनेचा वध झाल्यानंतर। कंसे पाठविले तृणावर्त राक्षसास। होता श्रीकृष्ण यशोदामांडीवर। केले जड बाळाने आपुले शरीर।।२१।। मग खाली ठेवोनी तयास। कामास्तव गेली यशोदा अन्यत्र। तेवढयात उठली मोठी वावटळ। तृणावर्ताने घेतले बाळास उचलून।।२२।। बाळास घेऊन आला गोकुळाबाहेर। बाळाने मिठी मारली राक्षसास। वेदनेने अस्वस्थ झाला राक्षस। दैत्यरुप धरुन कोसळला खाली।।२३।। ऐकून प्रचंड मोठा आवाज। गोपगोपी धावले गोकुळाबाहेर। प्रचंड राक्षस पडला होता मरुन। गोपांनी बालकास घेतले उचलून।।२४।। ऐसेची एकदा माता यशोदा। स्तनपान देवूनी श्रीकृष्णाला। बाळाचे ओठ पूसत असता। दिली बाळाने मोठी जांभई।।२५।। त्याच्या त्या चिमुकल्या मुखात। दिसले मातेला तारका, ग्रह, अंतरीक्ष। भिऊन तिने घेतले डोळे मिटून। मग कृष्णाने मायेस आवरले।।२६।। दिसू लागला पुन्हा होता तसाच। झाली यशोदा आश्चर्ये चकीत। वाटले यशोदेस झाला असेल भास। लागली परत ती आपुले कामास।।२७।। यदुकुळाचे कुलगुरु गर्गमुनी। आले ते भेटण्यास नंदासी। नंद म्हणे करा नामकरण बालकांसी। मुनी म्हणाले कंसास

समजेल।।२८।। मग नामकरण केले गुप्तरुपाने। रोहिणीसुतास बलभद्र बलरामादि नामे। यशोदापुत्रास श्रीकृष्ण नाम ठेवले। म्हणाले गर्गमुनी मग नंदास।।२९।। असती हे शेष व विष्णूचे अवतार। करावे यांचे पालन पोषण। परी असावे सदैव तुम्ही दक्ष। सांभाळा प्रेमे या दोघांसी।।३०।। उभय बालक होऊ लागले मोठे। खोडया करण्यात त्यांना मौज वाटे। करीत ते हट्ट वेगवेगळे। सारखे हट्ट, सारख्या खोडया।।३१।। आता जमवून गोपबालकांना। करु लागले दुधादह्याच्या चोऱ्या। सांगती गोप त्यांच्या कागाळया। परी रागातही असे अतिकौतुक।।३२।। गोपींच्या त्या कागाळया ऐकून। यशोदा मग रागे भरे तयांस। म्हणे देईन मी मार तुम्हास। मग गोपीच तिज अडविती।।३३।। या गोपी म्हणजेच ऋषीमुनी। होती केली तपश्चर्या तयांनी। कृष्णासवे क्रीडा करावी म्हणूनी। आले घेऊन गोपींचा जन्म।।३४।। खेळत असता गोपांसवे एकदा। खाई माती कृष्ण चुकवूनी डोळा। एकाने ते सांगितले यशोदेला। ऐकून धावून आली यशोदा।।३५।। सांगितले कृष्णास 'आ' करण्यास। कृष्ण 'आ' करुन दाखवी तियेस। पाहून ब्रह्मांडे कृष्णाच्या मुखात। भितीने तिने डोळे मिटून घेतले।।३६।। कृष्ण पूसे मग यशोदेस। का बर तू डोळे मिटलेस। ती म्हणे तुझे स्वरुपच न कळे मज। राही बाबा तू असशी तैसाच।।३७।। सर्व सघन ब्रह्मांड तव मुखात। मातीस कोठून जागा तेथ। करते मी तुजसी प्रणाम। न कळे रे मज तुझी माया।।३८।।

एकदा यशोदा दही घुसळता। बाहेरुन कोठून कृष्ण आला। म्हणे भूक लागली असे मजला। घेतले यशोदेने त्यास मांडीवर।।३९।। इतक्यात उतू जाई दूध। खाली ठेविले तिने कृष्णास। पळाली आत दूध पाहण्यास। आला राग मग श्रीकृष्णास।।४०।। सोडून साक्षात परब्रह्माचे वात्सल्य। धावली यशोदा वाचवण्या दूध। मग जवळचेच एक लाकूड घेऊन। फोडला त्याने डेरा दह्याचा।।४१।। आली यशोदा पाहीले तिने। डेराच फोडला होता श्रीहरीने। शोधता पाहीले श्रीकृष्णास तिने। उखळावर चढून तो खाई नवनीत।।४२।। यशोदा मारु गेली तयास। पळाला कृष्ण उडी मारुन तेथून। करी यशोदा त्याचा पाठलाग। प्रत्यक्ष हरीस कैसे पकडणार।।४३।। शेवटी यशोदामातेचे कष्ट पाहून। सापडला कृष्ण तिज आपणहून। अश्रुने डबडबले होते नयन। म्हणे यशोदा बांधतेच मी यासी।।४४।। परी दोरी पडू लागली कमी। यशोदा दोरीस दोर जोडी। शेवटी तिजकडून बांधून घेतली। कृष्णाने दोरी आपले कमरेस।।४५।। बांधले तिने कृष्णास उखळासी। म्हणाली रागाने ती कृष्णासी। आता कैसा करशील मस्ती। रहा इथेच तू उभा असाच।।४६।। गेली यशोदा आपुले कामास। पाडीले आडवे कृष्णाने उखळास। गेला घरंगळत कृष्ण अंगणात। आला तैसाच अर्जुन वृक्षांपाशी।।४७।। त्या वृक्षांमधून जाण्यासाठी। कृष्णाने मग उखळ ओढली। ती उखळ दोन वृक्षांत अडकली। ओढली कृष्णाने दोरी जोराने।।४८।। धक्का उखळाचा लागता त्या

वृक्षांस। पडले उन्मळून वृक्ष अंगणात। मणिग्रीव, नलकुबेर झाले प्रकट। करती वंदन ते कृष्णासी।।४९।। मणिग्रीव, नलकुबेर होते गंधर्व। नारदशापे झाले होते ते वृक्ष। परी सोडवील विष्णू कृष्णावतारात। ऐसे वरदान होते त्या उभयातांस।।५०।। झाले दोन्ही गंधर्व मुक्त। करुन प्रदक्षिणापूर्वक नमस्कार। गेले आपुले स्थानी ते गंधर्व। तितक्यात नंद आला तेथे।।५१।। पाहुनी वृक्ष उन्मळून पडलेले। सर्व गोकुळवासियांनी ओळखले। हे वृक्ष या बाळकृष्णानेच पाडले। नंदाने कृष्णाची दोरी सोडली।।५२।। गेले भिऊनी गोकुळवासी सर्व। केले त्यांनी वृंदावनात स्थलांतर। वृंदावनही होते यमुना तीरावर। गोपांना रमणीय परिसर भावला।।५३।। कृष्णबलरामही झाले मुदीत। देती सर्वांस आपुल्या लीलांनी मोद। परी एक दिवस झाले विचित्र। होते गोप श्रीकृष्ण बलरामासह।।५४।। तेंव्हा तेथे यमुनेच्या तीरावर। आला असुर वासराचे रुपात। शिरला कृष्ण वासरांचे कळपात। मारुन टाकले कृष्णाने असुरास।।५५।। एके दिनी बक नावाचा राक्षस। थांबला तो वृंदावन सरोवरा समीप। येताची श्रीकृष्ण गिळीले तयास। पाहून रडू लागले सर्व गोप।।५६।। केले श्रीकृष्णाने शरीर उष्ण। टाकले बकराक्षसाने त्यास बाहेर। चोचीने मारु लागला कृष्णास। कृष्णाने पाय फाडून मारले त्यास।।५७।। नंतर प्रचंड अजगररुप घेऊन। आला वृंदावनात अघासुर राक्षस। गोपबालकांच्या मार्गी राहीला पडून। वाटले गोपांना असेल डोंगर

गुहा।।५८।। गायीवासरांसह गोप गेले आत। होते ठाऊक करील कृष्ण रमण। कृष्णही गेला तयांसवे विवरात। घेतले अजगराने तोंड मिटून।।५९।। कृष्णाने मग अजगराच्या घशात। वाढविले आपुले शरीर प्रचंड। मरुन पडला असूर शरीर फाडून। गोपादिंना कृष्णाने केले जीवंत।।६०।। कृष्णाने अघासुर वधिला पाचवे वर्षी। गोपांनी सांगितला सहावे वर्षी। याचे कारण सांगतो तुम्हास। केले कृष्णाने ब्रह्मदेवाचे गर्वहरण।।६१।। एकदा गोप बालके करीता सहभोजन। भरवीत होते ते घास एकमेकांस। वासरे तेंव्हा गेली अरण्यात निघून। गेला कृष्ण वासरे आणण्यास्तव।।६२।। ब्रह्मदेवाने पळविले वासरे अन् बालकांस। येऊन पाहता कळले श्रीकृष्णास। मग वासरे, बालके,केली निर्माण। कृष्णाने आपुल्या लीलाशक्तीने।।६३।। अगदी हुबेहुब गोप बालक। केली कृष्णाने स्वरुपे धारण। वेदवाणी 'सर्वं विष्णुमयं जगत्' । केली प्रत्यक्ष खरी कृष्णाने।।६४।। राहीला सुरु तैसाच व्यवहार। बालक वासरांच्या रुपात सहवास। लाभले प्रेम गोपवासी जनांस। केली यथेच्छ वर्षभर क्रीडा।।६५।। जाता असा चुटकीसारखा काळ। पाही गोकुळी येऊन ब्रह्मदेव। होता पूर्वीप्रमाणेच श्रीकृष्ण। आपले सवंगडी अन् वासरांसह।।६६।। न समजून येई मग ब्रह्मदेवास। हे सर्व आणि मी पळविलेसे गोपबालक। कोणती यातील खरी असतील। पडला संभ्रम स्वत: विधात्यास।।६७।। मायापती विष्णूस पाडण्या

भुरळ। विधात्याने केला होता प्रयत्न। नाही सिध्दीस गेला संकल्प। स्वयं तोची झाला विचार विमूढ।।६८।। ब्रह्मदेवास वासरे, गोपबालक। दिसत होती श्रीकृष्णस्वरुपात। होते त्यांच्या मुखावर हास्य शुध्द। नेत्रात होते आरक्त कटाक्ष।।६९।। दिसती सत्व, रज गुणांनी युक्त। पाहून ब्रह्मदेव झाला चकीत। त्याच्यासम दुसऱ्या ब्रह्मदेवासह। होते सर्व चराचर पूजा करीत।।७०।। नृत्यगायनांनी मनोरंजन करीत। भक्तीपूजन सोहळा होता अपूर्व। अष्टसिध्दी, विभूती, अविद्यादिक। महदादि चोवीस तत्वे नतमस्तक।।७१।। आत्मज्ञानींनाही अगम्य अनंत। आनंदमय केवळ सत्यस्वरुप। अशी ती वासरे अन् गोपबालक। झाले त्याच्या तेजाने सुप्रकाशित।।७२।। पाहुन परब्रह्माचे अलौकिक तेज। स्वयंप्रकाशीत ते विमल परब्रह्म। परब्रह्ममूर्तीचे ते तेज पाहून। झाली ब्रह्माची गात्रे शिथिल।।७३।। पाहुनी ब्रह्माची अवस्था विकल। मनी म्हणे न पहावा याचा अंत। ओळखण्या आपुले सत्य स्वरुप। असे ब्रह्मदेव असमर्थ जाणले।।७४।। मग केले दूर आपुले मायापटल। पाही ब्रह्मदेव डोळे उघडून। दिसले त्याला तेंव्हा त्याच्या समोर। वृक्षलतांनी डवरलेले रम्य वृंदावन।।७५।। दिसे श्रीकृष्ण त्याच्या गोपवेषात। उतरला ब्रह्मदेव स्ववाहना वरुन। धरुनी मग श्रीकृष्णाचे चरण। केले साष्टांग नमन त्यास।।७६।। म्हणे ब्रह्मा न कळे सगुण रुप। अशक्य जाणणे करुनी चिंतन। मग प्रत्यक्ष आत्मसुखाचा अनुभव। कोण जाणू शकेल

गुणातीत रुप।।७७।। असे ज्ञान साधनेने जाणणे अशक्य। परी अनन्य भक्तीने येता शरण। असे शक्य कृष्णा तुज जिंकणं। असे हा महिमा तव भक्तीचा।।७८।। तव स्वरुप ते निर्विकार रुपातीत। लागे जाणावे अनुभवाने केवळ। तुझ्या अनन्य भक्तीवाचून। ज्ञान तुझे न होई कोणास।।७९।। अच्युता झालो मी रजोगुणा पासून। न जाणू शकलो तुझा प्रभाव। होतो झालो अहंभावाने मी अंध। घडला मजकडून हा अपराध।।८०।। करावी क्षमा मजसी आपण। श्रीकृष्णाची ऐसी स्तुती करुन। घातली कृष्णास प्रदक्षिणा त्रिवार। नमस्कार करुनी गेला स्वस्थानी।।८१।। ऐशा श्रीकृष्णाच्या लीला अनेक। वाचता वाचता दंग होई चित्त। मिसळूनी गोपबालकांत समस्त। केले धन्य कृष्णाने वृंदावनास।।८२।। कृष्ण काढीतसे पक्ष्यांचे ध्वनी मधुर। काढीतसे तो प्राणीआवाज हुबेहुब। नादलहरींच होती जयाचे पासून। कोणती गोष्ट असे अशक्य त्यास।।८३।। एकदा सर्व गोप वदती कृष्णास। केलासी तू असुरांचा विनाश। असा तुम्ही दोघे सामर्थ्यसंपन्न। म्हणुनी सांगतो आम्ही तुम्हास।।८४।। असे समीप एक ताडवृक्षवन। पुष्कळ ताडफळे पडती तेथे गळून। आणिकही स्वादीष्ट फळे असती तेथ। परी असे तेथ धेनुकासुराचा वास।।८५।। असे त्याची भीती सर्वांचे मनी। म्हणून त्या वनात न जाती कुणी। गुरे, माणसे वा कुणीही प्राणी। असे भीती प्रचंड सर्वांचे मनी।।८६।। असे गर्दभासमान त्याचे रुप। असे तो असुर पराक्रमी बहुत। असे तो राक्षस

मनुष्यभक्षक। भीतीने तेथे जाणे असे अशक्य।।८७।। सवंगडयांचे ऐसे बोल ऐकून। निघाले बलराम, कृष्ण त्यांस घेऊन। आले ते सारे ताडवृक्ष वनात। पाडीली ताडफळे वृक्ष हलवून।।८८।। करी गर्जना धेनुकासुर आवाज ऐकून। क्रोधे आला बलरामावर धाऊन। त्याने आपुल्या मागील पायांनी मग। केला बलरामाच्या वक्षावर प्रहार।।८९।। लागला फिरु तो बलरामाभोवती। क्षुब्ध त्याने बलरामावर झेप घेतली। बलरामाने पकडले त्याचे पाय हाती। फिरवू लागला तयास तो गरगर।।९०।। फिरवून धेनुकासुरास गरगर। मग दिले फेकून त्यास दूरवर। आघाताने कोलमडून पडला वृक्ष। जाहला धेनुकासुर तात्काळ गतप्राण।।९१।। धेनुकासुर जेंव्हा पडला मरुन। आले ज्ञातीबंधु बलरामकृष्णावर धाऊन। उभयतांनी त्यांचे पाय पकडून। फिरवून गोल दिले वृक्षांवर फेकून।।९२।। केला उभयतांनी राक्षसांचा नाश। जाहले ते ताडवन भयमुक्त। जाऊ लागले सर्व तेथ निर्भय होऊन। घेऊ लागले तेथील फळांचा स्वाद।।९३।। आले परत बलरामकृष्ण वृंदावनात। गोप करती स्तुती शौर्य सांगून। होत्या गोपी त्यांची वाट पाहत। आल्या त्या सामोरी तयांस।।९४।। माता रोहीणी, यशोदा पुत्रवत्सल। घालती उभयतांस सुगंधी स्नान। दिली सुंदर वस्त्रे करण्या परिधान। दोघांचे ही श्रम गेले निघून।।९५।। वृंदावनात ऐशा लीला अनेक। गोपगोपींस लाभे त्यांचा सहवास। धन्य त्या गोपी आणि गोप। धन्य तैसेची गोकुळवासी सर्व।।९६।।

कृष्णाच्या लीला रुपेही अगम्य। ऐकता दंग होई आपुले चित्त। सहजतया जाते आपले मी पण गळून। होई मन मयुर चिंतनी दंग।।९७।। खरोखरीच धन्य तव लीला जगन्नाथा। विसरविशी भान रे तू आता। रमलो आम्ही तव चिंतनी सर्वथा। देई स्थान तुझे चरणी आम्हा।।९८।। ऐसी ही कृष्णाची कथा अद्‌भूत। करण्यासी स्वामी देती सामर्थ्य। लाभला असे स्वामींचा वरदहस्त। म्हणूनी वाहे प्रवाह हा शब्दांचा।।९९।। शब्दांसी परिमळ मिळे भक्तीचा। होती शब्द अर्थवाही सर्वथा। लाभो स्वामी ऐसीच सदैव कृपा। ठेवितो माथा चरणी तुमच्या।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। तिसरा अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीकृष्णाचे रुप अतिमधुर। अधरी बासुरी अमृतप्रसव। नयनी निळे आकाश सुंदर। मधुरहास्य सदैव मुखावर।।१।। कमलनयन मुख कमल कोमल। कमलाने शोभती करकमल। चरतसे अखंड चरण कमल। पत्नी कमलासना कमला।।२।। बाल्य तयाचे मनमोहक रम्य। नयनमनोहर खोडया चतुर। जाहले गोपल अन् गोपी धन्य। सहवासे तया जगन्नाथाच्या।।३।। किती आणि कैसी वर्णावी। मधुरलीला मधुराधिपाची। आधीच बालरुपे मोहक अती। मिष्किल तया जगन्नाथाची।।४।। घेतला अवतार या भूलोकी। असुरांचा विनाश करण्यासाठी। बालपणीच मारीले असुर किती। न शक्य करणे ती गणती।।५।। स्वामी कृपेने करीन वर्णन पुढती। शब्द मज स्वामीच स्फुरविती। कृष्णामुळे लाभे परिमळ त्यांसी। मोहक मनोरंजक लीला त्याची।।६।। आता वर्णितो कालिया मर्दन। कृष्णाने केले फणीवर नर्तन। दिले कलियास अभयदान। परतविले त्यास त्याचे स्थानासी।।७।। गेला होता श्रीकृष्ण

सवंगडयांसह। तहानेने व्याकुळ झाले गोप। प्यायले त्यांनी यमुना डोह जल। पडले सर्व ही गतप्राण होऊन।।८।। कालिया सर्पाच्या विषाने दूषित। जाहले होते यमुनेचे जल। श्रीकृष्ण तर साक्षात योगेश्वर। केले अमृत दृष्टिने गोप जीवंत।।९।। नंतर कालियाचा संहार करण्यास्तव।कृष्णाने घेतली उडी डोहात। करु लागला क्रीडा तो डोहात। जाहला तेणे कालिया संतप्त।।१०।। आला कृष्णाच्या अंगावर धावून। टाकले कलियाने कृष्णास वेढून। तीरावरील गोपमित्र गेले घाबरुन। करु लागले ते सर्व शोक।।११।। झाले गोप आणि गोपी दु:खित। हरपले यशोदा मातेचे देहभान। बलरामादि देती तिज धीर। करीत होते सर्व तिचे सांत्वन।।१२।। ते पाहून श्रीकृष्ण वर उठला। आपले शरीर फुगवू लागला। वेढे सोडून मग दुष्ट कालिया। रागाने फुत्कार टाकू लागला।।१३।। श्रीकृष्ण त्याच्या भोवती फीरु लागला। फिरुन फिरुन कालिया दमला। श्रीकृष्ण त्याच्या फणांवर चढला। चढून रम्य नृत्य करु लागला।।१४।। श्रीकृष्ण एका हातात पकडी शेपूट। पदाघाताने करी कालियास जर्जर। जाहला मग कालिया मरणान्मुख। त्याच्या स्त्रिया गेल्या कृष्णास शरण।।१५।। त्या नागस्त्रिया म्हणती कृष्णासी। दुष्ट निर्दालनास्तव जन्म घेतलासी। आमचा पती अपराधी त्यासी। केलेस शासन हे योग्यच असे।।१६।। आमचे पूर्व कर्मानुसार। आलो जन्मासी। विषारी सापाच्या या योनीसी। केलेस तू शासन आमुचे पतीसी। त्यामुळे तो झाला निष्पाप।।१७।।

वासुदेवा तू असशी अंतर्यामी। सर्वव्यापक निर्गुण निराकारी। प्रवृत्ति - निवृत्ती मार्ग होती तुजपासूनी। नमस्कार आमुचा तवचरणी।।१८।। नागस्त्रियांची स्तुती ऐकोनी। विदीर्ण निश्चेष्ट झालेल्या कालियासी। दिले सोडोनी मग श्रीकृष्णानी। म्हणे दीनपणे कालिया कृष्णासी।।१९।। देवा, जन्मलो असे मी सर्पयोनीत। आमचा जन्मजात दुष्ट स्वभाव। हा सुध्दा तुझ्याच मायेचा प्रभाव। कैसा तो नाहीसा होईल।।२०।। आता तू ची घ्यावा निर्णय। करावी तू कृपा माझ्यावर। की मला मारावे ते तूच ठरव। अनन्यभावे शरण मी तुजसी।।२१।। कालियाचे ऐसे भाषण ऐकोनी। म्हणाला श्रीकृष्ण कालियासी। जावे आता सोडून या डोहासी। जावे तू रमणक द्वीपासी।।२२।। आलासी येथे तू पळून। गरुड खाईल म्हणून घाबरुन। आता तुज तो नाही खाणार। माझी पदचिन्हे असती फण्यावर।।२३।। गरुडाची भीती का कालियास। त्याचे कारण सांगतो तुम्हास। रमणक द्वीपामध्ये सर्पांचा निवास। गरुडाची पीडा होती सर्वांस।।२४।। सर्वांनी मग केली युक्ती खास। ठेवती एक बळी प्रति अमावस्येस। मिळतसे बळी प्रति अमावस्येस। गरुड पीडा न करी सर्पांस।।२५।। होता चालू ऐसा नित्य नेम। होता सर्व सर्पांचे कुशल क्षेम। ठेविती नियमितपणे बळी गरुडास। नव्हती सर्पांसी गरुडाची पीडा।।२६।। कालियासर्प होता बहु शक्तिमान। होता तयास शक्तीचा अभिमान। कालियाने देणे होता बळी गरुडास। आपण देण्याचा बळी त्यानेच खाल्ला।।२७।।

पाहून गरुडास अतिराग आला। कालियाच्या अंगावर तो धावून गेला। कालियाने गरुडास मग दंश केला। गरुडाने पंखाने त्याच्यावर आघात केला।।२८।। आघाताने कालिया विव्हळ झाला। कालिया तेथून सपरिवार निघाला।। यमुनेच्या डोहात येऊन राहीला। कारण येथे येणे अशक्य गरुडाला।।२९।। त्याचे ही कारण सांगतो तुम्हास। होता येथे सौभरी ऋषींचा निवास। दिले त्यांनी जलचरांना अभय। आनंदे राहत होते तेथे जलचर।।३०।। परी गरुडाने न मानून आज्ञा। एक मोठा मासा खाऊन टाकला। तेणे त्याचा परिवार दुःखी झाला। सौभरी ऋषींस आली करुणा।।३१।। केले शापीत त्यांनी गरुडाला। देईल जर पीडा जलचरांना। मुकेल मग तो स्वतःचे प्राणाला। तेणे गरुड झाला भयभीत।।३२।। म्हणून कालिया राही या डोहात। त्यामुळे जल झाले विषयुक्त। कृष्णाने हाकलून दिले तयास। गेला मग तो रमणक द्वीपास।।३३।। आला श्रीकृष्ण डोहातून बाहेर। गोपबालके जागे झाले खडबडून। दिवसभराच्या श्रमाने थकले सर्व। राहीले ते यमुनाकाठी वस्तीस।।३४।। होते तेंव्हा उन्हाळयाचे दिवस। मध्यरात्री होते सारे गाढ झोपेत। सुकलेल्या वनाला लागली आग। वणव्यात सारे होरपळू लागले।।३५।। गेले सारे भगवान कृष्णास शरण। अनंतशक्ती कृष्णाचे द्रवले मन। टाकला कृष्णाने भयंकर अग्नि पीऊन। केली सर्वांची सुटका अग्निपासोन।।३६।। प्रखर ग्रीष्मऋतु सुरु होता। हा ऋतु सर्वांस त्रासदायक तसा। वृंदावनाची

वनश्री अन् सुंदरता। तशातच बलराम श्रीकृष्णाचे वास्तव्य।।३७।। त्यांच्यामुळे ग्रीष्महीं झाला आल्हादप्रद। करावी क्रीडा वृंदावनाच्या वनात। आला श्रीकृष्ण बासरी वाजवीत। वनात साऱ्या सवंगडयांसह।।३८।। कुस्त्या, नाच आणि गायन। गेले सारेजण त्यात रमून। प्रलंब नावाचा भयंकर राक्षस। आला गोपवेष धारण करुन।।३९।। कृष्णाने ओळखले त्याचे मनोगत। म्हणे जोडया करुन खेळु आपण। केले सवंगडयांचे दोन गट। कृष्ण अन् बलराम दोघे प्रमुख।।४०।। खेळाचा ठरविला गेला नियम। जो गट या खेळात हरेल। त्याने जिंकणाऱ्या गटातील मुलास। आपल्या पाठीवरुन न्यावे वाहून।।४१।। सर्व भांडारिवडाजवळ खेळत आले। डाव जिंकला बलरामाच्या पक्षाने। होता प्रलंबासुर कृष्णाच्या बाजुने। प्रलंबासुराने बलरामास पाठी घेतले।।४२।। कृष्णापुढे नाही लागणार निभाव। म्हणून कृष्णाचा डोळा चुकवून। गेला मर्यादे पलीकडे मग प्रलंबासुर। बलरामास आपुले पाठी घेऊन।।४३।। केले प्रलंबासुराने राक्षसरुप धारण। भयंकररुप पाहून मग बलराम। रागारागाने आपली मूठ आवळून। केला प्रहार असुराचे मस्तकावर।।४४।। झाले असुराचे मस्तक धिन्नभिन्न। कोसळत भूवर गर्जना करुन। आले सारे गोप तेथे धाऊन। झाला प्रलंबासुराचा वध।।४५।। ग्रीष्मऋतु गेला ऐसाच संपून। झाला मग वर्षाऋतूचा प्रारंभ। मेघदाटी झाली आकाशात। मेघ करती वर्षावृष्टी भूवर।।४६।। वाहु लागल्या नद्या जले भरुन। पावसामुळे सृष्टी झाली

प्रसन्न। सृष्टी सजे हिरवाशालू नेसून। फळाफुलांचे वर अलंकार लेऊन।।४७।। हळूहळू गेला वर्षाऋतु संपून। झाले मग शरदऋतुचे आगमन। भ्रमरांचा गुंजारव मध चाखून। पक्षीही करती मधुर किलबिल।।४८।। नद्या, पर्वत, सरोवरे, गेली दुमदुमुन। सुरु केले कृष्णाने बासरीवादन। गोपी मोहल्या वेणूगीत ऐकून। करती त्या मुरलीचा मत्सर।।४९।। शरदानंतर झाले हेमंताचे आगमन। मार्गशीर्ष मासास झाला प्रारंभ। या मासात केवळ हविष्यान्न सेवून। कुमारिकांनी सुरु केले कात्यायनी व्रत।।५०।। या व्रताचे असे ऐसे विधान। अरुणोदयीच करावे नदीस्नान। कात्यायनीची प्रतिमा तयार करुन। नंतर मग नदीतीरी येऊन।।५१।। अर्घ्य, पाद्य, सुगंधी चंदन फुले। सुंदर तांबुस कोवळी आम्रपल्लवे। धूप, दीप, अक्षता, फळफळावळ। नैवेद्य दहीभाताचा अर्पून।।५२।। करावी कात्यायनीची पूजा। करावी मग मन:पूर्वक प्रार्थना। गोपी म्हणती नंदपुत्र लाभावा। पती तो ची तोच आम्हाला।।५३।। झाल्या होत्या गोपी उल्हसित। पहाटे जाती स्नानास यमुनेवर। केले ऐसे व्रत पूर्ण महिनाभर। एकेदिनी एक गंमत झाली।।५४।। देण्या गोपींना व्रताचे फल। म्हणून आला कृष्ण सवंगडयांसह। गोपींची किनाऱ्यावरील वस्त्रे उचलून। जवळच कदंबवृक्षी बैसला जाऊन।।५५।। मग म्हणाला तो गोपकुमारीकांना। मुलींनो येथे येऊन वस्त्रे घेऊन जा। कृष्णाचे वचन विनोदपर मानुन हसल्या। होत्या कौतुके त्या खोल पाण्यात उभ्या।।५६।। त्या

कुमारिका श्रीकृष्णास विनविती। तू तर धर्मज्ञ आम्ही तव दासी। द्यावी आमुची वस्त्रे आम्हासी। नाहीतर सांगू नंदराजासी।।५७।। श्रीकृष्ण कुमारिकांसी म्हणाला। असे ही माझी आज्ञा तुम्हाला। इथे येऊन वस्त्रे घेऊन जा। आल्या जलातून बाहेर कुमारिका।।५८।। म्हणाला श्रीकृष्ण त्या कुमारिकांना। तुम्ही वस्त्रहीन स्नान करीत होता। केलात अपमान यमुना देवीचा। आता हात जोडून तिज नमन करा।।५९।। कुमारिकांनी केले आज्ञेचे पालन। यमुनेस म्हणून केले कृष्णास नमन। श्रीकृष्णाने वस्त्रांचे करुन हरण। करविला त्यांचे कडून लज्जेचा त्याग।।६०।। कृष्ण तेंव्हा म्हणाला गोपिकांना। तुमचे मन अर्पण केलेत मला। होईल पूर्ण तुमची सर्व कामना। त्यामुळे तुम्ही व्हाल मुक्त।।६१।। शरदऋतुच्या पौर्णिमा रात्रीस। भोगाल मजसवे नाना विलास। आता जा तुम्ही घरास परत। गेल्या परतून कुमारिका गृहास।।६२।। आता पाहा तुम्ही सारे जण। श्यामसुंदर कृष्णाकडे जाण्यास्तव। लागती टाकावी मोहमायादि वस्त्र। तरीच होते तयासवे मिलन ।।६३।। तसं पाहता गोपकुमारिकांसम आपण। झालो आहोत कृष्णलीलेत रममाण। मनी असे अखंड त्याचेच ध्यान। येई दाटून वात्सल्य, प्रीतिमाधुर्य।।६४।। गेल्या नंतर कुमारिका गोकुळात। बलराम कृष्ण गोपांसह गाई चारीत। गेले वृंदावनापासून अतिशय दूर। केला प्रवेश त्यांनी गर्द झाडीत।।६५।। पाहुन वृक्षशोभा होते आनंदित। बलराम कृष्ण फिरती वर्णन करीत। गोप मजा करती हसत खेळत। नंतर

गोपबालकांना लागली भूक।।६६।। म्हणती कान्हास गेलो दमून। झालो आम्ही भुकेने व्याकुळ। काहीतरी खायला दे रे तूच। कान्हा मग विचार करी मनात।।६७।। ठावे मथुरेत काही ब्राह्मण। करती यज्ञ स्वर्गप्राप्तीस्तव। त्यांच्या स्त्रीयामनी अतिशय प्रेम। वाटले कृष्णास करावा अनुग्रह।।६८।। कृष्णाने गोपबालकांस बोलावले। त्यांना मथुरेत यज्ञस्थळी पाठविले। त्यांना पुढे कृष्णाने सांगितले। जाऊन तेथील विप्रांस सांगावे।।६९।। होतो बलरामकृष्णासह आलो वनात। आम्हास लागली अतिशय भूक। तुमच्याकडील अन्नातून दयावे अन्न। त्या दोघांस देऊन आम्ही खाऊ।।७०।। पशुयागात व सौत्रामणि इष्टीत। दीक्षा घेतलेल्या विप्राकडून घेता अन्न। लागतो दोष ते सेवन करणाऱ्यास। परंतु अन्य प्रसंगी ऐसे नाही।।७१।। अन्य प्रसंगी दिक्षिताकडून घेऊन अन्न। जरी ते अन्न केले सेवन। न लगे त्यास काहीही दोष। म्हणून आपण अन्न देऊ शकता।।७२।। ब्राह्मण होते यज्ञाच्या खटाटोपात। केले त्यांनी गोपांकडे दुर्लक्ष। देश, काल, यज्ञ, मंत्र, तंत्र ही सर्व। तोच भगवंत श्रीकृष्ण रुपात असे।।७३।। हे सत्य त्यांना नव्हते ठाऊक। म्हणूनच केले त्यांनी दुर्लक्ष। आले बालक होऊन निराश। सांगितले सर्व वृत्त श्रीकृष्णास।।७४।। आले हसू कृष्णास ते ऐकून। परी कळावी व्यवहाररीति गोपांस। फसता प्रयत्न न द्यावे सोडून। कार्यसिध्दिस्तव करावा पुन्हा प्रयत्न।।७५।। व्यवहारात नेहमीच मिळेल यश। नसते ऐसे, कधी येते अपयश। सोडू नये कधी आपण

प्रयत्न। यास्तव कृष्ण म्हणाला बालकांस।।७६।। करावा आता पुन्हा प्रयत्न। तुम्ही त्या विप्रांच्या स्त्रियांकडे जाऊन। म्हणा आलो वनात बलरामकृष्णासह। लागली भूक द्यावे थोडे अन्न।।७७।। कृष्णाज्ञेने गेले ते स्त्रियांच्या भागात। गोपबालकांनी केले त्यांस नमन। आलो असू बलरामकृष्णासह दूर वनात। लागली फार भूक आम्हास।।७८।। जरी दयाल तुम्ही थोडेसे अन्न। होईल आमुच्या भुकेचे क्षमन। होत्या त्या कृष्णदर्शनास उत्सुक। समजले त्यांना कृष्ण असे समीप।।७९।। वाहु लागली कृष्णभक्ती अंतरंगात। झाल्या त्या कृष्णभेटीस उत्सुक। मग चतुर्विध अन्नाने पात्रे भरुन। आल्या त्वरेने त्या यमुनातीरावर।।८०।। येता तेथे यमुनेच्या तीरावर। दिसले त्यांना श्रीकृष्ण बलराम। होते अशोकवृक्ष छायेत घेत विश्राम। श्रीकृष्ण स्मित करी गालात।।८१।। होता श्रीकृष्णशिरी मोरपिस मुकुट। एक हात होता सवंगड्याच्या खांद्यावर। लीलया फिरवित होता तो कमळ। त्याच्या सुंदररुपाने स्त्रिया झाल्या मोहीत।।८२।। म्हणाला श्रीकृष्ण त्या विप्रस्त्रियांस। भाग्यशाली तुमचे करतो स्वागत। आलात इथपर्यंत माझ्या दर्शनास्तव। झालात माझ्या दर्शनाने कृतार्थ।।८३।। आता तुम्ही साऱ्यांनी जावे परत। तुमच्या सहाय्ये पती यज्ञ समाप्ती करतील। ऐकून श्रीकृष्णाचे ऐसे वचन। पाणवले त्या विप्रस्त्रियांचे नयन।।८४।। म्हणाल्या रे कृष्णा तुझेच वचन। न होई कधी मम भक्तांचा विनाश। करी बाबा सत्य तू तुझेच वचन। आलो आम्ही आप्तजनांना त्यागून।।८५।।

न घेणार ते पून्हा आम्हास। तुझ्याविन अन्य नसे आश्रय। तारावे तूच आता संकटातून। आहोत तुजसी अनन्य शरण।।८६।। कृष्ण म्हणाला त्या विप्रस्त्रियांस। तुमचे स्वकीय, पती निंदा करतील। ऐसे भय नसावे तुम्हा मुळीच। कारण आला तुम्ही मजसी शरण।।८७।। लोकच काय परंतु देवाधिदेव। करतील तुमचेच अभिनंदन। नित्य कर्म करताना तुमचे चित्त। ठेवावे अनन्यभावे मज ठायीच।।८८।। त्यामुळे माझी प्राप्ती तुम्हास। तुमच्या भक्तीमुळे होईल प्राप्त। ऐकून विप्र स्त्रिया आल्या मंडपात। न दिला त्यांना पतींनी दोष।।८९।। केला त्यांनी त्यांच्यासह यज्ञ समाप्त। विप्रांना झाली स्वअपराध जाणीव। केला त्यांनी मनी स्वत:चा धिक्कार। म्हणती स्त्रियांचीच भक्ती अलौकिक।।९०।। म्हणती निष्फळ विद्वत्ता याग नैपुण्य। देश, काल, मंत्र, तंत्र, अग्नि, ऋत्विज। देवता, यजमान, स्वर्गादि अनेक। ज्याची रुपे तो विष्णुच श्रीकृष्ण।।९१।। ऐकले असूनही अज्ञानाने पडली भ्रांत। झाली प्राप्ती स्त्रियांची ज्या कृष्णभक्त। असे त्यांची भक्ती कृष्णावर निस्सीम। त्यांच्यामुळे झालो धन्य आम्ही।।९२।। होते आमुचे मनी कंसाचे भय। नाही हललो आम्ही आश्रमातून। ऐसीही माया हीच खरी भ्रांत। ती तरुन जाण्यास असावी खरी भक्ती।।९३।। काही दिवसांनतर गोकुळ नगरात। इंद्रासाठी यज्ञ करण्यास्तव गोप। होते करीत तयारी मनापासून। अंतर्यामी कृष्णाने जाणले कारण।।९४।। विचारले कृष्णाने नंदादि गोपास। ही सारी सिध्दता कोणत्या

यज्ञास्तव। कोण देवता, यज्ञाचा कोणता उद्देश। फळ या यज्ञाचे काय मिळणार।।९५।। नंद तेव्हा म्हणाला श्रीकृष्णास। पर्जन्याची देवता असे इंद्र। पर्जन्यामुळे पिकवितो शेतात धान्य। म्हणूनी इंद्रास्तव करीतो यज्ञ।।९६।। कृष्ण म्हणे कर्मानुसार मिळे सुखदुःख। कर्म बदलणे नसे इंद्रास शक्य। मग यज्ञाचा काय असे उपयोग। राहतो आपण तर रानावनात।।९७।। आपला आधार गोवर्धन पर्वत। तोची देव करावे त्याचे पूजन। ऐकले गोपांनी श्रीकृष्णाचे वचन। केले सर्वांनी गोवर्धनाचे पूजन।।९८।। त्यामुळे इंद्रास वाटला अपमान। केला त्याने गोकुळी भयंकर वर्षाव। गोवर्धन पर्वतच करंगळी उचलून। केले कृष्णाने सर्वांचे रक्षण।।९९।। इंद्राजवळील मेघ गेले संपून। कळले इंद्रास श्रीकृष्णाचे सामर्थ्य। आला इंद्र श्रीकृष्णास शरण। कृष्णाने अभयदान दिले तयास।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

# ।। चौथा अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीकृष्णा तुझी कथा सुंदर। यमुनातीरी जमविलास मेळ। झाले गोकुळ तवपदस्पर्शे पावन। धन्य ते गोकुळवासी जन।।१।। यमुनातीरी वनाचे दिव्य सौंदर्य। कैसे करावे त्याचे वर्णन शब्दात। शब्दही माझे होती कुसुम। श्रीकृष्ण चरीताचा होता स्पर्श।।२।। इंद्राचे गर्वहरण केले सहज। आला इंद्र सविनय शरण। पडले सर्वत्र सुवर्णमय किरण। पसरला लख्ख सूर्य प्रकाश।।३।। आले पर्वता बाहेर गोकुळ जन। ठेविला कृष्णाने भूवर गोवर्धन। समजले सर्वांसी कृष्णाचे सामर्थ्य। झाले गोकुळवासी प्रभावित।।४।। इंद्र अन् कामधेनू आले गोकुळी। एकांती इंद्राने वाहीला मुकुट चरणी। केली इंद्राने कृष्णाची खूप स्तुती। कामधेनुनेही कृष्णप्रशंसा केली।।५।। देवांच्या साक्षीने केला अभिषेक। कृष्णास नाव दिले 'गोविंद'। 'गो' म्हणजे इंद्रिये, इंद्रिये असे अर्थ। 'विन्द' म्हणजे जिंकणारा म्हणून 'गोविंद' ।६।। कार्तिकी एकादशीचे व्रत करुन। तिथी द्वादशी रात्री लागताच। गेला नन्दराजा यमुनेवर

स्नानास। होती ती वेळ असुरांची।।७।। होता तेथे वरुणसेवक राक्षस। नेले पकडून नंदास वरुण लोकास। नंद आला नाही घरी परत। करु लागले जन शोधाशोध।।८।। परी कुठेही सापडला नाही नंद। गेले सर्व श्रीकृष्णास शरण। ओळखले कृष्णाने तेंव्हाच तात्काळ। घेतले वरुणाने नंदाला ठेवून।।९।। गेला श्रीकृष्ण वरुण लोकास। वरुणाने तयास केला प्रणिपात। सेवकाने अजाणतेपणी आणले नंदास। म्हणून वरुणाने मागितली क्षमा।।१०।। केली वरुणाने भक्तिभावे कृष्णपूजा। परमेश्वर म्हणून नतमस्तक झाला। वरुण हा ही एक लोकपाल होता। होते अपार वैभव वरुणाचे।।११।। दिक्पाल वरुण करी पूजन। नंदास स्मरले गर्गमुनींचे वचन। स्वयं विष्णू अन् शेषची आहेत । प्रत्यक्ष जे कृष्ण अन् बलराम।।१२।। येता परत करी कृष्णस्वरुप वर्णन। आनंदले गोप झाले आश्चर्य चकित। बालरुपी राहती गोकुळी भगवंत। साचची असे आमुचे परमभाग्य।।१३।। विनविले त्या सर्वांनी श्रीकृष्णास। कराल का आम्हावरी कृपा आपण। घडवावे आम्हा सनातनरुप दर्शन। गोपांची विनंती कृष्णाने केली मान्य।।१४।। दाविले कृष्णाने मायातीत परमधाम। परम सत्य मायाविरहीत रुप। सनातन, सत्य, ज्ञानमय, अनंत। ज्योतिर्मय जे ब्रह्म हृदयाच्या अतीत।।१५।। ऐसे वेदवंदित परम अच्युतरुप। दाविले जे नसे सहजसाध्य। ऋषीमुनींनी युगानुयुगे तप करुन। मागितले कृष्णावतारात सानिध्य।।१६।। जन्मले ऋषीमुनी होऊनी

गोप। त्यांच्या सर्वशक्ती कृष्णाठायी विलीन। गोपांना, नंदाला भक्तांना म्हणून। दाविले कृष्णाने मायातीत रुप।।१८।। गेले ॠतु मागुन ॠतु शोभा दावित। झाल्या होत्या गोपी पूर्ण कृष्णमय। कृष्णविचारांनीच व्याप्त त्यांचे मन। होती अनन्य भक्ती अतिशय उत्कट।।१८।। होत्या त्या पूर्णपणे कृष्णसमर्पित। होत्या म्हणून नारदासही वंद्य। त्यांची अनन्यशरणता दिव्य अलौकिक। वंदय असती सकला म्हणून।।१९।। नंतर शरदाचे होता आगमन। शरद पुनवेस उजळले वृंदावन। गोपी मनाने जाहल्या कृष्णमय। जाहल्या आतुर त्या करण्या नर्तन।।२०।। कृष्णासह नर्तन गायन विहार। कृष्णासह क्रीडा करण्याची अपार। मनिषा त्यांची कृष्णाने जाणून। केली ती मनिषा सर्वार्थे पूर्ण।।२१।। असे त्यांची ती रासलीला अगाध। कैसी वर्णन करावी शब्दातून। त्यातील भाव साधण्याचा यत्न। करता होईल नरजन्माचे सार्थक।।२२।। दिला मिलनाचा कृष्णाने संकेत। आली ती शारदीय पुनवेची वेळ। या दिनी साधुनी औचित्य योग। दिले त्या रात्रीस दिव्यरुप।।२३।। पाहण्या कृष्णरुपी मधुर चंद्रास। आले चंद्रबिंबच आरक्त होऊन। तयाच्या किरणांनी शोभा रमणीय। झाली वृक्षवल्लीही मधुरोमधुर।।२४।। वाजवी श्रीरंग पावा अतिमधुर। जाहल्या गोपी बेधुदं सर्व। पडले गळून लोकमर्यादा भय। वृत्तिबंध सारे पडले गळून।।२५।। कानी सूर पडता बासुरीचे। गोपींनी हातीचे काम सोडले। निघाल्या वनाकडे त्या आवेगे। भगवंताकडे भाव ऐसा

लागावा।।२६।। म्हणे कृष्ण आल्या येथे कशा। नाही शोभत हे कुलीन स्त्रीला। आलात तुम्ही मज भेटण्याला। तेही तुमचे वर्तन योग्य नसे।।२७।। ऐकूनी गोपी झाल्या शोकविव्हळ। मुखे शब्द बोलणे झाले कठीण। नयनातून पाझरु लागले जल। करती विनवणी त्या कृष्णाची।।२८।। ऐकून त्यांची व्याकुळ विनवणी। बोलावले कृष्णाने त्यांना जवळी। आपण मध्यभागी उभा राहुनी। रंगविला तेथे अलौकिक रास।।२९।। जाहले धन्य सारे गोकुळवासी। अनुभवती दिव्य कृष्णसंगती। भक्तिरसात सारे गेले बुडुनी। कृष्णही तयासवें रमला आनंदे।।३०।। करी क्रीडा कृष्ण सवंगडयांसह। तेंव्हा एकदिनी घडे अवचित। आला अरिष्ट दैत्य वृषभरुपात। डरकाळया फोडीत गोकुळी शिरला।।३१।। गेला समोर श्रीकृष्ण तयास। मागे ढकलले शिंगे धरुन त्यास। पाडले सहज तयास भूमीवर। त्याच्याच शिंगाने केले ठार।।३२।। नारदे सांगितले तेंव्हा कंसास। असे कृष्ण देवकीचा अष्टम पुत्र। रोहीणीचा पुत्र असे बलराम। नाश करी तो साऱ्या दैत्यांचा।।३३।। रागाने कंसाने वसुदेव-देवकीस। टाकले बांधून त्यांस तुरुंगात। बोलाविले त्याने केशी दैत्यास। सांगितले बलराम - कृष्णास मारावे।।३४।। केले पाचारण मग अक्रुरास। सांगितले रथासह जावे गोकुळात। सांग बोलावणे त्या नंदराजास। यावे पाहण्या धनुष्ययाग - मल्लयुध्द।।३५।। धाडावे बलराम अन् श्रीकृष्णास। तैसेच यावे साऱ्यांनी उत्सवास। दयावे सर्वांना ऐसे हे निमंत्रण। सांगा साऱ्यांनी

यावे मथुरेस।।३६।। बलराम आणि कृष्णास मारुन। तैसेची देवपक्षपातींचा वध करुन। जरासंध बाणासुरादि असुरांसह। करीन मी साऱ्या पृथ्वीवर राज्य।।३७।। परी ठेवावे आमुचे मनोगत। तू तुझे हृदयीच केवळ गुप्त। करीन मी राज्यात तव सन्मान। कृष्णबलरामास ये घेऊन।।३८।। घेतले केशी दैत्याने अश्वाचे रुप। आला टापांनी भूमी हादरवित। आला रागाने कृष्णावर धावून। दूर फेकीले कृष्णाने त्यास पाय धरुन।।३९।। आपला डावा हात जबडयात घालून। वधिले कृष्णाने केशी दैत्यास। नंतर नारदाने कृष्णाकडे येऊन। सांगितले तयास कंस मनोगत।।४०।। गेले नारदमुनी स्वस्थानास। लागला श्रीकृष्णही स्वदिनक्रमास। असता गोपबालकासवे खेळत। आला व्योमासुर गोपबालकरुपात।।४१।। झाला सामील गोपबालकांच्या खेळात। मधुन मधुन उचली एकेकास। ठेवी त्याला तो गुहेत लपवून। करी बंद गुहा शिळा ठेवून।।४२।। नेऊ लागला उचलून तो कृष्णास। कृष्णाने पाडले त्याला पाठीवर दाबून। नंतर केला वध त्याचा गळा दाबून। केले मुक्त साऱ्या गोपबालकांस।।४३।। निघाला अक्रुर मग गोकुळाकडे। कृष्ण भेटणार म्हणून मन भरले मोदे। वज्रभूमीत येता मनी भाव दाटले। लागला लोळू भूवर भक्तीने।।४४।। आला अक्रूर नंदबाबाच्या वाडयात। पाहीले तेथे कृष्ण बलरामास। केले पुढे होऊन वंदन तयांस। नंदबाबाने अक्रुराचे केले स्वागत।।४५।। अक्रुराने सांगितले नंदबाबास। कळले कंसास कृष्ण देवकीचा पुत्र। त्याला मारण्यासच

धाडिले असुरांस। परी झाले व्यर्थ त्याचे यत्न।।४६।। आता धनुष्ययागाचे करुन निमित्त। मल्लाहस्ते त्यांना मारण्याचा बेत। दिले आहे निमंत्रण तुम्हा सर्वांस। पाठविले असे मज दूत म्हणून।।४७।। कृष्ण अन् बलरामाने दिली अनुमती। जाणार मथुरेस अक्रुरा संगती। नंदाने सांगितले गोकुळवासीयांसी। जायचे असे उद्या मथुरेसी।।४८।। गोपींची नायिका राधा सुंदर। राधा कृष्णाचे एकरुपत्व मनोहर। राधेला सांगितले कृष्णाने गूज। न पडावे बाहेर अश्रु नयनांतून।।४९।। राधेच्या काळजात भावनांचे काहूर। अशक्य होते थोपविणे अश्रुपूर। म्हणूनच राहून त्याक्षणी तेथून दूर। दिला तिने कृष्णास प्रेमाचा निरोप।।५०।। सांगतो परी ऐका राधा कोण। कृष्णासवे का गुंफीले जाते नाम। राधा म्हणजे नसे कोणी गवळण। राधा म्हणजे भक्तीच मूर्तिमंत।।५१।। कृष्णास प्रिय राधा स्वतःहून। राधा, राधा, गाई कृष्णाचे हृदय। भक्तांचा निवास भगवंताच्या हृदयीच। म्हणूनच वंदन करती राधाकृष्णास।।५२।। झाल्या गोपी दुःखी मनातून। रथ अडविण्याचा केला प्रयत्न। थोपविले कृष्णाने त्या सर्वांस। निघाले बलरामकृष्ण अक्रुरासवे।।५३।। आला अक्रुराचा रथ यमुनेजवळ। गेला अक्रुर यमुनास्नानास। मारली बुडी यमुनेच्या जळात। दिसले तेथे त्याला कृष्णबलराम।।५४।। आश्चर्याने त्याने पाहीले वर येऊन। कृष्णबलराम होते बैसले रथात। मारता बुडी पुन्हा यमुनाजळात। शेषशायी नारायणाचे झाले दर्शन।।५५।। आला बाहेर

अक्रुर जलातून। भक्तिभावाने मन गेले भरुन। मग कृष्णाची स्तुती गाऊन। भक्तिभावे केला कृष्णास प्रणाम।।५६।। आले सारे मथुरा नगरीत। येता येता झाला संध्यासमय। पाहून नगरीचे सारे वैभव। गेले ते अक्रुराघरी वस्तीस।।५७।। दुसरे दिनी होते फिरत गोपांसह। वाटेत भेटला राजाचा रजक। कृष्णाने मग सांगितले तयास। द्यावी सुंदर वस्त्रे तू आम्हास।।५८।। होता तो धोबी फार उध्दट। नाही दिली वस्त्रे श्रीकृष्णास। कृष्णाने त्याच्यावर करुन मुष्टीप्रहार। पाठवले तयास यमसदनास।।५९।। कृष्णबलरामाने ती वस्त्रे घेऊन। दिली गोपबालकांस वाटून। नंतर एक शिंपी भेटला तयांस। त्याने वस्त्रे नीट शिवून दिली।।६०।। कंसाचा माळी सुदामा होता। त्याने दिल्या सर्वांस फुलांच्या माळा। निरंतर भक्तीचा त्यास वर मिळाला। शिंप्यासही कृष्णाने सारुप्य मोक्ष दिला।।६१।। कुबड असलेली कुब्जा नाम दासी। कृष्णबलरामास वाटेत भेटली। तिने लेप अन् सुगंधी उटी दिली। कृष्णाने पाय दाबून सरळ केले तिज।।६२।। पोहोचला कृष्ण धनुष्ययाग स्थानी। होते पुष्कळ सैनिक रक्षणासी। मधून घुसून कृष्ण गेला पुढती। उचलले कृष्णाने धनुष्य हाती।।६३।। दोरी चढविण्यासाठी धनुष्यास। वाकविता काडकन् मोडले धनुष्य। सैनिक धावले कृष्णाच्या अंगावर। कृष्णाने मारुन टाकले तयांस।।६४।। कंसाच्या कानी पडत होते वृत्त। मारले कृष्णाने त्याच्या धोब्यास। केला श्रीकृष्णाने धनुष्य भंग। होत होता त्याचा सर्वत्र सत्कार।।६५।। उडाली

कंसाची सारी झोप। वाटले उगाच बोलावले यांस। मारीला आपल्या हाताने मीच। धोंडा आपुले स्वतःचे पायावर।।६६।। दुसरे दिनी मल्लयुध्दासाठी। उसळली होती गर्दी मोठी। मंडलेश्वर कंस उच्च सिंहासनी। नंदगोपांनी अर्पण केल्या भेटी।।६७।। आले कृष्ण बलराम महाद्वारी। द्वारापाशी होता कुवलयापीड हत्ती। माहुताने तेंव्हा डिवचले हत्तीशी। गेला चाल करुन तो कृष्णावरी।।६८।। कृष्णाने त्याची शेपूट धरुन। फिरविले हत्तीस गरगर गरगर। मग त्याचाच एक दात उपटून। त्या दातानेच हत्तीस मारले ठार।।६९।। घुसले मंडपात बलराम कृष्ण। भिडले तयास मुष्टिक, चाणूर। बलरामाने तेंव्हा मारले मुष्टिकास। कृष्णाने चाणुरासी मारले ठार।।७०।। कृष्णाने मारले तोशल व कूटमल्ल। मंडपातले यादव करती जयकार। ऐकून तयांचा ओरडा गोंधळ। कंस गेला भीतीने विसरुन।।७१।। सांगितले कृष्णरामास कैद करण्यास। कृष्णाने कंसावर घातली झडप। पाडीले सिंहासनावरुन खाली जोरात। कृष्णाने वज्रमुष्टीने मारीले कंसास।।७२।। लाभले कंसास कृष्णाहाती मरण। त्याची प्राणज्योत मिसळली कृष्णात। कंसाचे आठभाऊ पडले तुडून। त्या सर्वांसही बलरामकृष्णाने मारीले।।७३।। आले बलरामकृष्ण कारागृहात। केले मुक्त त्यांनी वसुदेवदेवकीस। केला दोघांनी मातापित्यास प्रणाम। मातापित्याने दिले प्रेमे आलिंगन।।७४।। कृष्णाने राज्यभिषेक उग्रसेनास करुन। सारे यदु, वृष्णी अंधकादि बोलावून। न्यायाचे राज्य मथुरेत स्थापून।

केले श्रीकृष्णाने आनंदी सर्वांस।।७५।। बलरामकृष्णाचे करुन उपनयन। वसुदेवाने पाठविले विद्याभ्यासास। गेले ते सांदीपनी ऋषींच्या आश्रमात। करु लागले तेथे विद्याभ्यास।।७६।। चौदा विद्या चौसष्ट दिवसांत। शिकून झाले ते विद्यापारंगत। ऋषींचा मृतपुत्र यमलोकातून आणून। दिली गुरुदक्षिणा आपुल्या गुरुंसी।।७७।। आले उभय परतून मथुरेस। कृष्णाने मग सांगितले उध्दवास। जाऊनी त्वरिती तू गोकुळात। भेट माझ्या नंदबाबा अन् यशोदामातेस।।७८।। झाल्या असतील गोपी दु:खित। करी बाबा तू तयांचे सांत्वन। दिले असे मी परत येण्याचे वचन। असतील त्या वाटेकडे डोळे लावून।।७९।। सांग त्यांना माझ्या प्रेमाचा निरोप। जरी असलो मी देहाने मथुरेत। आहे आत्मरुपाने मी सर्वत्र। असती माझे भक्त प्रिय मज।।८०।। नंदबाबाने केले उध्दवाचे स्वागत। जाहले नंद आणि यशोदा हर्षित। पूसले प्रेमाने कृष्णाचे क्षेमकुशल। करु लागले ते कृष्णलीला वर्णन।।८१।। उध्दव नंतर म्हणाला तयांस। श्रीकृष्ण सर्व प्राणीमात्रात करी निवास। तो तुमचा तसा असे सर्वांचाच पुत्र। असे तोच आत्मा आणि ईश्वर।।८२।। दुसरे दिनी आल्या गोपी धावून। म्हणाल्या तू तर श्रीकृष्णाचा पार्षद। नको करुस तू आमुचे सांत्वन। आमच्या हृदयातच कृष्ण असे।।८३।। करु लागल्या त्या कृष्णलीला वर्णन। हसता हसता करती त्या रुदन। पाहून उध्दव म्हणाला तयांस। असा तुम्ही सर्वस्वी कृष्णास समर्पित।।८४।। खरोखरी तुम्ही आहात कृतार्थ। असा

तुम्ही सर्व लोकांना पूज्य। केली सर्वश्रेष्ठ भक्ती संपादन। तुमच्या भक्तीने झालो मी पावन।।८५।। सांगतो कृष्णाचा प्रेमळ निरोप। असे आत्मरुपाने तो तुमच्यातच। असे सर्वत्र स्थावर जंगम पदार्थात। असे तो गुणरुपाने सर्वा व्यापून।।८६।। उध्दवाने सांगितला गोपींस निरोप। गोपींनी सांगितल्या कृष्णलीला अनेक। ऐकून उध्दव बुडाला भावावस्थेत। लागला करु तो कृष्णाचे गुणगान।।८७।। म्हणाला उध्दव स्वतःचे मनात। सर्व वेद, उपनिषदे, योग अन् याग। टाकावेत या गोपींवरुन ओवाळून। खरे तर कृष्णाने उघडले माझे नयन।।८८।। निघाला परत उध्दव गोकुळातून। जमले गोपगोपी त्याचे रथाजवळ। डोळयातून त्याच्या यमुनाच वाहात। गोपांनाही झाले अश्रु अनावर।।८९।। म्हणाल्या तेंव्हा गोपी उध्दवास। आमच्या सर्व उर्मी, वृत्ती अन् संकल्प। वाहीला जावा प्रत्येक कृष्णचरणीच। मोक्षाची इच्छा नसेच आम्हास।।९०।। आला परतून उध्दव मथुरेत। होता कृष्ण त्याची वाट पाहात। दिले त्याने उध्दवाला प्रेमालिंगन। विचारले मातापित्यांचे कुशल।।९१।। विचारले कृष्णाने गोपींचे कुशल। ऐकून उध्दवास झाला आनंद। देऊन सर्वांना दिलेल्या भेटवस्तू। क्षेमसमाचार सांगत घालविली रात्र।।९२।। म्हणे उध्दव धन्य गोपी, गोप धन्य। ऐसी परमभक्ती कैसी लाभेल। झाला उध्दव अतिशय व्याकुळ। म्हणे जाहलो धन्य मी त्यांच्या सवे।।९३।। नंतर कृष्ण म्हणाला उध्दवास। केलेस माझे काज तू मम भक्त। करतील जगी सारे तुझा

सन्मान। अभेद दृष्टी तुज होईल प्राप्त।।९४।। कृष्णाने बोलावून सांगितले अक्रुरास। तुम्ही गुरुस्थानी, वृध्द, वंदनीय। ज्ञानी तुम्ही देवापेक्षाही श्रेष्ठ। नसे तुमच्या मनी कोणता स्वार्थ।।९५।। करतो एक विनंती तुम्हास। जावे आता आपण हस्तिनापुरात। झाले असे आता पंडुचे निधन। असती पांडव धृतराष्ट्राच्या आश्रयास।।९६।। कृष्णाज्ञेने अक्रुर गेला हस्तिनापुरास। भेटला तो कुंती अन् विदुरास। कथिला त्यांनी कौरव शकुनी स्वभाव। वर्णिली धृतराष्ट्राची अगतिकता।।९७।। भेटला अक्रुर धृतराष्ट्रास। पांडवांशी समानतेचा केला उपदेश। नाही झाला धृतराष्ट्रवर परिणाम। आपली व्यथाच दाविली बोलून।।९८।। परतला अक्रुर मथुरेस यथावकाश। सांगितले वृत्त कृष्ण बलरामास। सांगितले कुंती पाहते तुझी वाट। तूच सोडवशील त्यांस संकटातून।।९९।। असे श्रीकृष्ण सर्वांचाच त्राता। असे तो खरा भक्तांचा सखा। श्रीकृष्णच असे सर्वांचा धर्ता। करी रक्षण भक्तांचे आपुल्या।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। पाचवा अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे विघ्नहर्त्या गणेशासी। करावी पूर्ण ही कृष्णनवशती। ठेवूनी वरदहस्त मम शिरावरती। द्यावी मती कृष्णलीला वर्णनासी।।१।। स्वामी समर्थांचा लाभला कृपाकर। त्या सामर्थ्येची नवशती साकारेल। मधुर कृष्णचरीत्र करण्या वर्णन। लाभले शब्द सामर्थ्य मजसी।।२।। केला कृष्णाने कंसासुराचा वध। केले ठार त्याचे बंधुही सर्व। स्थापिले मथुरेत न्यायाचे शासन। झाले सारे मथुरावासी आनंदित।।३।। परी कंसासुराला मारीले कृष्णाने। पत्नी अस्ति, प्राप्ती गेल्या पित्याकडे। सांगितले तयास आपुले गाऱ्हाणे। ऐकून पिता जरासंध झाला प्रक्षुब्ध।।४।। जमविले तेवीस अक्षौहिणी सैन्य। दिला वेढा त्याने मथुरा नगरीस। अफाट विशाल ती सेना पाहून। झाले चिंतीत मथुरावासी जन।।५।। केले श्रीकृष्णाने मनातच चिंतन। म्हणे माझ्या अवताराचे काय प्रयोजन। करुनी साऱ्या दुष्टांचे निर्दालन। करावा हलका भूमातेचा भार।।६।। जमविले जरासंधाने चतुरंग सैन्य। या सैन्याचाच नाश करावा प्रथम। मारु नये रणी जरासंधास।

म्हणजे तो परत ससैन्य येईल।।७।। इतक्यात कृष्णाच्या दृष्टी समोरच। सूर्यासारखे तेजस्वी दोन रथ। उतरले दोन्ही खाली आकाशातून। उभे ठाकले ते रथ कृष्णासमोर।।८।। होता सज्ज सारथी अन् शस्त्रांसह। म्हणाला कृष्ण बंधु बलरामास। कोसळले असे यादवांवर मोठे संकट। आला असे रथ सारथी आयुधांसह।।९।। करावे युध्द तुम्ही या रथी बैसून। सोडवावे यादवांना संकटातून। व्हावे कृतार्थ स्वजनांस उध्दरुन। दुष्ट निर्दालनास्तव आपला अवतार।।१०।। ऐसी सल्लामसलत बंधुसह करुन। मग दोघे बंधू कवच धारण करुन। बैसले रथात आपापली आयुधे घेऊन। निवडक सैन्यासह पडले बाहेर नगरीतून।।११।। वाजविला कृष्णाने पाञ्चजन्य शंख। शत्रुंच्या हृदयाचा झाला थरकाप। कृष्णाला तेंव्हा म्हणाला जरासंध। अल्पवयी एकटा तू जा परतून।।१२।। जरासंध मग म्हणाला बलरामास। जर असेल तवठायी आत्मविश्वास। तैसेची जर तुझी इच्छाच असेल। तरची करी युध्द धैर्य एकवटून।।१३।। श्रीकृष्ण मग म्हणाला जरासंधास। नकोत वल्गना दावी पराक्रम। ऐकून बहुक्रोधिष्ठ झाला जरासंध। विशाल सेनेसहाय्ये झाकले दोघांस।।१४।। कृष्णाने बाणाचा टणत्कार करुन। केला शत्रुसैन्याचा नाश बाणे करुन। बलरामानेही मुसलाने मग वेगे करुन। केला जरासंध सैन्याचा विनाश।।१५।। मारले गेले जरासंधाचे सारे सैन्य। जरासंधाचा रथही गेला मोडून। बलरामानेही पकडले जरासंधास। परी कृष्णाने दिले तयास सोडून।।१६।। लज्जित जरासंध

निघाला वनात। परी शिशुपालादि राजे म्हणाले अडवून। झालेला हा पराभव दे तू सोडून। असेल तो पूर्वकर्मबंधनाचा विषक।।१७।। गेला मग जरासंध मगध देशास। रक्षुन स्वसैन्य केला कृष्णाने शत्रुनाश। मथुरेतील जन करती विजयगान। झाला मथुरेत मोठा आनंदोत्सव।।१८।। तेवीस अक्षौहिणी सैन्य घेऊन। सतरावेळा युध्द केले जरासंधाने येऊन। कृष्णनीतीने टाकले ते सैन्य मारुन। होता परतत जरांसध निराश होऊन।।१९।। नारदाने पाठवला कालयवन वीर। आला तो तीन कोटी सैन्य घेऊन। टाकले त्याच्या सैन्याने मथुरेस वेढून। केला कृष्णाने बलरामासह विचारविनिमय।।२०।। असे दोन्ही बाजूंनी यादवांवर संकट। कालयवनाने दिला वेढा ससैन्य। गुंतलो जर आपण कालयवतरणात। येईल जरासंधही मथुरेवर चालून।।२१।। येईल तो विशाल सेना घेऊन। यादवबांधवांना टाकेल तो मारुन। म्हणून आपण अभेदय किल्ला बांधून। ठेवू या आप्तजनांना सुरक्षित।।२२।। केली त्याने समुद्रात द्वारका उत्पन्न। विश्वकर्म्याचे वास्तु आणि शिल्प कौशल्य। येते दिसून भव्य नगरीच्या रचनेतून। निर्मिले रस्ते, चव्हाटे आणि बाजार।।२३।। इंद्राने प्रेषिले सुधर्मा नाम सभागृह। पाठविला इंद्राने पारिजातक वृक्ष। नंतर श्रीकृष्णाने योगसामर्थ्य वापरुन। नेले मथुरावासीयांना द्वारका नगरीत।।२४।। नंतर बलरामास प्रजापालनास ठेवून। निघाला नगराबाहेर कृष्ण कमळ घेऊन। ओळखले कालयवनाने श्रीकृष्णास। झाला तोही कृष्णासम स्वत: नि:शस्त्र।।२५।।

लागला कृष्ण पळू पाठमोरा होऊन। त्याचा पाठलाग करी कालयवन। पळत पळत नेले कृष्णाने गुहेपर्यंत। नंतर कृष्णाने केला गुहेत प्रवेश।।२६।। कालयवनही गेला मागोमाग गुहेत। कृष्णाने झाकला शेला तेथील निद्रिस्तावर। वाटले कालयवनास झोपेचे सोंग घेऊन। पडला असे कृष्ण शेला पांघरुन।।२७।। कालयवनाने मारली एक लाथ। ओढला शेला त्याच्या अंगावरुन। जागा झाला त्यामुळे निद्रिस्त पुरुष। कालयवनास पाहून झाला संतप्त।।२८।। होते वरदान तयाला इंद्राकडून। नाव होते त्याचे राजा मुचकुंद। होता दमला तो देवांसाठी युध्द करुन। मागितले दीर्घ निद्रेचे वरदान।।२९।। झोपला होता तो या गुहेत येऊन। देवांनी दिले होते त्याला वरदान। जागा जो करिल तुज झोपेतून। तुझी दृष्टी पडता होईल जळून भस्म।।३०।। होते ठाऊक हे सारे कृष्णास। करण्या मुचकुंद राजाचा उध्दार। केले श्रीकृष्णाने असे कारस्थान। कालयवन गेला क्रोधाग्नीत जळून।।३१।। पराक्रमी मुचकुंदास दर्शन देऊन। दाखविले कृष्णाने स्वतःचे सत्य स्वरुप। त्याला भगवद्चिंतन अन् तपश्चर्येस। पाठवून केला मुचकुंदाचा उध्दार।।३२।। करुनी राजा मुचकुंदाचा उध्दार। आला जेंव्हा श्रीकृष्ण गुहेबाहेर। माणसे पशुपक्ष्यादि सृष्टी सकल। दिसली त्यास होत होती सान।।३३।। जाणले कृष्णाने आता कलीयुग। येत असे नक्की जवळ जवळ। होते वेढा देवून कालयवनाचे सैन्य। केला कृष्णाने त्यांचा संहार।।३४।। ठेवले त्यांचे धन द्वारकेत नेऊन। तेंव्हा जरासंध आला सेनेसह।

लागले पळू बलराम अन् कृष्ण। चढले जाऊन ते प्रवर्षण पर्वतावर।।३५।। जरासंधाने दिला पर्वत पेटवून। गेले बलराम कृष्ण द्वारकेस उडी मारुन। वाटले जरासंधास गेले ते जळून। आला परत तो स्वराजधानीस।।३६।। अनर्त देशाचा राजा रैवत। दिली आपुली कन्या बलरामास। रेवती - बलराम यांचा झाला विवाह। झाला सुरु बलरामाचा गृहस्थाश्रम।।३७।। विदर्भचा राजा होता भीष्मक। होते त्याला पाच पराक्रमी पुत्र। रुक्मी, रुक्मरथ, रुक्मेश, रक्तबाहु। आणि पाचव्याचे रुक्ममाली होते नाम।।३८।। या पाचही भावांहून वयाने सान। होती रुक्मिणी नाम कन्या सुंदर। होती सुलक्षणी ती लक्ष्मीचा अवतार। नारदमुखे केले होते कृष्णलीला श्रवण।।३९।। झाली कृष्ण - पराक्रमावर मोहीत। केला मग तिने स्वत:शीच निश्चय। घालीन मी वरमाला केवळ कृष्णास। वरीले होते तिने मनाने तयास।।४०।। भीष्मक देऊ इच्छित होता कृष्णास। परी जेष्ठ पुत्र रुक्मी करी कृष्णद्वेष। पित्याची आज्ञा सर्वथा धुडकारुन। ठरवीला त्याने रुक्मिणीचा विवाह।।४१।। चेदी देशाचा राजकुमार शिशुपाल। त्याच्या समवेत केला विवाह - निश्चय। मनातुन रुक्मिणी झाली खिन्न। सांगितले मातेस तिने मनोगत।।४२।। भावपूर्ण पत्र लिहीले तिने कृष्णास। केली तयास प्रार्थना मनापासून। असे आपुला पराक्रम सर्वश्रुत। आपुले चरणी जडले माझे चित्त।।४३।। वरले मनोमनी मी फक्त तुम्हास। जर असेल रुजु माझे मनोगत। आपण स्वतः

येऊन करा पाणिग्रहण। तुमचे चरणी असे नम्र निवेदन।।४४।। प्रेषिले रुक्मिणीने द्विजाहस्ते पत्र। मिळाले कृष्णास हे विनंती पत्र। विवाह तयारी सुरु होती जोमात। परी रुक्मीचे मन होते साशंक।।४५।। विवाह पूर्वदिनी रुक्मिणी अंबिका मंदिरात। अठरा सव्वाशीर्णींसह गेली पूजनास। मंदिरा भोवती असे कडक बंदोबस्त। केले रुक्मिणीने अंबिकेचे पूजन।।४६।। केले रुक्मिणीने भावभक्तिने वंदन। अंबिकेची माला आली हातात। जाणूनी हा असे शुभ संकेत। हाती घेऊन घाली प्रदक्षिणा।।४७।। पाहूनी रुक्मिणीचे स्वर्गीय लावण्य। रुक्मी सेवकांचे हरपले देहभान। पाहिला रुक्मिणीने गरुडध्वजरथ। कृष्णाचे रुप बहु आकर्षक।।४८।। आला कृष्ण रथातून तिजजवळ। हातातील माला घातली तिने तयास। करुनी उजवा हात पुढे कृष्णाने तेंव्हाच। केले पाणिग्रहण रुक्मिणीचे।।४९।। घेतले श्रीकृष्णाने तिजसी रथात। नंतर तो म्हणाला रुक्मिणीस। आलो येथे मी तुझ्या विनंती वरुन। केले असे मी तुझे पाणिग्रहण।।५०।। आता तूच करी रथाचे सारथ्य। नाहीतर तुझ्या भावास वाटेल। नेत असे मी तुज येथून पळवून। रुक्मिणी हाती सोपविले लगाम।।५१।। होती रुक्मिणी क्षात्र तेजाने युक्त। वेगात हाकू लागली ती रथ। आले हळूहळू रुक्मीसेवक भानावर। झाला एकच गलका अन् बोभाट।।५२।। रुक्मी रागाने करी रथाचा पाठलाग। झाले कृष्ण आणि रुक्मीमध्ये युध्द। कृष्ण पराक्रम पाहून रुक्मिणी मुदीत। आला तेंव्हाच रुक्मी

कृष्णासमोर।।५३।। रुक्मिणीने तेंव्हा कृष्णाचे पाय धरुन। मागितले आपल्या भावास जीवदान। ऐकून आपुल्याच स्त्रीचा हट्ट। दिले कृष्णाने रुक्मीस सोडून।।५४।। आला श्रीकृष्ण रुक्मिणीस घेऊन। मिळाले त्यांना माता -पित्याचे आशीर्वचन। झाला थाटामाटात विवाह संपन्न। इकडे जरासंधाने केले शिशुपाल सांत्वन।।५५।। कृष्णाचा विवाह झाला थाटात। परी वाढला नाही तयासह प्रथम पुत्र। लीलास्वामीची असे लीला अगाध। सांगतो तुम्हा ती हकीगत।।५६।। देवाज्ञेने गेला कामदेव शिवासमोर। करण्या शंकराची समाधी भंग। परंतु झाला त्याचा विपरीत परीणाम। शिव ज्ञानाग्नीने झाला तो दग्ध।।५७।। स्थूल देह मदनाचा गेला जळून। परंतु लिंगदेह मात्र न झाला मुक्त। रुक्मिणी उदरी गेला वासनात्मक देह। जन्मानंतर नाव ठेवले प्रद्युम्न।।५८।। शंबरासुराने ऐकली होती आकाशवाणी। तुझा मुत्यु कृष्णपुत्र प्रद्युम्नाहाती। शंबरासुराने नेले पळवून त्यासी। नेऊन समुद्रात दिले फेकून।।५९।। माशाने एका त्या गिळीले बाळास। मिळाला तो मासा एका कोळयास। विकला मासा कोळयाने शंबरासुरास। असुराने दिला तो दासी मायवतीस।।६०।। माशाच्या पोटात मिळाले बालक। शंबरासुराने दिले मायावतीस सांभाळण्यास। नारदाने तेंव्हा सांगितले मायावतीस। असे हा बालक अतिशय असामान्य।।६१।। असे तो कृष्णरुक्मिणीचा पुत्र। असे हा पुत्र प्रत्यक्ष मदनच। असे मायावती रतीच प्रत्यक्ष। तो तरुण होताच होईल मिलन।।६२।। झाला

आता प्रद्युम्न तो तरुण। सांगितली मायावतीने त्यास हकीगत। करणार असे तोच शंबरासुरवध। महामायी विद्या तिने दिली त्यास।।६५।। केला प्रद्युम्नाने शंबरासुराचा वध। देवर्षी नारदाने सांगितले वृत्त कृष्णास। झाला कृष्णरुक्मिणीस फार आनंद। झाला त्यांना पुत्रलाभ सुनेसह।।६४।। केले श्रीकृष्णाने अनेक विवाह। सांगतो ती सारी माहिती तुम्हास। सांगतो राजा सत्राजिताचे वृत्त। दिला सूर्याने स्यमंतक मणी त्यास।।६५।। तो मणी भूषणांसह कंठात लेवून। आला सत्राजित द्वारका नगरीत। मण्याच्या तेजामुळे वाटला तो सूर्यच। आला असे तो कृष्ण दर्शनास।।६६।। श्रीकृष्णाच्या घरी आला सत्राजित। केला श्रीकृष्णाने मोठा मंगलोत्सव। केली मण्याची स्थापना देवघरात। होता तो मणी प्रभावी, तेज:पुंज।।६७।। करीत होता उत्पन्न तो प्रतिदिन। आठभार म्हणजे सोने चौसष्ट हजार। तो असता नव्हते दृष्काळ संकटभय। होता मण्याचा मंगलमय प्रभाव।।६८।। एकदा कृष्णाने मागितले मण्यास। पण सत्राजिताने दिला स्पष्ट नकार। एके दिनी सत्राजिताचा बंधु प्रसेन। मृगयेसाठी गेला होता अरण्यात।।६९।। सिंहाने मारले घोडयासह त्यास। घेतला कंठातून स्यमंतक मणी हिरावून। शिरु लागला सिंह पर्वत गुहेत। जांबवान अस्वलाने मण्यास्तव मारले त्यास।।७०।। जांबवान गुहेत गेला मणी घेऊन। दिला त्याने तो मणी मुलास खेळण्यास। इकडे सत्राजित झाला दु:खित। बंधु प्रसेन आला नाही परत।।७१।। प्रसेनाने स्यमंतक घातला होता गळयात। कृष्णाने

मण्यास्तव मारले असेल ठार। झाली लोकांतही कुजबुज फार। निघाला श्रीकृष्ण मणी शोधण्यास्तव।।७२।। पाहीले श्रीकृष्णाने तेंव्हा जंगलात। मारले गेलेले घोडा आणि प्रसेन। होती गुहा थोडयाच अंतरावर। शिरला मग श्रीकृष्ण त्या गुहेत।।७३।। पाहुन तो मणी मुलाच्या खेळण्यात। राहीला उभा श्रीकृष्ण मुला जवळ। घाबरली त्याची आई कृष्णास पाहून। ओरडली भीतीने ती जोरात।।७४।। आला रागाने तेथे जांबवान। नाही ओळखले त्याने श्रीकृष्णास। करु लागला तो कृष्णासह युध्द। अठ्ठावीस दिवस चालले युध्द।।७५।। कृष्ण प्रहारांनी सुटला त्यास घाम। झाला नंतर तो एकदम चकित। म्हणे आपण सर्वांचे प्राण अन् बळ। ओळखले विष्णुच आहात आपण।।७६।। ठेवला कृष्णाने वरदहस्त मस्तकावर। म्हणाला आलो स्यमंतक मणी शोधत। त्यायोगाने आला खोटा आळ मजवर। त्यासाठीच आलो मी तव गुहेत।।७७।। ऐकले जांबवानाने कृष्णाचे वचन। देऊ केला स्यमंतक मणी कृष्णास। जांबुवती नाम स्वकन्या केली अर्पण। झाला कृष्णाचा दुसरा विवाह।।७८।। आला कृष्ण जांबुवतीसह द्वारकेस। बोलावले त्याने राजा सत्राजितास। केले सर्व वृत्त सत्राजितास निवेदन। परतला सत्राजित पश्चातापदग्ध होऊन।।७९।। कृष्ण बलरामाशी द्रोह केल्याने घाबरुन। करण्यासाठी आपल्या पापाचे क्षालन। लावण्यवती कन्या सत्यभामा नाम। अर्पून कृष्णास दिला स्यमंतक मणीही त्यास।।८०।। झाला श्रीकृष्णाचा तृतीय विवाह संपन्न। नाही

स्वीकारला परी मणी स्यमंतक। म्हणाला असा तुम्ही सूर्याचे भक्त। हा मणी तुमचेच जवळ असणे योग्य ।।८१।। पांडव जळून गेल्याचे आले वृत्त। होते श्रीकृष्णास ठाऊक सत्य। ऐकून कुळाचार म्हणून सांत्वनास। बलरामासह कृष्ण गेला हस्तिनापुरास ।।८२।। इकडे अक्रुर अन् कृतवर्मा शतधन्व्यास। म्हणाले सत्राजिताने कन्या देतो सांगून। केली असे तुझी ऐसी फसवणूक। तू ही घे त्याच्याकडून स्यमंतक हिसकावून।।८३।। ऐकूनी त्या दोन्ही मित्रांचे कथन। शतधन्व्याने केला सत्राजिताचा वध। त्याच्याकडचा स्यमंतक घेऊन गेला निघून। सत्यभामेला समजले हे वृत्त।।८४।। ऐकून आली कृष्णाकडे हस्तिनापुरात। मग तिजसवे कृष्ण आला द्वारकेत। शतधन्व्याने मणी ठेवला अक्रुराजवळ। घोडयावर बसून तो गेला पळून।।८५।। श्रीकृष्णाने केला शतधन्व्याचा पाठलाग। आपल्या चक्राने उडवले त्याचे मस्तक। स्यमंतक मणी नाही मिळाला त्यास। ऐकून अक्रुर गेला द्वारकेबाहेर।।८६।। कृष्णाने अक्रुरास घेतले बोलावून। तुमच्याकडे आहे मणी स्यमंतक। आमचे कडे तो असावा वाटते बांधवांस। तो मजकडेच आहे हे त्यांना दाखवू।।८७।। अक्रुराने दिला स्यमंतक कृष्णास। दाखविला कृष्णाने तो सर्व बांधवांस। करुनी आपल्या बांधवाचे समाधान। दिला कृष्णाने तो परत अक्रुरास।।८८।। आला श्रीकृष्ण नंतर इंद्रप्रस्थास। राहीला पावसाळयात तो तेथेच। गेले असता अर्जुनासह जल पिण्यास। पाहीली तेथे त्यांनी सुंदर युवती।।८९।। अर्जुनाने

विचारला तिज परीचय। 'सूर्यकन्या कालिंदी' असे मिळाले उत्तर। हवा असे मला पती श्रीविष्णुच। पूर्ण होईपर्यंत तप करीन येथेच।।९०।। इकडे खांडवन दहन समयी केले रक्षण। मयासुराने दिले मयसभागृह बांधून। नंतर मग पांडवांचा निरोप घेऊन। आला श्रीकृष्ण कालिंदीसह द्वारकेस।।९१।। केला कृष्णाने विवाह कालिंदीसह। जाहला कृष्णाचा चौथा विवाह संपन्न। अनविन्द राजाची मित्रविंदा नामे बहीण। मांडले अनविन्दाने तिचे स्वयंवर।।९२।। मित्रविन्दाने वरीले श्रीकृष्णासच। जाहला कृष्णाचा पाचवा विवाह। कोसल देशाचा राजा नग्नजित। त्याची बहीण होती सत्या नाम।।९३।। नग्नजिताने लावला विचित्र पण। जो एकाचवेळी सात बैलांस घालील वेसण। कृष्णाने सहज जिंकला हा पण। जाहला कृष्णाचा सहावा विवाह संपन्न।।९४।। श्रुतकीर्ती होती श्रीकृष्णाची आत्या। तिजसी होती भद्रानामे कन्या। ती देऊ केली तिने श्रीकृष्णाला। जाहला श्रीकृष्णाचा सातवा विवाह।।९५।। द्वारके समीप होता भद्रदेश। राजाची कन्या होती लक्ष्मणा नाम। लावला त्याने मत्स्यभेदाचा पण। श्रीकृष्णाने जिंकला राजाचा पण।।९६।। झाला श्रीकृष्णविवाह लक्ष्मणा समवेत। ऐसा झाला आठवा विवाह संपन्न। झाले कृष्णाचे ऐसे विवाह आठ। आणखीही १६१०० होत्या भार्या।।९७।। भौमासुर दुष्टाचा करुनी वध। केल्या त्याच्या साऱ्या दासी मुक्त। स्वीकारुन त्या सर्वांचे केले रक्षण। तरीही श्रीकृष्ण होता विरक्त।।९८।। सांगतो

आता आठ विवाह रहस्य। रुक्मिणी म्हणजे माया - अभिन्न शक्ती। जांबुवती दृढनिश्चय, सत्यभामा म्हणजे। सत्याचे ज्ञान देणारी, सामर्थ्यशाली।।९९।। मित्रविंदा मैत्रीप्रेम, सत्या सत्याचरण। भद्रा कल्याणी लक्षणा एकाग्रता। १६१०० असती जीवाच्या चंचल वृत्ती। असे या सर्वांचाच स्वामी श्रीकृष्ण।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। सहावा अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्था माझ्या नाथा। ठेविला तुमचे चरणी माथा। देऊनी स्फूर्ती कृपावंता। करवावे श्रीकृष्णचरित्र वर्णन।।१।। श्रीकृष्ण चरित्र जणु महासागर। न लागे त्याचा कवणापार। परी करीता कृष्णचरित्र श्रवण। होती सर्व अंतर्बाह्य पवित्र।।२।। श्रीकृष्णाच्या विवाहांचे रहस्य। घेतले आपण सर्वांनी जाणून। आता वदविणार श्रीकृष्णाचे वर्णन। स्वामी समर्थ ह्या गणेशा हस्ती।।३।। बांधुनी बुचडा आपुल्या वृत्तींचा। घेऊन समवेत ज्ञान भक्ती सूत्राला। अनुभवु आपण श्रीकृष्णलीला। असती ज्या अतिमधुर पावन।।४।। होता श्रीकृष्णाचा गृहस्थाश्रम। अतिशय समृध्द, सुखसंपन्न। त्याच्या प्रत्येकी राण्यांना सर्वांस। होते दहा, दहा पुत्र जीवनी।।५।। सांगतो नामे त्यातील काही पुत्रांची। जे होते पुत्र आठ पट्टराण्यांसी। परी लक्षात ठेवावे सर्वांनी। श्रीकृष्ण विरक्त होता यातुनही।।६।। रुक्मिणीचे पुत्र प्रद्युम्न, चारुदेष्ण। सुदेष्ण, चारुदेह, सुचारु, चारुदत्त। भद्रचारु, चारुचंद्र, विचारुचारु। होती सुंदर कन्या, चारुमती नामे।।७।। सांब, सुमित्र, पुरुजित, शतजित। सहस्रजित, विजय, चित्रकेतु,

वसुमान। द्रविण, क्रतु ऐसे अष्टपुत्र। जांबुवती नावाच्या पत्नीस होते।।८।। वीर, चंद्र, अश्वसेन, चित्रगु। वेगवान, वृष, आम, अन् शकु। वसु आणि कुंती सत्याचे पुत्र। सत्या होती नग्नजिताची कन्या।।९।। श्रुत, कवि, वृष आणि वीर। सुबाहू, भद्र, शांती अन् दर्श। पूर्णमास अन् सोमक कालिन्दि पुत्र। होती कालिन्दी सूर्यपुत्री।।१०।। प्रघोष, गात्रवान, सिंह आणि बल। प्रबल, ऊर्ध्वग, महाशक्ति आणि सह। ओज आणि अपराजित हे लक्ष्मणापुत्र। होती भद्रदेश राजकुमारी।।११।। वृक, हर्ष, अनिल आणि गृध्र। वर्धन, अन्नाद, महाश अन् पावन। वह्नि आणि क्षुधि मित्रविंदा सुत। मित्रविंदा होती अवंतिका राजभगिनी ।।१२।। संग्रामजित, बृहत्सेन, शूर, प्रहरण। अरिजित, जय, समुद्र अन् वाम। आयु आणि सत्यक हे भद्रासुत। होती भद्रा कृष्णाची आतेबहीण।।१३।। होत्या कृष्णाच्या सोळाहजार एकशे भार्या। दहा - दहा पुत्र होते प्रत्येकी त्यांना। असा कोटयावधी वंशविस्तार कृष्णाचा। सारे त्याचे पुत्र पौत्रादि मिळून।।।१४।। प्रद्युम्न आणि रुक्मवतीचा पुत्र। नाम त्याचे होते अनिरुध्द। रुक्मिणी कन्या चारुमती नाम। कृतवर्मापुत्र बलीशी झाला विवाह।।१५।। रुक्मीचे कृष्णाशी होते वैर। त्याची होती रोचना नामे नात। रुक्मिणीचा नातु अनिरुध्दासह। लावून दिला विवाह रुक्मीने।।१६।। त्याप्रसंगी रुक्मीने बलरामास। दिले होते आव्हान द्युतास। द्युताचे ज्ञान नव्हते बलरामास। स्वीकारले ते क्षत्रिय धर्म पाळण्यास।।१७।। सुरुवातीला

रुक्मीच होता जिंकत। बलरामाची खिल्ली होते उडवत। लावला नंतर रुक्मीने मोठा पण। त्यावेळी विजयी झाला बलराम।।१८।। रुक्मी म्हणाला मीच जिंकलो म्हणून। बलरामाची खिल्ली तो उडवत। झाला बलरामास राग अनावर। टाकले त्याने रुक्मीस मारुन।।१९।। अनिरुध्द प्रियेसह खेळत होता द्युत। उषेजवळ त्याला दिसला बाणासुर। केला प्रवेश त्याने कपटाने महालात। अनिरुध्दास बांधले नागपाशात।।२०।। कळले वृत्त हे बलरामकृष्णास। आले आपल्या सैन्यासह युध्दास। दिला वेढा बाणासुराच्या राजधानीस। झाले त्यांच्यात घनघोर युध्द।।२१।। परंतु कृष्णाने न मारले बाणासुरास। दिले होत वचन त्याने प्रल्हादास। खरा केला कृष्णाने दिलेला शब्द। तोडले त्याने बाणासुराचे हातपाय ।।२२।। त्याप्रसंगी शिवाने केले कृष्णाचे स्तवन। म्हणाला आपण तर ज्योती स्वरुप। सर्व देव करतात सप्तभुवनांचे पालन। आपल्या मुळेच लाभे त्यांना सामर्थ्य।।२३।। आहात स्वयंप्रकाशी आपण। उत्पत्ती - स्थिती - लयाचे कारण। लाभे आपल्या निस्सीम भक्तीनेच। सुटका जन्ममृत्यु फेऱ्यातून।।२४।। गेले होते बलराम वृन्दावनास। नंदबाबाकडे गेले भेटण्यास। पाठविला वरुणदेश राजाने संदेश। तो समजत होता वासुदेव स्वतःस।।२५।। घेतला होता काशीराजाचा आश्रय। म्हणे मीच असे खरा वासुदेव। आलो असे मी भूतमात्र उध्दारास। कृष्णा, दे तू तुझे नाव टाकून।।२६।। केली कृष्णाने चढाई काशीवर।

घनघोर युध्द करुन मारले पौंड्रकास। पौंड्रक वैरभावे करी कृष्णाचे चिंतन। करीतसे कृष्णासारखा वेष धारण।।२७।। वैरभावनेने करीतसे नित्य चिंतन। झाली तयास सारुपी मुक्ती प्राप्त। श्रीकृष्णाचे कसेही करीता स्मरण। कृष्ण देई त्यास मुक्तीचे वरदान।।२८।। गेला कृष्ण पत्न्यांसह इंद्रप्रस्थास। करणार होते पांडव राजसूय यज्ञ। होते सर्व राजा महाराजांना निमंत्रण। आला होता तेथे जरासंध।।२९।। भीमासह द्वंद्व इच्छित होता जरासंध। झाला राजी भीम कृष्णाज्ञेस्तव। अनेकवेळा भीमाने चिरले जरासंधास। परी क्षणात जुळून येत होते शरीर।।३०।। कृष्णाने हाती घेतले एक पान। चिरले पान त्याने अगदी मधोमध। टाकला उजवाभाग डाव्या बाजूस। डावाभाग टाकला उजव्या बाजूस।।३१।। आले याचे कारण भीमाच्या लक्षात। टाकले त्याने जरासंधाचे शरीर चिरुन। मग फेकले भाग विरुध्द बाजूस। झाला त्यामुळे जरासंधाचा अंत।।३२।। झाला भीमाच्या हस्ते जरासंधाचा अंत। झाला त्यामुळे सर्वत्र आनंदी आनंद। २०८०० राजांना केले बंदीवासातून मुक्त। साऱ्यांनी श्रीकृष्णाची केली स्तुती।।३३।। राजसूय यज्ञात ऋषी अन् राजे अनेक। केले होते पांडवांनी आमंत्रित। द्यावा कुणाला अग्रपूजेचा मान। सर्वानुमते ठरले असे श्रीकृष्णच योग्य।।३४।। झाला शिशुपाल अतिसंतप्त। केली सुरुवात कृष्णनिन्दा करण्यास। नाही याला वर्ण अन् आश्रम। गवळी कुळालाही हा असे कलंक।।३५।। असे कृष्णाचे वर्तनही धर्मबाह्य। युध्दातून पळणारा

हा रणछोड। नसे याचे ठायी एकही सद्‌गुण। कसा देता याला अग्रपूजेचा मान।।३६।। स्वत:ची निंदा होता कृष्ण ऐकत। मोजत होता तो शिशुपालाचे अपराध। भरले जेंव्हा त्याचे शंभर अपराध। सुदर्शन चक्राने उडविले त्याचे मस्तक।।३७।। सांगतो तुम्हास याचे कारण। कृष्णाच्या आत्याचा मुलगा शिशुपाल। जन्मत: होते त्यास चारहात। झाली होती माता बहु चिंतीत।।३८।। तेंव्हाच आकाशवाणी पडली कानावर। ज्याचे मांडीवर गळून पडतील हात। त्याच्याच हस्ते असेल याचा अंत। गेला होता कृष्ण त्याला पहाण्यास ।।३९।। घेतले कृष्णाने मांडीवर बाळास। पडले गळून बाळाचे दोन हस्त। पाहुन आत्या झाली दु:खित। कृष्णाने तिज विचारले कारण।।४०।। सांगितले तिने रडण्याचे कारण। कृष्णाने दिले तिजसी वचन। याचे शंभर अपराध करीन माफ। पण नंतर मात्र याचा करीन वध।।४१।। राजसूय यज्ञामध्ये भरपूर अन्नदान। केले म्हणून युधिष्ठिर झाला गर्वित। तेंव्हाच तेथे एक मुंगुस पाठवून। केले कृष्णाने युधिष्ठिराचे गर्वहरण।।४२।। यज्ञास्तव आले होते कौरव। मय सभा पहात होता दुर्योधन। मायावी त्या सभेत पडला घसरुन। कुत्सितपणे द्रौपदी हसली त्यास।।४३।। म्हणाली ती ‘अंधे का पुत्र अंधा’। लागले हे वचन दुर्योधन मनाला। म्हणून मग घेण्या सूड पांडवांचा। केले द्युतास निमंत्रीत त्यांना।।४४।। द्युतात त्या कपटी शकुनीकडून। केले पराभूत त्याने युधिष्ठिरास। त्याने बंधुसह द्रौपदी लावली पणास। हरला हा

पण युधिष्ठिर द्युतात।।४५।। दुर्योधनाने द्रौपदीचे केले विडंबन। दासी म्हणून ओढून आणवले सभेत। दु:शासन करु लागला तिचे वस्त्रहरण। द्रौपदीने आर्तपणे पुकारले कृष्णास।।४६।। आला धाऊन कृष्ण तेथे अप्रत्यक्ष। पुरवून वस्त्रे राखली द्रौपदीची लाज। द्रौपदीच्या मनाचा झाला संताप। यातूनच नंतर झाले धर्मयुध्द।।४७।। युध्दासम कृष्णाची होती कार्ये अनंत। आत्या कुंतीचा होता मोठा आधार। झाला द्रौपदीचा पाठीराखा, मित्र। अर्जुनाचा सखा सारथी युध्दात।।४८।। नाही घेतले करी युध्दात शस्त्र। परी केले अर्जुनास सर्वतोपरी सहाय्य। सखा अर्जुनास करुनी निमित्त। दिले सर्वांस गीतारुपी बोधामृत।।४९।। उपनिषदांचे तत्त्वज्ञान मांडले गीतेत। वर्णिला कर्म - ज्ञान - योग - मार्ग। भक्तीचे सूत्र गोविले श्र्लोकांतून। फेडले पारणे अर्जुनासह विद्वानांचे।।५०।। दाखविला गीतेत जीवनमार्ग। आत्म्याचे अमरत्व वर्णुन केला बोध। स्वधर्मकर्माचे महत्त्व सांगून। कर्म मार्गाचे केले सुंदर विवेचन।।५१।। शुध्दज्ञान आणि निष्काम कर्म। विरक्तते कडे नेणारा योगमार्ग। अंतर्बाहय शुध्दीचा भक्तीचा मार्ग। भगवंतांनी गीतेमध्ये उपदेशिला।।५२।। असुनी श्रीकृष्ण स्वत: सर्वातीत। होता तो सामान्यातला सामान्य। श्रीकृष्ण भक्तवत्सल, तारणहार। होतो प्रसंगी तो भक्ताचा दास।।५३।। केले युध्दात अर्जुनाचे सारथ्य। करी घोडयांचा खरारा हा कृष्ण। देवविली अक्षयथाळी सूर्याकडून। केले वनवासात द्रौपदीचे रक्षण।।५४।। हा सामर्थ्यशाली, शरणागत

वत्सल। परमात्मा विष्णूचा तो पूर्णावतार। बलराम सुभद्रेचा बंधु श्रीकृष्ण। सर्वांतर्यामीही हा श्रीकृष्ण।।५५।। झाले शिक्षण सांदीपनी आश्रमात। सुदामा हा ब्राह्मण पुत्र होता मित्र। शिक्षणानंतर गेले आपापल्या गृही सर्व। करु लागले सर्व स्वतःचा संसार।।५६।। तसाच सुदाम्याचाही झाला विवाह। झाली मुलेबाळे सुदाम्यास। त्याची भिक्षुकी वृत्ती होती पुरोहीत। होते घरी अठरावीसवे दारिद्रय।।५७।। सुदाम्याचा स्वभाव संकोची, सरळ। होता मुखदुर्बळ अन् अल्पसंतुष्ट। होता संसार सुरु दारिद्रयातच। अंतरंगी मात्र सदा कृष्णाची आठवण।।५८।। विचार करीत असे पत्नी मनात। आहे म्हणतात मित्र द्वारकाधीश कृष्ण। एकदा पत्नी म्हणाली सुदाम्यास। मागावी त्याने श्रीकृष्णाकडून मदत।।५९।। नव्हता हा विचार सुदाम्यास संमत। घरात दारिद्रय स्थिती ओढग्रस्त। पाहुनी कुटुंबाची ही आबाळ। निघाला सुदामा श्रीकृष्णाकडे।।६०।। पत्नीने दिली पोह्याची पुरचुंडी। तीही होती शेजारुन मागितली। उत्तरीयात पुरचुंडी बांधून घेतली। जडपाऊली निघाला सुदामा।।६१।। पोहोचला द्वारकेस मुक्काम करीत। पाहीले द्वारकेचे सुंदर तट। विसावला झाडाखाली तो क्षणभर। मध्येच त्याचा डोळा लागला।।६२।। मारली कुणीतरी कणखर हाक। आली सुदाम्यास झोपेतून जाग। विचारले त्यास कोठून आलात। हवे आहे का तुम्हास सहाय्य।।६३।। पीडीले नाही ना कुणा दैत्याने। आपण ते सर्व आम्हा सांगावे। ब्राह्मणांचे सदा रक्षण करावे। असे द्वारकाधीशाची

आज्ञा खास।।६४।। सांगितले सुदाम्याने त्या सैनिकास। असे जायचे मज श्रीकृष्णाकडेच। असे मी त्याचा आश्रमातील मित्र। नेले सैनिकाने त्यास द्वारकेत।।६५।। सैन्याची तीन मंडले, छावण्या ओलांडून। सैनिकासह केला प्रवेश सदनात। आनंदातिशयाने धडधडू लागले हृदय। सुदामा मनी करीत होता विचार ।।६६।। घेऊन गेला एक पहारेकरी त्यास। सुवर्ण महाद्वारातून भव्य राजगृहात। सुदामा पुढे पुढे होता जात। तितक्यात घडली एक आश्चर्य मात।।६७।। राजतेजाने दैदीप्यमान श्रीकृष्ण। आला उठून भरभर पावले टाकीत। जवळ येताच हात पुढे करुन। आनंदे आलिंगन दिले सुदाम्यास।।६८।। सुदाम्याचे डोळे आले भरुन। आनंदे वाहती अश्रु नेत्रातून। त्या कमलनयनाचे कमल नयन। अमृत वर्षाव करीत होते सुदाम्यावर।।६९।। नंतर सुदाम्यास बैसवून मंचकावर। चरणातील कंटक केले स्वहस्ते दूर। उत्तमरीतीने करुन त्याचे आतिथ्य। ठेवले डोके सुदाम्याच्या चरणावर।।७०।। मित्रांचे ऐसे अनोखे प्रेम पाहून। कृष्णस्त्रिया ढाळती चवऱ्या त्याच्यावर। अतीव प्रेमाने कृष्ण करी संभाषण। काढती ते आठवणी आश्रमातील ।।७१।। केली कृष्णाने सुदाम्याची विचारपूस। आठवत होते गुरुप्रेम अन् शिकवण। तैसाच वनवास रात्रीचा प्रसंग। आले होते गुरुजी शोधत शोधत।।७२।। आनंदातिशयाने सुदामा डोलत। म्हणाला कृष्णा, झालो मी धन्य। माझा सहाध्यायी तू कृष्ण पूर्णावतार। लाभली तुजसवे मैत्री मज।।७३।। कृष्णाने मग

विचारले सुदाम्यास। मजसाठी खाऊ काय आणलास। सांग बरे काय आहे उपरण्यात। कृष्णानेच उपरण्याची सोडली गाठ।।७४।। त्यातील पोहयाची मूठ उचलून। टाकली कृष्णाने अलगद मुखात। घेतले पोहे त्याने दुसऱ्या मुठीत। रुक्मिणीने तेंव्हा निवारले त्यास।।७५।। म्हणे नाथ हा असे माझा भाग। घातली मूठ तिने स्वतःचे मुखात। तिसरी कृष्णाने भरवली सुदाम्यास। घेतला तिघांनी खूप आनंद।।७६।। कृष्णाने ठेवून घेतले मित्रास। स्वतःजवळ स्वतःच्या प्रासादात। सुदाम्यास मनात मोठा प्रश्न। कैसे काही मागावे याच्याकडे ।।७७।। दुसरे दिनी निघाला सुदामा स्वसदनास। केले त्याने स्वतःचेच कपडे परिधान। निघाला सुदामा विचार करीत। लाभले मज मित्रप्रेम झालो मी धन्य।।७८।। परतीच्या वाटेवर पोहोचला लवकर। आला तो स्वतःच्या नगराजवळ। पाहता त्याला सुरु झाली धावपळ। झाला होता नगरीचा कायापालट।।७९।। आली पत्नी भूषणांनी नटून। वस्त्रप्रावरणांनी सजुन पंचारती घेऊन। कृष्णाच्या योगशक्तीने झाला धनवान। सुदामा राहीला कमलासम विरक्त।।८०।। एकदा खग्रास सूर्यग्रहण पर्वणीस। समंतपंचक तीर्थावर गेले यादव। आले भारतवर्षातील राजे अनेक। जाहला तेथे सोहळा अपूर्व।।८१।। तीर्थक्षेत्री आले गोपी, गोप, नंद। भेटले बलराम, कृष्ण, वसुदेव त्यांस। होता एकमेकांची ऐसी प्रेमळ भेट। भावनांचा पूर वाहीला ओसंडून।।८२।। तीर्थस्थळी बलराम कृष्ण दर्शनास्तव। आले होते ऋषीमुनी अनेक। केले कृष्णाने

धर्मविषयक प्रवचन। ऐकून सर्व श्रोते झाले धन्य।।८३।। म्हणाला श्रीकृष्ण तेंव्हा सर्वांस। करण्यापेक्षा तीर्थस्थानी स्नान। ऋषीमुनींच्या संगतीचे अधिक पुण्य। नसे मूर्तीत भगवंताचे अधिष्ठान।।८४।। ऋषी, संत अन् सज्जनांच्या ठायीच। करीतसे निवास स्वतः भगवंत। ज्ञानाने जाणावे सारे वासुदेवच। ऐसे चित्ताचे स्नानच पुण्यप्रद।।८५।। जाणले होते वसुदेवाने आपले पुत्र। हेच आहेत विष्णु आणि अनंत। म्हणूनी म्हणाला वसुदेव कृष्णास। द्यावे आपण मजसी आत्मज्ञान।।८६।। कृष्णाला सृष्टीनियंता, परब्रह्म समजून। केली स्तुती वसुदेवाने मनापासून। म्हणाला वसुदेवास तेंव्हा श्रीकृष्ण। असे आत्मा सर्वव्यापी सर्वत्रच।।८७।। देह दृष्टया तो स्वतः अन् बलराम। आहोत आम्ही वसुदेवाचेच पुत्र। पण आत्मदृष्टया सर्व एक ब्रह्मरुप। मायेच्या आवरणाने दिसे विविधत्व।।८८।। ऐकत होती देवकी त्यांचा संवाद। झाली तिज सहापुत्रांची आठवण। म्हणाली देवकी तेंव्हा श्रीकृष्णास। भेटवी मृत मुलांना तू मज।।८९।। बलराम श्रीकृष्णाने दिला होकार। गेले सुतल लोकी बळीराज्यात। बलीस होता बलरामकृष्णाचे दर्शन। केले आदराने त्याने त्यांचे स्वागत।।९०।। विचारीले बलीने मग तयांस। सांगावे येथे येण्याचे प्रयोजन। कृष्ण म्हणाला देवकीमातेचे सहापुत्र। कंसाने मारले ठार ते जन्मताच।।९१।। आले असती ते सुतल लोकात। देवकी मातेकडे त्यांना घेऊन जाईन। घडवीन मी मातापुत्रांची भेट। माझ्या कृपेने नंतर जातील देवलोकात

।।९२।। ऐक राजा होते स्वायंभुव मन्वन्तरात। मरीचि, प्रजापति व ऊर्णा यांस। स्मर, उद्गीध, परिष्वंग, पतंग। क्षुद्भूत आणि धृपि असे सहा पुत्र।।९३।। होते वास्तविक ते सहापुत्र देव। परी ते हसले होते ब्रह्मदेवास। ब्रह्मदेवाच्या शापे झाले असूर। हिरण्यकशिपू पुत्र म्हणून आले जन्मास।।९४।। योगमायेने हे ठेविले देवकीगर्भात। तेथून मग अपमृत्यु भोगून। आले आहेत ते सुतललोकात। ऐकून बलीने दिले ते कृष्णास।।९५।। तेथून या सहा बालकांस घेऊन। आले बलरामकृष्ण देवकीजवळ। पोटाशी धरीले देवकीने पुत्रांस। केले प्रेमे स्तनपान तयांस।।९६।। घडले त्यांना देवकीचे स्तनपान। लाभले श्रीकृष्ण स्पर्श व दर्शन। झाली त्यांची आत्मस्मृती जागृत। योगमाया शक्तीने गेले देवलोकात।।९७।। झाली देवकी अतिशय प्रसन्न। म्हणाली तेंव्हा ती श्रीकृष्णास। असे बाबा तुझी लीला अगम्य। तुझ्या कृपे आम्ही झालो धन्य।।९८।। वसुदेव देवकीचे होते थोर पुण्य। लाभले तयांस यांचे मातृपितृत्व। करुनी तयांसी जन्माचे निमित्त। घेतले विष्णुने बलराम, कृष्णावतार।।९९।। असे आहे हे विष्णुचे माहात्म्य। असे अगम्य, अगोचर, अगाध। करीतो वर्णन या नवशतीत। ही तर केवळ स्वामींची लीला।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।सातवा अध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीकृष्णा तुझा महिमा अगाध। लीला तुझ्या मधाळ रसपूर्ण। झालो वर्णन करण्या उद्युक्त। द्यावे मजसी तू वरदान।।१।। श्रीकृष्ण हा विष्णुचा पूर्णावतार। सोळा कलांनी असे परीपूर्ण। वावरला सामान्यातील सामान्य होऊन। हेच असे कृष्णचरिताचे वैशिष्टय।।२।। आता प्रथम वर्णितो लीला एक। आहे ती रोचक परी मिष्किल। लिहीता होते मन अतिप्रसन्न। श्रीकृष्णासम श्रीकृष्णच एक।।३।। सुभद्रा ही बलरामकृष्णाची बहीण। झाली होती ती विवाहयोग्य सुंदर। होता दुर्योधन बलरामाचा शिष्य। बलराम देऊ इच्छित होता तयास।।४।। नव्हते यादवांना बिल्कुल मान्य। वसुदेव अन् कृष्ण ही नव्हते संमत। होता बलराम हट्टी अतिशय। म्हणे देईन सुभद्रा दर्योधनासच।।५।। तीर्थयात्रेसाठी गेला होता अर्जुन। गेला होता तो प्रभास क्षेत्रास। कानी आले सुभद्रेच्या विवाहाचे वृत्त। देऊ इच्छी बलराम तिज दुर्योधनास।।६।। अर्जुन इच्छितसे सुभद्रेसह विवाह। घेतला त्रिदंडी संन्याशाचा वेष। आला संन्यासी

वेषात द्वारकेस। केले द्वारकावासीयांनी स्वागत।।७।। होता बलरामाचा भोळा स्वभाव। केला त्याने अर्जुनाचा सन्मान। एक संन्याशी आहे असे समजून। बोलावले आपल्या घरी राहण्यास।।८।। केला आदराने त्याचा पाहुणचार। दिले तयास पक्वान्न भोजन। आली सुभद्रा पंक्तीत वाढण्यास। अर्जुनास पाहून झाली आकृष्ट।।९।। पाहता तिजसी अर्जुन मोहीत। पाहु लागला तो संधीची वाट। ठरविले मग त्याने आपुले मनात। न्यावे सुभद्रेस आपण पळवून।।१०।। एके दिवशी सुभद्रा देवदर्शनास्तव। पडली ती बाहेर द्वारकानगरीतून। होते अर्जुनाला सामील कृष्णवसुदेव। अर्जुनाने सुभद्रेस नेले पळवून।।११।। गेले यादव अर्जुनावर चाल करुन। केला अर्जुनाने यादवांचा पराभव। संन्याशाचे ऐसे हे धाडस पाहून। बलराम निघाला मग संतापून।।१२।। मग कृष्ण म्हणाला बलरामास। नसे तो संन्याशी आहे तो अर्जुन। केले नंतर अर्जुनाने निजरुप प्रकट। बलरामाने त्यांचा लावून दिला विवाह।।१३।। एकदा नारदाज्ञेने वृकासुर। करु लागला शंकराचे आराधन। नाही होत शंकर आपणावर प्रसन्न। म्हणून करु लागला तो स्वशिर अर्पण।।१४।। झाले मग शंकर प्रसन्न त्याजवर। म्हणाले घे मागून तू वरदान। म्हणे कुणाच्याही शिरी मी ठेवता कर। पाऊ दे तो तेथे सत्वर मरण।।१५।। वाटले शंकराला वरदान विचित्र। परी दिले वर नाईलाजास्तव। ठेवू पाही तो शंकरमस्तकी कर। वैकुंठात पळत गेला शंकर।।१६।। निघाला विष्णु

ब्रह्मचारी वेषात। गाठीले वृकासुरास त्याने वाटेत। विचारली सर्व कथा वृकासुरास। म्हणाला शंकराने फसविले तुज।।१७।। जर तुम्हा पटत नसेल मम वचन। ठेवा तुम्हीच स्वमस्तकावर कर। असे मरते का कुणी ठेवून कर। तुम्ही अजिबात नाही मरणार।।१८।। ठेवूनी त्याच्या बोलण्यावर विश्वास। ठेवला वृकासुराने स्वमस्तकी कर। गेले त्याच क्षणी वृकासुराचे प्राण। विष्णुने शंकराचे केले रक्षण।।१९।। दक्षाने नारदास दिला होता शाप। रहाल भटकत सदैव त्रिलोकात। बाधत नव्हता तो शाप द्वारकेत। म्हणून नारद वारंवार येई द्वारकेत।।२०।। एकदा वसुदेवाने विचारले नारदास। देवापेक्षाही संत असतात श्रेष्ठ। पुत्ररुपाने मज लाभले भगवंत। परी ज्ञानप्राप्ती होई भक्ता पाशीच।।२१।। मोक्षाचे ज्ञान मोक्षाचा उपाय। सांगावा आता मजसी तुम्हीच। वसुदेवाची ही विचारणा ऐकून। झाला नारदास अतिशय आनंद ।।२२।। आपला प्रश्न आहे अतिशय योग्य। या संसारातून सोडवितो भगवंतच। ऋषभदेवाच्या शंभरांपैकी नऊ पुत्र। होते ते आत्मज्ञानी भगवद्‌भक्त।।२३।। त्यांनी सांगितला होता जनकराजास। आत्मकल्याणा साठीचा उपाय। केले विशद भागवतधर्म स्वरुप। तोच सांगतो मी विशद करुन।।२४।। कविने सांगितली उपासना नित्य। हरी म्हणे मानावे मनापासून। आत्मभाव रुपे परमात्मा वसे सर्वत्र। राहतो खराभक्त सदा समस्थितीत।।२५।। अंतरीक्षाने मग जनकराजास। केले कथन मायेचे स्वरुप। प्रबुध्दाने सांगितले तेंव्हा

राजास। माया तरुन जाण्याचा उपाय।।२६।। पिप्पलायनाने मग केले कथन। नारायणाचे सत्य स्वरुप काय। उत्पत्ति, स्थिती अन् लयाचे कारण। असे अजन्मा अमर नारायण।।२७।। योगीश्वर आविर्होत्रास करता प्रश्न। केले कर्म, अकर्म, विकर्मांचे विश्लेषण। वेदोक्त कर्माने मिळे परलोक सुख। निष्काम वृत्तीनेच ठरती आत्मज्ञानदायक।।२८।। दुर्वृत्त आळशींसाठी असती प्रलोभन। केले त्यांनी यज्ञादि कर्म वर्णन। सांगून वेदविहीत कर्मांचे मर्म। सांगितले महत्त्व निष्काम वृत्तीचे।।२९।। द्रुमिल योगींनी केले अवतार वर्णन। सांगितले त्यांनी सर्व अवतार। पूर्वकालीन, वर्तमान व आगामी अवतार। सांगितले सर्व अवतारांचे कारण।।३०।। सांगती आठवे योगीश्वर चमस। बध्द, मूढ आणि भक्तिहीन। अधोगतीच लाभे या साऱ्यांस। ज्ञानावाचून सुटका नसे कोणास।।३१।। म्हणती नववे योगीश्वर करभाजन। प्रत्येक युगातील आकार व वर्ण। सांगतो सर्व काही करुन वर्णन। ऐकावे सर्वांनी चित्त देऊन।।३२।। सत्ययुगात श्री विग्रह श्वेतवर्ण। चतुर्भुज, जटाधारी, वल्कले परिधान। मृगचर्म, यज्ञोपवीत, रुद्राक्षमाला रुंड। कमंडलू हे सर्व धारण करणारा।।३३।। त्रेतायुगात भगवंत रक्तवर्ण चतुर्भुज। करीतसे तो तीन मेखला धारण। घेतसे तो यज्ञाग्नीचे स्वरुप। धरी तो यज्ञपात्र धारण करणारे रुप।।३४।। वेदत्रयींने होई त्यांचे आराधन। वृषाकृति, विष्णु, यज्ञ पृथ्विगर्भ। जयंत इत्यादि नामे अनेक। यज्ञकर्मांनी करती त्याचे पूजन।।३५।।

द्वापरायुगात भगवंताचे दिव्य शरीर। श्यामल वर्णाचे असे चतुर्भुज। शंख, चक्र, गदा, पद्म व पितांबर। श्रीवत्सचिह्न कौस्तुभमणि करी धारण।।३६।। असती ते समस्त राजचिह्नयुक्त। वैदिक मार्गाने होई आराधन। तांत्रिक मार्गानेही करती आराधन। मानती यास त्याचा पूर्णावतार।।३७।। कलीयुगात त्याच्या शरीराचा कृष्णवर्ण। असे तेजस्वी तो नीलमण्यासम। सुदर्शनादि आयुधे करी धारण। सुनंद इत्यादि असती पार्षद ।।३८।। कलियुगी विशेष करुन द्रविड देशात। असतील भगवद्‌भक्त जास्त। कर्मवासना सोडून जाता शरण। जातील फीटून यांची सर्व ऋण।।३९।। वैरभावे करुनी कृष्णाचे स्मरण। पैंड्रक, शिशुपाल अन् कंसादि दैत्य। झाले हे सर्व ही श्रीकृष्ण रुप। भक्तांचा तर तो असे तारणहार।।४०।। प्रेम भक्तिभावे जे करिती चिंतन। प्राप्त होई तयांसी श्रीकृष्णरुप। नसे हा कृष्ण केवळ तुमचा पुत्र। असे तो अविनाशी, परमात्मा, सर्वेश्वर।।४१।। आता प्रश्न ऋषीशापे यादवसंहार। झाला का बरं आपापसात लढून। त्याविषयी करीतो आता विवरण। ऐकावे सर्वांनी सावध करुनी मन।।४२।। पूर्वजन्मी जे होते उन्मत्त राक्षस। आले होते क्षत्रियराजे म्हणून। त्या दुराचारी राक्षसांचा भार उतरवून। करण्यास्थापन धर्म, न्यायाचे राज्य।।४३।। घेतला विष्णुने कृष्णाचा अवतार। होते तेच केवळ त्याचे जन्मकारण। परंतु यादवच होऊ लागले उन्मत्त। त्यांच्या सत्तेने येईल धर्माला बाध।।४४।। होते सारे ठाऊक कृष्णास पूर्वीच। जणु म्हणून दिला होता

गांधारीने शाप। होईल यादवांचाही अंत कौरवांसम। यादव अंत होईल आपापसात लढून।।४५।। आपल्या
निर्वाणानंतर होतील उन्मत्त। ऐसा विचार मनाशी करुन। होऊ नयेत यादव सर्वांस त्रासदायक। यासाठी
कृष्णाने केला आणीही उपाय।।४६।। पाठवले सर्व ऋषी पिण्डारक क्षेत्रास। तेथेची आले घडून एक
अघटीत। यदुवंश तरुण होते फार उन्मत्त। करविला धारण सांबास स्त्रीवेष।।४७।। गेले घेऊन त्यास
ऋषींसमीप। म्हणाले ही स्त्री असे गरोदर। सांगावे पुत्र वा कन्या होईल हीज। या खोटया प्रश्नाने झाले
ऋषी संतप्त।।४८।। म्हणाले ते ही एक मुसळ प्रसवेल। त्या मुसळाने होईल यादवकुळ नाश। चेष्टा
आली अंगावर हे पाहून। गेले ते सर्व तरुण घाबरुन।।४९।। काढला त्यांनी सांबाचा स्त्रीवेष। होते पोटाशी
काळे कुळकुळीत मुसळ। मुसळाला होते लोखंड कडे एक। आले नंतर परत ते द्वारकेत।।५०।। गेले
सारे उग्रसेनाकडे मुसळ घेऊन। घडला प्रकार कथिला उग्रसेनास। पाहून मुसळ तो ही झाला भयभीत।
सांगितले पीठ करुन टाका समुद्रात।।५१।। मग त्यांनी मुसळाचे करुन चुर्ण। नेऊन समुद्रात दिले फेकून।
आणि त्या मुसळाचे कडे घेऊन। दूरवर समुद्रात दिले फेकून।।५२।। ते कडे गिळले एका माशाने।
पकडता मासा ‘जरा’ नामे कोळयाने। हा कोळी समुद्रात मासे पकडतसे। तसेच अरण्यात शिकारही
करीतसे।।५३।। समुद्रात टाकलेले मुसळाचे चुर्ण। प्रभास तीर्थाच्या तीरावर गेले वाहात। त्या प्रत्येक

कणाकणाचे बीज होऊन। टणक दांडयाचे गवत झाले त्यापासून।।५४।। होते हे सारे कृष्णास ठाऊक। परंतु याबाबत धरले कृष्णाने मौन। हे सारे दुर्वास मुनी होते जाणत। बनवू पाहात होते वज्रदेही कृष्णास।।५५।। स्वतः मुनींनी द्वारकेस येऊन। केला प्रयत्न त्यांना खीरीचे स्नान करवून। रुक्मिणीने केले त्यांच्या आज्ञेचे पालन। कृष्णाने उजव्या पायाचा अंगढा धरला दाबून।।५६।। झाले दुर्वास मुनी अतिशय दुःखित। म्हणे उजव्या अंगठयास न लागली खीर। तेव्हढाच भाग होईल मृत्युस कारण। अर्थात श्रीकृष्ण तर सर्वज्ञच होता।।५७।। उपजे ते नाशे असा असे नियम। नाही तोडायचा आपणच नियम। करायलाच हवा होता शरीरत्याग। म्हणूनच केली ही लीला अतर्क्य।।५८।। वसुदेवास नाना प्रकारे उपदेश करुन। आपुले कार्यास नारद गेले निघून। नंतर सनकादि मानस पुत्रांसह। देव, प्रजापतिंसह ब्रह्मदेव।।५९।। नंदीप्रभृती भूतगणांसह स्वतः शंकर। समस्त मरुद्‌गणांसह देवराज इंद्र। बारा आदित्य अष्टवसु, अश्विनीकुमार। अंगिरसादि चारण, सिध्द सर्व।।६०।। आले सर्व द्वारकेस भेटण्या कृष्णास। कृष्णाने मनोहर मनुष्य रुप धरुन। पापे नाशून मिळविले होते पवित्र यश। पसरले होते चौफेर चौदाही भुवनांत।।६१।। भगवंताची निर्मळ कीर्ती ऐकून। आले होते हे सर्व घेण्या दर्शन। दैदीप्यमान अनुपम अशा द्वारका नगरीत। झाले सर्वांस श्रीकृष्णाचे दर्शन।।६२।। सर्व देव आणि ब्रह्मदेवांनीही नंतर। केली श्रीकृष्ण स्तुती अन् यशोगान।

म्हणाले नंतर ब्रह्मदेव श्रीकृष्णास। अवतारास झाली एकशे पंचवीस वर्षे।।६३।। आता तुझे अवतार कार्य झाले पूर्ण। शिल्लक आहे आता यदुकुल फक्त। ऋषीशाप मिळाल्याने होईल ते नष्ट। एक विनवणी असे तव चरणी म्हणून।।६४।। उचित जर वाटत असेल आपणास। करावा आपण परमधाम वैकुंठ प्रवेश। आम्ही आहोत चतुर्दश भुवनांचे पालक। आम्हा वैकुंठदासांचे करावे संरक्षण।।६५।। तेंव्हा श्रीकृष्ण म्हणाले ब्रह्मदेवास। ऐकले असे तुमचे बोलणे मनःपूर्वक। ऐकून तुम्हा सर्व देवांचे वचन। केले असे पूर्ण मी तुमचे सर्व कार्य।।६६।। असे जवळ समृध्दी, वीर्य, शौर्य। त्यामुळे झाले आहेत यादव उन्मत्त। सध्या त्यांच्यावर असे मम नियंत्रण। मी नसता करतील मर्यादा उल्लंघन।।६७।। आता तुम्हास असे ठाऊक पूर्ण। ऋषीशापामुळे होईल त्यांचा नाश। त्यानंतर मी स्वतः जाईन वैकुंठास। जाताना तुमचे भुवनी नक्कीच येईन।।६८।। ऐकून श्रीकृष्णाचे आश्वासक वचन। झाले ब्रह्मदेवादि सर्व देव प्रसन्न। श्रीकृष्णास विनम्र वंदन करुन। गेले निघून आपापल्या भुवनास।।६९।। घडू लागले द्वारकेत भूवर। तसेच अंतरीक्षात अनेक उत्पात। म्हणाला कृष्ण तेंव्हा यादवांस। येथे घडत आहेत उत्पात अपशकुन।।७०।। आहे सुरक्षितता प्रभास क्षेत्रात। सर्व यादवांनी तेथे जाणे युक्त। कृष्णाने धाडीले प्रभासक्षेत्री पुरुषांस। बायका मुलांना शंखोध्दारक्षेत्रात।।७१।। नंतर कृष्णाने बोलावले उध्दवास। सांगितले येथील देवकार्य संपल्यावर। दादा

व मी जाणार आमचे स्थानास। करु नयेस तू त्याचा शोक।।७२।। होणार संपूर्ण यदुवंश नष्ट। सातवे दिवशी आजपासून समुद्र। घेईल द्वारकानगरी आपुले पोटात। माझ्यानंतर येईल कलीयुग।।७३।। कलीयुगात अधार्मिकांचा वाढेल प्रभाव। अशा या विचित्र कलीयुगात। स्वजन आप्तस्वकीय ममत्व सोडून। अनन्यभावे कर मन माझ्यात विलिन।।७४।। उपजे ते नासे भवसागरच नाशवंत। इंद्रिये, मन कर लीन आत्मस्वरुपात। तेणे होशील गुणदोषांपासून मुक्त। ऐकून हे उध्दवाने दिले आलिंगन।।७५।। म्हणाला उध्दव तेंव्हा श्रीकृष्णास। मी तर हया लीलाशरीराच्या समवेत। पण आत्मतत्त्वाच्या संगतीत राहण्यास। करावा आपणच मज बोध।।७६।। कृष्ण म्हणाला प्राण्यात श्रेष्ठ नरजन्म। असे तयास विवेकाचे वरदान। बुध्दिमानच करुन आत्मानुसंधान। होऊ शकतो मुक्त संसारचक्रातून।।७७।। सांगितले उध्दवास जा बदरिकाश्रमात। असे अरे तो माझाच आश्रम। निस्पृह राहून ठेवी चित्तस्थिर। कायावाचामने कर भागवत धर्म रक्षण।।७८।। ऐसे करीता होशील गुणातीत। परमस्वरुपी येऊन मला मिळशील। ऐकून उपदेश झाला उध्दव सद्‌गदित। प्रदक्षिणा करुन चरणी ठेवी मस्तक।।७९।। घेतला गहीवरल्या अंत:करणाने निरोप। केले श्रीकृष्णास हृदयी धारण। कृष्णाच्या आज्ञेने मग तो उध्दव। तप करण्यास गेला बदरिकाश्रमात।।८०।। प्रभासक्षेत्री यादवांनी केले तीर्थस्नान। केले शांतिपाठ अन् स्वस्तिपाठ। देवांचे द्विजांचे नंतर करुन पूजन। सुवर्ण

गोश्वादिचे दिले दान।।८१।। केले सर्व यादवांनी यथासांग। नंतर यादवांची बुध्दि फिरली अचानक। केले त्यांनी मैरेयक मद्याचे पान। अतिपानाने झाले सारे बेभान।।८२।। करु लागले ते वाटेल ती बडबड। सुरु केले त्यांनी एकमेका मारण्यास। शस्त्रास्त्रांनी लढू लागले आपसात। त्यामुळे मेले कितीतरी यादव ।।८३।। शस्त्रे संपल्यावर किनारीचे गवत। काढून मारु लागले एकमेकास। होते उगवले गवत मुसळ पीठातून। त्यांचे बुंधे होते विषारी व टणक।।८४।। विसरुन सारे नाते संबंध। मारु लागले एकमेका होऊन बेभान। कृष्णबलरामावरही आले धावून। झाले तुंबळ भयंकर संहारक युध्द।।८५।। पावले जेंव्हा सर्वही यादव मरण। कृष्णरामाने शक्ती घेतली आवरुन। जाहला ऐसा सर्व यादव संहार। जाहले पूर्ण त्यांचे अवतार कार्य।।८६।। बलराम सागरतीरी समाधीलावून। योगबलाने स्वशरीर त्यागुन। गेला अनंत नामी निजधामास। श्रीकृष्णाने पाहीले त्याचे निर्वाण।।८७।। ठेवून स्वत:चे चित्त अतिशय शांत। बसला कृष्ण पिंपळवृक्षतळी भूवर। करु लागला आपल्या कार्याचे चिंतन। झाला होता मग्न आत्मचिंतनात ।।८८।। जरा नामे व्याध जात होता मृगयेस। पाहीला कृष्णपायाचा तळवा कोमळ। थोडासा हलला हे दिसले दुरुन। वाटले व्याधास असावे ते हरीण।।८९।। सोडला बाण त्याने अवधान देऊन। धावला पुढे तो सावज धरण्यास। पाहीले कृष्ण होता आत्मचिंतनी मग्न। रक्तधार गळत होती तळव्यातून।।९०।।

होते व्याधाच्या बाणाचे टोक। केलेले तयार लोखंडी कडयापासून। उमजली व्याधाला आपली चूक। मागे तो कृष्णाची क्षमा वारंवार।।९१।। शांतपणे म्हणाला श्रीकृष्ण व्याधास। केलेस तू माझेच मोठे काम। तुझ्यावर आहे मी पूर्णपणे प्रसन्न। पुण्यवंतांचा स्वर्ग मिळेल तुज।।९२।। आले तितक्यात दिव्य विमान वरुन। कृष्णाने व्याधास दिले पाठवून। धनुष्य व आयुध चरणी वाहून। गेला व्याध कृष्णाज्ञेने स्वर्गात।।९३।। कृष्णाचा शोध घेत आला दारुक। दिसला नाही कुठे बलराम त्यास। पाहीला त्याने झालेला यादव संहार। कृष्णाला पाहून आला पुढे धावत।।९४।। पूसे कृष्णाचा शरविध्द चरण पाहून। हा घाव कसा आपुले पवित्र देहास। तितक्यात कृष्णाचा गरुडध्वजयुक्त रथ। गेला अश्वासह गगनात उडून।।९५।। सांगितले त्याला जाण्या द्वारकेस। उरलेल्या लोकांना बाहेर काढ तेथून। जाईन मी आता निजलोकास। तेंव्हा समुद्र गिळून टाकील द्वारकेस।।९६।। सांगितले होऊन तू ज्ञाननिष्ठ। पहा अलिप्तपणे मायेचा खेळ। खिन्नमने कृष्णास प्रदक्षिणा करुन। गेला दारुक द्वारका नगरीस।।९७।। झाले सर्व देव कृष्णासमोर उपस्थित। योगमार्गाने केला नंतर सशरीर। श्रीकृष्णाने हया पृथ्वीचा त्याग। गेला निघून श्रीकृष्ण परमधामास।।९८।। श्रीकृष्ण परमधामास गेला पाहून। श्रीदेवी, धैर्य, किर्ती, सत्य, धर्म। सारेची गेले हा भूलोक सोडून। जाहला येथेच द्वापाराचा अंत।।९९।। श्रीकृष्णाचा अवतार सोळाकलापूर्ण। असे

चरित्र सर्वरसयुक्त मधुर। वैकुण्ठगमन हे असे अवताराचे केवळ। असे सदैव कृष्ण अंतःकरणी स्थित।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।
।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।आठवा अध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामीरायांची अगाध करणी। केली लिहिती मम लेखणी। सुमधुर गोड लीला कृष्णाची। वर्णन करविती या भक्ताकरी।।१।। स्वामीराया कृष्णचरित्र कथा सुंदर। तुम्हीच पुढे मजकडून करविणार। मी तुमचा सुत अजाण बालक। त्राता तुम्ही तुम्हीच मम पालक।।२।। श्रीकृष्णाचाच अवतार श्रीपांडुरंग। उभा असे ठेवूनी कटीवर कर। जणु बोधितो असे हा भवसागर। केवळ कटीपर्यंतच नको त्याचे भय।।३।। सावळे सुंदर त्याचे रुप मनोहर। पाहता नयनी दाटे अश्रुंचा पूर। असेल काय त्याचा महिमा बरं। लोटतो सदैव भक्तांचा पूर।।४।। घेता दर्शन सावळया विठोबाचे। फिटतसे ऋण हो जन्माजन्माचे। पापपुण्यादि सारे होती मुके। लाभे भक्तांसी सुख मोक्षाचे।।५।। जान्दुमामा सात्यकी होते दांपत्य। होता त्यांचा पुंडलीक एकच पुत्र। मातापित्यांचा होता तोची आधार। करत होते पुंडलीकाचे कोड कौतुक।।६।। उपवर होता केला त्याचा विवाह। झाला पुंडलीक पूर्ण पत्नीचे आधीन। जरी होते

मनी मातृपितृ प्रेम। पत्नीच्या धाके न करी तो सेवा।।७।। निघाले गावकरी काशीयात्रेस। निघाले माता - पिता त्यांच्या समवेत। गेले ते दोघे काशीस चालत। पुंडलीक पत्नीसह निघे अश्वावरुन ।।८।। निघाला तेथे फिरत तो पुंडलीक। पोहोचला कुक्कुट स्वामींचे आश्रमात। पाहील्या तेथे तेजस्वी स्त्रिया तीन। करीत होत्या सेवा आश्रमात।।९।। पुंडलीकाने मग विचारीले तयांस। सांगावे आपण कोण आहात। आम्ही गंगा, यमुना, सरस्वती। करतो स्वामीसेवा येथे राहून।।१०।। म्हणाल्या आमचे स्वामी असती पवित्र। करतो येथे सडा रांगोळी नित्य। म्हणाल्या जे मातृपितृ सेवा करतात। असतात ते महान पुण्यवंत।।११।। न फीटे कधीही मातृपितृ ऋण। करावी सेवा त्यांची नित्य। ऐकून पुंडलीकास झाला पश्चाताप। घेतली त्याने पवित्र नद्यांची शपथ।।१२।। शोधिले तयाने काशी यात्रेत। सापडता मातापिता धरीले चरण। आला त्यांना घेऊन तो आश्रमात। मागितली क्षमा पाय धरुन।।१३।। आला नंतर त्यांच्यासह पंढरपुरात। मातापित्यास वाटले आश्चर्य। आश्रम अन् नद्यांचा झाला प्रभाव। करु लागला मातापित्यांची सेवा नित्य।।१४।। देतसे तयांसी वेळेत जेवण। त्यांना हवे नको ते होता बघत। पाहून त्याचे पवित्र आचरण। पत्नीही करु लागली त्यांची सेवा।।१५।। त्याची मातृ-पितृ भक्ती पाहुन। होते माता - पिता परम संतुष्ट। एके दिनी होता दंग तो सेवेत। अंगणी पडला लखलखीत प्रकाश।।१६।। ऐकला पुंडलीकाने

अद्भूत आवाज। असे तव मातृपितृ सेवेने मी संतुष्ट। आलो असे मी द्याया दर्शन। पाहीले पुंडलीकाने मान वळवून।।१७।। झाला पुंडलीकास अतिशय आनंद। केले भक्तिपूर्वक कृष्णास वंदन। दिली त्याने कृष्णास जवळची वीट। म्हणे राही उभा तू या विटेवर।।१८।। राहीला श्रीहरी उभा त्या वीटेवर। होते ठेवले त्याने कटीवर कर। घेतला कृष्णाने असा विठ्ठल अवतार। चंद्रभागातीरी पंढरपुरात ।।१९।। भक्तास्तव झाला हा अवतार। नाम याचे विठ्ठल म्हणजेच पांडुरंग। भक्त पुंडलीकाचे भक्तीस भुलून। आणि त्याची मातृपितृभक्ती पाहून।।२०।। करीत होता सेवा लाडका भक्त। श्रीहरीला वीटेवर उभा करुन। तोच हा तो विठुराया पांडुरंग। उभा अठ्ठावीस युगे कर कटी ठेवून।।२१।। देई भक्तांसी आशीर्वाद मुक्त। तैसेच देतो तो अनिवार प्रेम। माऊली प्रमाणे करी प्रेमे पालन। म्हणुनच त्या म्हणती विठुमाऊली ।।२२।। सावळे सुंदर त्याचे रुप मनोहर। गळा त्याच्या लोळतसे वैजयंती माळ। वीटेवर असती त्याचे समचरण। दाविती ते ऐक्य भक्त - भगवंताचे।।२३।। सुंदर ते ध्यान उभे वीटेवर। म्हणती आवडीने संत तुकाराम। गळयात तुळसीमाळ केलिसे धारण। कासे लेईले असे पीत पितांबर।।२४।। विठ्ठलाची मूर्ती सावळा त्याचा रंग। विठ्ठलाचे मुख आकाराने उभट। दृष्टी त्याची असे सदैव स्थिर। न्याहळी तो भक्तांसी प्रेमभावे।।२५।। असे घडली ती काळया पाषाणा पासून। मूर्तीत रुप आहे साध्या गृहस्थाचं। रुप त्याचे

असे रांगडे ओबडधोबड। चेहऱ्यावर विलसती लोभस भाव।।२६।। माऊलीच्या प्रेमे सांभाळी भक्तांसी। ओढ त्याच्या भेटीची भक्तामनी। पाहता त्याचे रुप नेत्र पाणावती। प्रेमभक्तीभाव हृदयी ओसंडती।।२७।। चालती वारकरी पंढरीची वाट। पाऊले पडती पुढे पंढरीच्या वाटेवर। हाती टाळ मुदुंग मुखी त्याचे नाम। गाजतो विठ्ठल नामाचा गजर।।२८।। वारकऱ्यांच्या मनी नामाचा ध्यास। जळी, स्थळी, काष्ठी दिसे विठ्ठल। देव तो विठ्ठल देवपूजाही विठ्ठल। तीर्थ विठ्ठल क्षेत्रही होई विठ्ठल।।२९।। भक्तराज पुंडलिक प्रिय वारकऱ्यांसी। पुंडलीकासाठी परब्रह्म पंढरीसी। युगे अठ्ठावीस उभेची ठायी। पुंडलीक वरद हरी विठ्ठल ऐसे गाती।।३०।। कृष्णासोबत नित्य राही रुक्मिणी। विठ्ठला सोबत पंढरीत रखुमाबाई। म्हणुनच म्हणती विठोबा रखुमाई। जनसामान्यांना ते प्रेमे सांभाळिती।।३१।। विठ्ठल देवता सर्व समाजे स्वीकारीली। कोणीही तिची पूजा उपासना करी। नसे येथे लिंग भेद समान सारी। असती त्यामध्ये अठरापगड जाती।।३२।। ज्ञानेश्वर उत्कट प्रेमाते म्हणती। विठ्ठालाला माझी विठाई माऊली। विठाई विठाई कृष्णाई कान्हाई। कान्हाई माऊलींच्या प्रेमात नाहती।।३३।। विठाई पुरवी सर्वांचे लाड व हट्ट। ऐसे म्हणती सारे संत विठ्ठलभक्त। सारे भक्त विठ्ठलास म्हणती विठाई। लाडकी ती जननी सर्वांची।।३४।। विठोबा दैवत म्हणजे वात्सल्य। कारुण्याचे ते शोभे मूर्त रुप। ऐके तो संताचे गाऱ्हाणे सतत। आपलेसे करुन देई

ममत्व।।३५।। आपुले आवडीने करावे नित्यकर्म। कर्मीच भक्तांसी भेटतो ईश्वर। फुलवितो तो मळा सावताचा। होई सावताची कांदामुळाभाजी।।३६।। नरहरी सोनार करी नामाचा व्यापार। सेनान्हाव्यासाठी करी हजामत। जनाबाईचे करीतो दळणकांडण। राखतो प्रेमे गुरे चोखोबाची ।।३७।। झाला ज्ञानोबाही माऊली सर्वांची। विठ्ठल असे त्याचा कान्हाई विठाई। फुलवी संतांचा मेळावा तोची। अवघे रंगुनी पांडुरंग गाती।।३८।। पंढरपुराची वारी असे पुरातन। होती चालू ज्ञानेश्वर पूर्व काळी। वारकऱ्यांचा भाव देव तो विठ्ठल। पांडुरंग दर्शनी अवघे समाधान।।३९।। एकादशी दिनी पंढरपुरासी। विठ्ठलाचे नाम गाजे भीमातीरी। भक्तांचा पुर लोटे बुधवारीही। मानिती माझे सर्वस्व विठाई।।४०।। विठ्ठलाशी सर्वांचे लेकराचे नाते। विठ्ठलरुपातची सर्वा माय भेटे। गर्जती भक्त माझे माऊली येई। माझे पंढरपुरची आई तू कान्हाई।।४१।। झाला अवघा महाराष्ट्र पवित्र। पंढरपुरी नांदे भूलोकीचे वैकुंठ। रखुमाई विठाई सांभाळती भक्त। भक्तासी अन्य दुजी नसे आस।।४२।। पुंडलीकाचा विठ्ठल झाला कान्हा। पंढरपुरासी प्रेमे धावूनी आला। कटीकर ठेवूनी राहीला उभा। युगे अठ्ठावीस सांभाळी सर्वा।।४३।। वाहे येथे भरुनी भीमानदी। साऱ्यांचे सारे दोष ती दूर करी। सारेची जन असे म्हणती म्हणूनी। शापित होता चंद्र डुंबला प्रवाही।।४४।। करता चंद्राने भीमानदी स्नान। आले नदीला चंद्राकार रुप। चंद्रभागा नाम झाले तिज प्राप्त। झाली चंद्रभागा येथे भीमा

नदी।।४५।। म्हणती ज्ञानोबा पंढरपुरी परब्रह्म। विठोबा झाले ब्रह्मादिका ध्यान। डोळसु सुंदर हे त्याचे रुप रम्य। गोपवेषु येऊनी राहीला उभा।।४६।। नामदेव म्हणे आले भक्तिमिषें। विठ्ठलवेषें ते वीटेवर ठाकले। वेद झाले मौन श्रुतीस कानडे। भावाचे आपुले भुलले भक्ति सुखे।।४७।। विठ्ठलाची भक्ती जनीस जडली। नामदेवाच्या घरी नामाच्या संगती। झाला देहाचा पालट म्हणे जनाई। भावचित्त मावळीले ठायीच ठायी।।४८।। म्हणे ती गेली माय बापही गेला। सांभाळी बा मज तू ची विठ्ठला। म्हणे येई येई ग माझे विठाई। माझे पंढरीचे आई विठाबाई।।४९।। संत जनाबाई भक्तीत नहाली। देहात राहुनी विठुरुप झाली। म्हणे तो माझे दळणकांडण करी। त्याच्याविना जनीचे कामच नाही।।५०।। संत एकनाथ म्हणती हे माझे माहेर। विठ्ठल रखुमाई माझे मायबाप। नित्य वाहे भक्ती प्रेमाचा पूर। असे हे सकल प्रेमाचेच निधान।।५१।। एकनाथा घरी नांदे पांडुरंग। श्रीखंडया बनुनी भरी रांजण। उगाळितो पूजेसाठी स्वत: चंदन। भक्तीचा भुकेला असे हा विठ्ठल।।५२।। नाथांचे पणजोबा भानुदास महाराज। म्हणती न मागताही आला पंढरीस। तू मायबाप विश्वाचा तारक। पुंडलीक तू ची रे सुखी केला।।५३।। विठ्ठलाचे नाम गाता तुकाराम। देहीच होती सहजी समाधिस्थ। म्हणती मुखे झाला विठ्ठल टाळ। विठ्ठलची तोंडी उच्चारी ते नाम।।५४।। संकल्प साधना सारेची विठ्ठल। भावावस्थेत दिसे विठ्ठल सर्वत्र। झाले तुकाराम

देहीच विठ्ठलमय। लाभली त्यांना समाधी भावगर्भ। ।५५।। अवघ्या महाराष्ट्रचे आराध्य दैवत। कानडाऊ विठ्ठलु म्हणती यास सर्व। त्यामागे एक असे महत्त्वाचे कारण। याला भानुदासांनी आणला परत। ।५६।। होता हा जरी प्रकटला पंढरपुरात। परी आले जेंव्हा येथे यवन साम्राज्य। निर्माण झाले मूर्ति भंजकापासून भय। नेला पुजाऱ्यांनी यास कर्नाटकात। ।५७।। भानुदासांनी आणला परत पंढरपुरास। कर्नाटकातही असती अनेक भक्त। येती भक्तिभावे तिथुनही वारीस। वारकरी घेऊनी हाती टाळ मुदुंग ।।५८।। द्वैत संप्रदाय स्थापक श्रीमद्‌मध्वाचार्य। केला कर्नाटकात विठ्ठलभक्ती प्रसार। त्यांचे अनुयायी श्रीपादराय, व्यासराय। त्यांचे सारे शिष्य झाले विठ्ठलभक्त। ।५९।। कर्नाटकात असे दास परंपरा प्रसिध्द। त्यांच्या संप्रदायास म्हणती दासकूट। यामध्ये होऊन गेले अनेक भक्त। पुरंदरदास, कनकदास, विजय, जगन्नाथ ।।६०।। पुरंदरदास म्हणविती पुरंदर विठ्ठल। जाहला विजयदास विजय विठ्ठल। जगन्नाथ झाला जगन्नाथ विठ्ठल। झाले जनप्रिय हे दासकूट संत। ।६१।। पुरंदरदासाची माता लक्ष्मी पिता वरदप्पा। वाटले त्यांना व्यंकटेश पोटी यावा। केली उपासना त्यांनी पूर्णवर्षे बारा। त्यांच्यावर व्यंकटेश प्रसन्न झाला ।।६२।। व्यंकटेशाने दिला त्यांना दृष्टांत। येईल तुमचे पोटी नारदाचा अंश। इ.स. १४८४ मध्ये झाले पुत्ररत्न। ठेविले त्याचे नाव श्रीनिवास। ।६३।। कौतुके पुकारती त्यास सिनप्पा नामे। विद्वान आचार्यांकडे याचे

शिक्षण झाले। संगीताची आवड सिनप्पास असे। केला शास्त्रीय संगीताचा अभ्यास त्याने।।६४।। वरदप्पा नायकांचा सराफी व्यवसाय। सिनप्पाने नेला भरभराटीस व्यवसाय। होता सिनप्पा रत्नपारखी कुशल। कृष्णदेवरायाच्या दरबारी होता मान।।६५।। झाला सिनप्पा धनलोभे कंजुस। धनसंपत्तीचा चढला त्यास गर्व। होती संसारदक्ष पत्नी, संतती उत्तम। पत्नी सरस्वती स्वभावाने उदार।।६६।। मुळात होता सिनप्पा नारदाचा अंश। घेतली एकदा परीक्षा स्वतः विठ्ठलानेच। आला विठ्ठल गरीब ब्राह्मण वेषात। सिनप्पाने भिक्षा न दिली त्यास।।६७।। गेला सरस्वतीने विठ्ठल भिक्षेस। सरस्वतीने दिली त्याला स्वतःची नथ। आला घेऊन सिनप्पाकडे तो नथ। सिनप्पाने ओळखली पत्नीची नथ।।६८।। आला घरी रागे बंद करुन दुकान। पत्नीकडे त्याने मागितली नथ। घाबरुन तिने घेतले हाती विष। त्या विषात नथ पडली अलगद।।६९।। सांगितला तिने घडलेला प्रकार। ऐकून सिनप्पास झाला पश्चाताप। सोडीला सिनप्पाने स्वतःचा संसार। त्यागुनी सारे निघाला विठ्ठल शोधार्थ।।७०।। गेला हंपी येथे भटकत भटकत। केली उपासना व्यासरायांचे सहवासात। दिले व्यासांनी पुरंदर विठ्ठल नाम। सिनप्पा पुरंदरनामे झाला प्रसिध्द।।७१।। नारदाप्रमाणे केला सर्वत्र संचार। अंधश्रध्दा दूर करुन दाविला सन्मार्ग। कीर्तनातून भक्तीचे गोडवे गाऊन। सांगितले सर्वा मानव जन्म रहस्य।।७२।। आला हंपीस पुन्हा पुरंदरदास। करु लागला तेथेच कीर्तन प्रवचन।

त्याची सेवा, विठ्ठल भक्ती पाहून। त्याला नेण्याआला स्वतः विठ्ठल। ।७३।। गेला आनंदून होता विठ्ठल दर्शन। केले विठ्ठल वर्णन स्वकाव्यातून। देव बंदा नम्म स्वामी बंदानो। देवरदेव शिखामणि बंदानो (अर्थ:देव आला माझा स्वामीच आला। सर्व देवांचा शिखमाणीच आला)।।७४।। होते असे कर्नाटकात विठ्ठलभक्त। ऐसाची भक्त होता कनकदास एक। त्यालाही होता विठ्ठल भक्तीचा नाद। हा ही होता दासकूटातील प्रसिध्द संत।।७५।। विठ्ठलाचा महीमा असे उत्तर भारतात। संत नामदेवे केला भक्तीचा प्रसार। शिखांचा धर्मग्रंथ असे ग्रंथसाहेब। नामदेव कृत विठ्ठल कवने असती त्यात।।७६।। पोर्तुगीज पूर्वकाळी गोवा प्रांतात। रुजली होती विठ्ठलभक्ती जनमानसात। ज्ञानेश्वर काळी गेले तेथे विठ्ठल संप्रदाय। गाती विठ्ठल गीते जन देवळात।।७७। म्हणती जावे सर्वांनी या जन्मातच। पाहण्या विठ्ठलाचे पवित्र सुंदर रुप। आपल्या यात्रेकरुंची वाट पाहात। विठ्ठल स्वतः तेथे असे उभा।।७८।। पंढरीचा विठ्ठल असे देवांचा देव। असे लोक दैवत ते गोवा व कोकणात। जात्यावरील ओव्यांच्या ग्रंथात। वाहे भरुन विठ्ठल भक्तीचा पूर।।७९।। विठ्ठल भक्तीत होई भावनेचा उद्रेक। भाविकता अन् श्रध्देचे घडे दर्शन। विसरुन सारे भेद आपापसातील। विठ्ठलाभोवती होती गोळा सारे भाविक।।८०।। तुकारामास गुरु माने भक्त बहिणाबाई। भक्ति, तिचे व्यक्तिमत्व भिन्न जरी। तुकारामाची ती शिष्या असुनही। असे तिची अभंगवाणी

वेगळी।।८१।। असे अभंगवाणीवर तुकाराम संस्कार। अभिव्यक्तिवर त्याची छाया दाट। झाली होती बहिणा तुकाराममय। गाते गौरवाने भक्तीचे अभंग।।८२।। इमारतीचा पाया असे ज्ञानदेव। करी प्रसार तो संत नामदेव। संत एकनाथे दिला असे आधार। म्हणे बहिणा तुकाची वरती कळस।।८३।। म्हणे बहिणाई तुकाच पांडुरंग। असे झाली कृपा तिच्यावर थोर। तुकारामामुळे झाला भक्तीचा उदय। तनीमनी घुमला विठ्ठल गजर।।८४।। संतांच्या किर्तनी गुंजले विठ्ठल नाम। केले समाजाचे त्यांनी प्रबोधन। अंधश्रध्दा रुढीवर करुनी प्रहार। केले विठ्ठल भक्तीचे मुक्तद्वार।।८५।। नामदेव रंगे विठ्ठल कीर्तनी। विठू नाम गाई तो बेभान होऊनी। ऐसे विठ्ठलाचे कीर्तनी रंगरंगुनी। म्हणे लावू ज्ञानदीप आम्ही जगी।।८६।। तुकोबाने कीर्तनी करुनी नामस्मरण। भक्तिमार्ग महीमा केला वर्णन। नको मंत्र नको जप म्हणे तुकाराम। पांडुरंग हाची सर्वांसी आधार।।८७।। संत म्हणती करा आपुले काम। मुखी असो द्यावे विठ्ठल नाम। मुक्तीचा सोहळा होईल प्रत्यक्ष। हवे कशास येथे इतर साधन।।८८।। ऐसा हा विठ्ठलाचा महिमा गायिला। संतानीच महाराष्ट्र पुरोगामी केला। टाळ घेऊनी केला नाम सोहळा। जना अंतरंगी ज्ञानदीप उजळीला।।८९।। विठाईच्या दर्शनी मानिती सर्वसुख। पाहती विठ्ठलास माऊलीचे रुपात। विठाई उभी ज्ञानभक्तीच्या समचरणावर। देते भक्तांसी प्रेमाचे माहेरपण।।९०।। नाचत गात चालती पंढरीची वाट। असे हा प्रेमभक्तीचा

अद्‌भूत प्रवास। भक्त हृदयी असे एकची आस। माझ्या माऊलीस भेटेन मी जाऊन।।९१।। होता पूर्वी वारी धार्मिक कार्यक्रम। जात होते वारीस ग्रामीण जन। आज अनेक सुशिक्षित जन। झाले आहेत यात्रेकडे आकर्षित।।९२।। पंढरपुरी विठ्ठलाचा निरंतर वास। वारीला ७००/८०० वर्षांची परंपरा। लांब पल्ला प्रवास करती पायीच। करती पार वारकरी अठरा दिवसात।।९३।। पंढरपुरी पोहोचता आनंद अलौकिक। भू वैकुंठात नांदे कृष्ण युगानुयुगे। ऐसा नाम घोष ऐसे पताकांचे भार। दावा अन्य कोठे म्हणे सेना महाराज।।९४।। भक्त पाहती भगवंताची वाट। नसे ही तर नवलाईची मात। परी प्रेमे वाट पाहती भगवंत। ऐसे भूलोकी सांगा कोठे आहे।।९५।। येती आता देशोदेशीचे जन। अनुभवण्यास विठाईचे भक्तिप्रेमेसुख। संताची विठाई जाहली जगन्माऊली। भक्तीचा पूर ओसंडून वाहे पंढरपुरी।।९६।। श्रीरामाने केला पृथ्वीवर देहत्याग। श्रीकृष्ण सारे त्यागुन गेला वैकुंठास। परी तो नांदतो कान्हाई विठाई होऊन। युगानुयुगे तो भक्तांसी प्रेमे सांभाळीतो।।९७।। म्हणून असे सारे अलौकिक दिव्य। अनुभवावे प्रत्यक्ष पंढरपुरी जाऊन। नाचतो भक्तासवे कसा पांडुरंग। अनुभवा त्याचे समोर स्वतः नाचून।।९८।। पंढरपुरी घ्यावे पुंडलीक दर्शन प्रथम। मग नामदेव पायरीसी करुन नमन। मंदिरातील गरुड खांबास करावे वंदन। मग पुढे जाऊन घ्यावे विठ्ठल दर्शन।।९९।। विठू विठ्ठल नामाचा टाहो पांडुरंग। करु मी

कैसे त्याचे वर्णन। विठाईचे प्रेम वर्णिती समर्थच। स्वामींच्या चरणी ठेवितो माथा।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।नववा अध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री कृष्णाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीस्वामींनी दिधली स्फूर्ती। ठेविला गजानने कर मस्तकी। झाली प्रसन्न देवी सरस्वती। सर्वांच्या कृपे ही लेखणी लिहीती।।१।। श्रीकृष्ण चरीत्र असे अपार। पडतसे अपुरा तेथे शब्दसागर। परी स्वामीकृपेचा लाभता कर। होऊ लागली नवशती साकार।।२।। केल्या श्रीकृष्णाने लीला मधुर। मारीले कृष्णाने दैत्य क्रुर। शिकविली सर्वा रणनीति चतुर। आवश्यक असे स्थापण्या धर्म।।३।। करुनी आपुले सर्व कार्य पूर्ण। स्वशरीराचा नंतर त्याग करुन। करणार श्रीकृष्ण आता वैकुंठ गमन। तत्पूर्वी दिले त्याने उध्दवास ज्ञान।।४।। सांगितले कृष्णाने उध्दवास। केले असे मी पूर्ण देवांचे कार्य। झाले आमुचेही कुल शापदग्ध। घेतील करुन सर्व आपुलाच घात।।५।। लवकरच समुद्र गिळील द्वारकेस। होईल आत माझेही गमन। नंतर कलीयुगाचा होईल प्रारंभ। रहावे उध्दवा तू ही सावध ।।६।। करावी तू संन्यासवृत्ती धारण। करावेस तू आता पृथ्वी पर्यटन। सांगावे सर्वा हे विश्व असे भ्रम। नश्वर असे सारे येथले जग।।७।। तू

स्वत:ही आत्मद्रष्टा व्हावेस। सर्वाभूताठायी जाणावे तू मज। ठायी ठायी असे मी, मीच असे सत्य। करावेस तू सर्व भूतमात्रांवर प्रेम।।८।। उध्दव पुसतसे तेंव्हा श्रीकृष्णास। संसारी पुरुषांस अशक्य संन्यास। कृपया करावा आपणच उपदेश। करावे माझ्या आयुष्याचे सार्थक।।९।। कृष्ण तेंव्हा म्हणती उध्दवास। मानावे आपण गुरु आत्म्यास। सर्व दर्शने घेती आत्म्याचा शोध। प्रत्यक्षादि प्रमाणे ठरती अपूर्ण।।१०।। कथिला अवधूत अन् राजाचा संवाद। केले त्याने चोविस गुरुवर्णन। ते ऐकून राजा झाला संग- विमुक्त। झाला ज्ञानमार्गाने तो समाचित्त।।११।। आपल्या स्वधर्माची उपासना करुन। ममस्थानी नितांत भक्ती ठेवून। निवृत्त होऊन करी कर्माचे आचरण। भक्तीने करावी कर्मे मज अर्पण।।१२।। ज्ञानास्तव हवा स्वइंद्रिय - निग्रह। द्रव्याविषयी असावे सदा उदासीन। असावी भूतदया सदा अंत:करणात। देहापासून असे आत्मा अलीप्त।।१३।। सत्त्वादिपासून देह होई उत्पन्न। परी परमात्मा तर असे निर्गुण। बुध्दि शुध्द होता होती गुणनष्ट। शुध्दबुध्दिसच आत्मा असे गोचर।।१४।। बध्द आणि मुक्त शब्द केवळ मायाजन्य। नसे तयांचा आत्म्याशी संबंध। असे जीव हा सदा मायेने बध्द। साक्षी त्याचा असे आत्माराम।।१५।। सूर्य आकाशाने न होतसे लिप्त। तैसा विद्वान सुखदु:खापासून अलिप्त। ज्ञानी न होई विषयात आसक्त। सर्व संसार वाटे त्यास स्वप्नवत।।१६।। येथे निरुपयोगी रे शब्दज्ञान। असावे लागते अनुभव ज्ञान। व्हावे

अंत:करण ब्रह्मपरी लीन। असे हे तर फारच अवघड कर्म।।१७।। म्हणूनी जीवाने आचरावी सर्व कर्म। करावी निरपेक्षपणे मलाच अर्पण। न पेक्षा त्याने ऐकावी माझी चरीत्र। श्रध्देने करावे त्याचे चिंतन।।१८।। करावी माझी भक्ती निरपेक्ष। घ्यावा त्यासाठी सद्‌गुरु आश्रय। गुरुकडून घ्यावे ममस्वरुप ज्ञान। ऐसा भक्त असे मज प्रिय।।१९।। माझा भक्त कृपाळु, सहनशील। नि:पक्षपाती, सत्यमूर्ती, सर्वोपकारक। अजातशत्रु, विषयत्यागी, पवित्रउदार। मिताहारी, निरिच्छ, शांत, स्थिर।।२०।। अप्रमादी, गंभीर, शिष्यवृत्ति, धैर्यवान। करुणापूर्ण, बुध्दिमान, निष्ठावान। अैसे मम शिष्य मज अनन्य शरण। सर्वस्व अर्पणोने घडे दर्शन।।२१।। उध्दवाने कृष्णास विचारल्या विभूती । सांगितल्या कृष्णाने त्या त्याजसी। या शिवायही असती काल्पनिक विभूती। वर्णन करण्या असमर्थ वाणी।।२२।। सांगितले उध्दवास कृष्णाने पूर्ण। चार वर्ण, पुरुषार्थ चार आश्रम। सांगितले वेदांतील विधि - निषेध। असती वर्णिले वेदात वर्णाश्रम भेद।।२३।। कृष्णाने केला योग त्रयींचा उपदेश। कर्म भक्ती आणि ज्ञान हे योग। केले तयांचे विस्तृत वर्णन। सांगतो येथे ते संक्षिप्त।।२४।। नसे ज्याचे मनी वैराग्य उत्पन्न। असती तयांसी कामना इतर। असे त्यांच्यासाठीच कर्मयोग। करावे ईश्वरास कर्मी प्रतिष्ठित।।२५।। कर्म करता करता करावे स्मरण। कर्मीच पहावा सतत ईश्वर। नामस्मरण असे उत्तम साधन। घडतसे यातून निष्काम कर्मयोग।।२६।। काही नसती विरक्त

अनासक्त। परी पूर्व संचिताने मनी ईश्वरप्रेम। करीता त्यांनी मम चरित्रांचे श्रवण। साधेल मग तयांसी भक्तियोग।।२७।। भक्ती म्हणजेच जो नसे विभक्त। म्हणुनीच असे मनाने मम समीप। आचरीता ऐसा निष्काम भक्तियोग। घडे तयासी माझे प्रत्यक्ष दर्शन।।२८।। जे करती कर्मे अन् कर्मफलत्याग। असती सदैव संसारातून विरक्त। असे त्यांच्यासाठी ज्ञानयोग। यास विहंगम मार्ग ऐसे म्हणती।।२९।। कर्ममार्गाचे साधन असे शरीर। भक्तिसाठी साधन आपुलेच मन। ज्ञानमार्ग असे बुध्दिप्रधान। बुध्दिच असे ज्ञानमार्गाचे साधन।।३०।। परमात्म्याचा मार्ग सांगती कृष्ण। निस्सीम भक्ती मजठायी नित्य। भक्तीनेच जीव येई ज्ञानप्रांगणात। म्हणून भक्तीचे महत्त्व अधीक।।३१।। आपुले शरीर हाच एक वृक्ष। घरटे करुन जीवपक्षी करी निवास। झाड तुटता जीवपक्षी उडून। घेई तो अन्य वृक्षाचा आधार।।३२।। तैसाची भक्त देहासक्ती सोडून। होई जेंव्हा तो परमात्मात स्थिर। तेंव्हाच जीवास लाभे पूर्णत्व। त्यास्तव महत्त्वाचे शरीररुपी तरुच।।३३।। भक्ती बाणण्यास शरीर आधार। त्यासाठीच महत्त्वाचा हा नरजन्म। म्हणूनीच सांभाळावे शरीर। परी फक्त महत्त्वाचे साधन म्हणून।।३४।। संतसंगतीने भक्तीस येई दृढता। भक्तिविना ज्ञान न लाभे जीवाला। अशक्य जे योग, सांख्य, धर्म तपाला। तैसे स्वाध्याय, व्रत, यज्ञ, तीर्थाला।।३५।। विषयसंग मुक्त करी ती जीवाला। ऐशी असे ही भक्तिसाधना। नसे त्यासाठी ज्ञानाची आवश्यकता। करावी फक्त

निष्काम उपासना।।३६।। भक्तिसाठी अव्यभिचारी श्रध्दा। असावी मज ठायी अनन्य शरणता। त्यातूनच प्राप्त होई भयशून्यता। असे निष्काम, निर्भय, भक्तसदा।।३७।। तीन गुणांनी नित्य बध्द जीव। सत्त्वाने करावा रजतमाचा नाश। वाढेल त्यामुळे मद्‌भक्ति व मद्‌धर्म। होतो त्यामुळेच ज्ञानाचा विस्तार।।३८।। कामक्रोधादिकांचा जनक अहंकार। लावीतसे तोच कराया सकाम कर्म। म्हणुनी प्रयत्ने करावा त्याचा नाश। जाता अहंकार होई जीव मुक्त।।३९।। हंसरुप घेऊन मी सनकादिकांस। जो काही केला होता उपदेश। सांगीन तयाचे तात्पर्य मी तुज। या उपदेशास म्हणती हंसगीता।।४०।। प्रथम जाणावे नसे वस्तूत अनेकत्त्व। मनगुणांच्या संगमाने दिसे अनेकत्व। जागृती, स्वप्न, सुषुप्ती हया तीन। बुध्दिच्या वृत्ति गुणापासून उत्पन्न।।४१।। मनाच्या हया तीन अवस्था मायाकृत। तर्कशती वाढण्या करावा निश्चय। वेदवाक्य खड्‌गाने संशयवृक्षाचा विच्छेद। करुनी करावे माझेच भजन।।४२।। आलात चक्राप्रमाणे क्षणभंगुर। असे मायेचा विलास विश्वचमत्कार। (आलात चक्र म्हणजे मशाल गरगर वेगाने फिरविता अग्निचक्र दिसते.) वास्तविक ज्ञान हे एकची सत्य। मायेने प्राप्त होती रुपे अनेक।।४३।। म्हणुनी व्हावे विषयातून निवृत्त। स्वच्छचित्ताने घ्यावा निजसुखानुभव। मनुष्य देह तर आपला असे नश्वर। काळजी त्याची घेण्याचे नसे कारण।।४४।। प्रारब्ध असे पर्यंतच राही ब्रह्मज्ञ पुरुष। त्याचे नित्य व्यवहार असती असत्य। न बाधती त्यास हर्ष, खेद

विकार। असे तो तर या सर्वातून विरक्त।।४५।। योगाची प्रतिष्ठाही असे मीच। असे मीच सांख्याचा आश्रय। तेजाचा निधी, सत्याचा आधार। मीच श्री, कीर्ति, दंभ, ऋत।।४६।। सर्गकाली केला मी ब्रह्मास उपदेश। परंपरेने आला तो मनुष्यलोकाप्रत। सत्त्वरजतमादिंचे होऊनी मिश्रण। झाले एकच धर्माचे अनेक प्रकार।।४७।। मायेच्या योगाने भासे अनेकत्व। कर्म, रुचि ज्ञानाप्रमाणे होतसे फरक। यामुळेच शोक, मोह होती उत्पन्न। असती दुःखमूलक अज्ञानपूर्ण नश्वर।।४८।। माझ्या भक्तास जे लाभे सुख। ते इंद्र वा ब्रह्मलोकातही अशक्य। भक्तास माझ्या हवे भक्तिसुख फक्त। नसे योग, सिध्दी मोक्षाची चाड।।४९।। सांगितले कृष्णाने त्याला योगध्यान। केले नंतर अठरा सिध्दींचे वर्णन। अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राकाम्या। ईशिता, वशिता हया असती मुख्य।।५०।। सिध्दींचे आश्रयस्थान अन् स्वामी मीच। परी त्यांच्याकडे करावे दुर्लक्ष। करावे मोक्षार्थीने माझेच ध्यान। आता करीन वर्णाश्रम धर्म कथन।।५१।। कृतयुगात मनुष्याचा एकच वर्ण। 'हंस' असे होते त्या वर्णाचे नाव। होते या युगात जीव कृतकृत्य। म्हणुनीच म्हणती यास कृतयुग।।५२।। वेदत्रयी झाली प्रगट त्रेतायुगात। झाले सुरु तीन प्रकारचे यज्ञ। विप्र, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे वर्ण। झाले सर्व विराटपुरुषा पासून।।५३।। मुख, बाहु, ऊरु आणि चरण। अनुक्रमे यापासून झाले चतुर्वर्ण। तैसेची आले तेंव्हा चार आश्रम। ब्रह्मचार्य, गृहस्थ, वानप्रस्थ व

संन्यास।।५४।। जघनापासून झाला गृहस्थाश्रम। ब्रह्मचर्याश्रम आला हृदयापासून। त्याच्या वक्षापासून वानप्रस्थाश्रम। आला मस्तकापासून संन्यासाश्रम।।५५।। शम, दम, तप, शौच अन् संतोष। क्षमा, ऋजुता, मद्‌भक्ति, दया, सत्य। असती हे सारे ब्राह्मणाचे धर्म। करावे ब्राह्मणांनी यांचे पालन।।५६।। तेज, बल, धैर्य, सहनशीलता, शौर्य। औदार्य, उद्योग, स्थिरता, ऐश्वर्य। ब्रह्मधर्मावर श्रध्दा हे क्षत्रियाचे शील। असती हे सर्वच क्षत्रियाचे धर्म।।५७।। आस्तिक्य, दाननिष्ठा, दंभशून्यत्व, वेदसेवा। अर्थसंग्रह आणि समाधान शून्यता। असती हे वैश्याचे स्वाभाविक गुण। करावे वैश्याने या धर्माचे पालन।।५८।। गोब्राह्मणांची आणि देवांची सेवा। जे मिळेल त्यातच संतोष मानावा। प्रकृतिसिध्द धर्म असे हा शूद्रांचा। असती असे चतुर्वर्णांचे धर्म।।५९।। अहिंसा, सत्य आणि अस्तेय। काम क्रोध लोभशून्यत्व, भूतकल्याण। सर्वही गुणांचा एकत्र समुदाय। हा धर्मादर्श सर्व वर्णांस साधारण।।६०।। स्वधर्माचे करीता शुध्दाचरण। होई तयास ज्ञान व भक्तिचा लाभ। स्वर्गस्थही इच्छिती मनुष्यलोकी जन्म। कारण याच लोकी होई भक्तिलाभ।।६१।। म्हणुनीच प्रयत्नपूर्वक या आयुष्यात। मोक्षास्तव व्हावे मुक्तसंग। सात्विक बुध्दिने करावे मन आत्मवश। सांख्यमार्गाने मिळावावे ज्ञान।।६२।। भक्तिने होतसे वासनांचा क्षय। असे मीच भक्तहृदयीच स्थित। असता निरपेक्ष भक्ति अंतःकरणात। होई प्राप्त तयास परमपुरुषार्थ।।६३।। असा

हा सांगितला आदर्श मार्ग। असे हा भक्ति - ज्ञान - क्रियात्मक मार्ग। योग्यतेनुसार कर्म करणे हा गुण। योग्य कर्म न करणे हा असे दोष।।६४।। अधिकारानुसार करावे वेदविहीत कर्म। परी करताना ठेवावे माझे स्मरण। मंत्रासह करावे मज बुध्दिपूर्वक अर्पण। असे श्रध्दायुक्त कर्म होई धार्मिक।।६५।। असे सामान्यजीव अविद्याग्रस्त। सद्‌गुरुंकडेच लाभे खरे ज्ञान। ज्ञान हा असे प्रकृतीचा गुण। परी आत्मा आपला असे निर्गुण।।६६।। सत्त्व - रज - तम हे ही प्रकृतीगुण। असती उत्पत्ति - स्थिती - लयाचे कारण। सत्त्वगुण म्हणजे असे प्रकृतिज्ञान। रज गुणापासुन होतसे कर्म।।६७।। सर्वाचेच अज्ञान हे तमाचे लक्षण। ऐसे असती तीन गुणांचे अर्थ। असता हे तीनही गुण समसमान। असते प्रकृती अव्यक्तावस्थेत।।६८।। होता या गुणांमध्ये विषमभाव। त्याचे कारण काल, स्वभाव, अन् सूत्र। सूत्राचा संबंध असे संचित कर्म। व्यवस्था लावती सूत्रात्म्याचे नियम।।६९।। आकाश, वायु, इत्यादि पंचमहाभूते। पुरुष, प्रकृति, विश्व आणि अहंकार। अशी ही सर्व मिळून नऊ तत्त्वे। कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये दहा, मन अकरावे।।७०।। शब्द स्पर्शादि गुण जाणे, येणे। असती केवळ विकार विलास ही कर्मे। मूळ प्रकृती तर कार्यकारणरुपी असे। मूळपुरुष हा तर केवळ द्रष्टाच असे।।७१।। व्यक्तविश्व, अहंकारादि विकार प्रकृतीचे। यापासूनच अंड उत्पन्न होते। सप्तधानू, पंचमहाभूते, आत्मा, इंद्रिये। आणि प्राण असती यास आधार।।७२।। या सर्वांसी

ऐसे करुन उत्पन्न। घेई पुरुष त्यात आपला प्रवेश। चतुश्लोकी भागवत ब्रह्माने नारदास। सांगितला त्यातील हा तिसरा श्लोक।।७३।। पंचमहाभूते, पंचतन्मात्रा, पंचेंद्रिये। ऐसी पंधरा अन् मन हे सोळावे। सतरावा आत्मा अशी सत्रा तत्त्वें। मनच आत्मा मानता सोळाच तत्त्वे।।७४।। प्रकृति - पुरुष भेद होई मायेमुळे। खरतर परमार्थतत्त्व एकच असे। परी सर्वांवर मायेचा प्रभाव असल्याने। करती सर्व अनेक तत्त्वांची मिमांसा।।७५।। जातात येतात अनंत भूतमात्र। दिसत नाही या विश्वात कमीजास्त। परी या मर्त्ययुगात ही मानतो जीव। असे मी नित्य हीच भ्रांती।।७६।। असती शरीराच्या अवस्था अनेक। मृत्युभय वाटे भ्रांतिजन्य भान। सर्वही अवस्था प्रकृतीमुळे उत्पन्न। परी शरीरावर सत्ता गुणांचीच।।७७।। खरतर निःसंग जीवास नसे संबंध। परी तो वाटतो यास मायाकारण। याचे ज्ञान होते फक्त ज्ञानी पुरुषास। येई हे ज्ञान आत्मचिंतनातून।।७८।। असे जीव शरीराहून निराळा। जो जाणतो जीव असे तो द्रष्टा। हे चिरंतन तत्त्व जाणणारा। होतसे तो जीव बंधातून मुक्त।।७९।। जीवनात असे सत्संगाचे महत्त्व। सत्त्वसंगाने देवत्त्व, ऋषीत्व प्राप्त। रजःसंगतीने असुर, मनुष्य जन्म। तमोगुण पशुपक्ष्यादि योनीचे कारण।।८०।। सुटता विषयध्यान संसारपाशनाश। आत्मप्रकाशाने विकल्प भ्रम नाश। ऐसा होई ज्ञानी भ्रम रहीत। संसारात असुनही सदा तो अलीप्त।।८१।। सांगतो आता सांख्यचा अर्थ। होते ज्ञान अन् वस्तु एकच तत्त्व। सत् व

चित् एकाच वस्तुचे वाचक। होते आपणा ज्ञान, ज्याचे ज्ञान तो अर्थ।।८२।। श्रुतीचे विधान असे याहून भिन्न। ज्ञाता आणि ज्ञेय होते एकच। परी ब्रह्म हे शुध्द आणि निर्विकल्प। असे ब्रह्म, वाणी अन् मनास अगोचर।।८३।। मायेनेच सत्याचे होती दोन विभाग। एक प्रकृति आणि दुसरा पुरुष। तम, रज, सत्त्व हे प्रकृतीचेच गुण। त्यास कारण शुध्द चैतन्याचे सामर्थ्य।।८४।। त्यातूनच झाले सूत्रात्मा हिरण्यगर्भ। अहंकार हाच पहिला विकार। तन्मात्रा, इंद्रिये मनाचेच कारण। झाला चित् जड मिळून हिरण्यगर्भ।।८५।। तैजस अहंकारापासून अकरा इंद्रिय। तामस अहंकारातून शब्दादि विषय। साऱ्यांपासून झाले अंड उत्पन्न। हे ब्रह्मांड असे मम वसतिस्थान।।८६।। होते तरंगत जलावर ब्रह्मांड। सगुणरुपे तेथे झालो मी उत्पन्न। नाभीपासून उत्पन्न ब्रह्मदेव। रजयुक्त तपे केले त्याने निर्माण।।८७।। त्यातून झाले लोक व लोकपाल उत्पन्न। राहती स्वर्गलोकात सारे देव। स्थूल व शरीरजन्य जीव भुवर्लोकात। भूलोकात राहती मनुष्यादि लोक।।८८।। स्वर्लोका पलीकडील लोकी राहती सिध्द। असुर व नाग भूमी खालील लोकात। महः, जनः, तपः, सत्य या लोकात। राहती योगी, तपस्वी, संन्यासी, भक्त।।८९।। सत्यलोक हे असे माझे भुवन। देतो मी कालरुपाने कर्माची जोड। येथेच प्रकट होतो गुणप्रवाह। येथेच गुणप्रवाह होतो प्रलीन ।।९०।। दृश्यवस्तु असे प्रकृतीपुरुषाचे कार्य। पदार्थाच्या आदि, अंती, मध्या तीन। मधली स्थिती म्हणजेच

विकार। आदि, अंतीची स्थिती असे सत्य।।९१।। येते सात्विक गुणातून निर्भयत्त्व। अस्वस्थता मन:संताप रजाचे प्राबल्य। मन:शून्यता, अज्ञान तमोगुणातून। असे हा प्रभाव त्रिविध गुणांचा।।९२।। विविध सामर्थ्य असे त्रिगुणांस। गुणकर्मातूनच होई संसार उत्पन्न। ज्ञान - विज्ञानदायक देह होता प्राप्त। करावा प्रयत्ने गुणसंगतीचा त्याग।।९३।। सांगतो उध्दवा तुज ऐकावे नीट। करावे श्रध्दापूर्वक आपुले कर्म। कर्म करताना असावे माझे स्मरण। मन व चित्त करावे मजसी अर्पण।।९४।। करावे नेहमी माझ्या गुणांचे संकीर्तन। समदृष्टि ठेवावी नेहमी सर्वत्र। असावे सदैव वृत्तीने विनम्र। भूतसेवा करावी ब्रह्म मानून।।९५।। गुरुमुखाने करावे श्रुती श्रवण। गुरुपासूनच आत्मविद्या संपादन। मनन निदिध्यासाने संशय - विच्छेद। ऐसे परमात्मा आराधन करील मुक्त।।९६।। पुनः पुनः सांगतो ऐकावे नीट। करावे प्रत्येकाने विहीत स्वकर्म। निष्काम भक्तिने ज्ञान संपादन। तेणेच होशील उपसर्ग विमुक्त।।९७।। ऐकून ऐसा भगवंताचा उपदेश। झाला उध्दव भक्तिने सद्‌गदित। मग सारे आपुले सामर्थ्य एकवटून। ठेवले भगवंत चरणकमलावर मस्तक।।९८।। ऐसा हा संवाद सकल जनोपकारक। भक्तासी भगवंत होईल प्राप्त। स्वामीकृपेने जाणून या संवादाचा अर्थ। झाले गणेशाचे अष्टभाव जागृत।।९९।। ठेवून सद्‌गुरु स्वामीचरणी मस्तक। मागतो पुनः पुनः त्यांचे आशीर्वचन। करुनी आपुल्याकृपेने या गणेशास धन्य। द्यावे स्वामीसेवेचे पुण्य

वरदान।।१००।।

।श्री कृष्णार्पणमस्तु।

।श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

**मराठी गीता सार**

वसुदेव सुतं देवं कंस चाणुर मर्दनम्
देवकी परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरु
भगवान गोपाल कृष्ण महाराज की जय
ऐकूनी गीता गान मधूर मन विसरे जगजंजाळ गीता ज्ञानाचे भांडार
भगवान गोपाल कृष्ण महाराज की जय
कथिली गीता कृष्णे पार्था मोहाचा तू त्याग करी सौख्याचा संसार करी
प्रथमाध्यायी सैन्य पाहूनी अर्जून मोहित झाला।
म्हणूनी द्वितीयाध्यायी त्याने सांख्य योग तो वदला आचरावे तत्त्वाला
देह विनाशी शोक कशासी ऊठ घेई तू चाप करी सौख्याचा संसार करी।।१।।
कर्मावाचूनी राहसी कैसा प्रकृती घे करवोनी
यास्तव विहिता विहित कर्माते करी फल आशा त्यजूनी कथी तिसऱ्या प्रकरणी
चौथ्याध्यायी अनंतशायी कर्म ब्रह्मरुप मनी धरी सौख्याचा संसार करी।।२।।

कर्मयोग संन्यासी एकच कथिले सिध्दांताचे
समदृष्टिचे ब्रह्मी रंगले साचे कृत कृत्याचे पंचम अध्यायाचे।
साधायास योगाभ्यास षष्ठध्यायी कथी हरी सौख्याचा संसार करी।।३।।
ज्ञान विज्ञानही ज्ञाना त्यजुनी मायिक जगदोत्पत्ती
त्रिगुणात्मक मम माया दुस्तर तरीती शरण जे येती सप्तमी भगवत् उक्ति
कथी अठव्याते सतत चिंतने मृत्यू समयी पावतो हरी सौख्याचा संसार करी।।४।।
भक्त अनन्ये जीवलग माझा मी त्याचा कैवारी
हो कां शुद्र वैश्य अथवा नारी मम पदीचे अधिकारी कथी नवव्यात मुरारी
दहाव्याध्यायी अनंतशायी वर्णी विभुती किती तरी सौख्याचा संसार करी।।५।।
अकराव्यात् विश्वरुपाते अर्जुन पाहता झाला
अंत न बघता महाभयंकर काळाच्या काळाला जग शासन कृत्याला
भक्ती सोपा भगवत् रुपा बारावा हा हृदयी धरी सौख्याचा संसार करी।।६।।
तू क्षत्रिय नव्हे क्षेत्र योग तो तेराव्या मध्ये कथिला

शरीर क्षेत्र जाणे ज्याला तो क्षेत्रज्ञानी वदला मग प्रकृति पुरुषाला
चौदाव्यात त्रिगुण वृत्तांत गुणातीत परी माय हरि सौख्याचा संसार करी।।७।।
वेदांचे ते परम गुहय ते कथिले पंधराव्यात
क्षराक्षराहूनि विभिन्न मजला पुरुषोत्तम म्हणतात केवळ अभिधानात
सोळाव्यात सभाग्य पार्थ दैवी संपत्ति श्रवण करी सौख्याचा संसार करी।।८।।
उपदेशी श्रध्दात्रय भाग सतरावे अध्यायी
गुणानुसरते वरते श्रध्दा राजस तामस पाही हो सात्विक अनुयायी
तो अठरावा ध्यानी धरावा टाकूनी सर्व ही हरिवरी सौख्याचा संसार करी।।९।।
ऐकूनी भगवंताच्या वचना अर्जून सावध झाला
चुडामणि ज्ञानेश सेवी त्या अमृतमय वचनाला गीता तात्पर्याला
जेथे नर नारायण तेथे भाग्य विजयश्री सतत खरी सौख्याचा संसार करी।।१०।।
भगवान गोपाल कृष्ण महाराज की जय
अनन्यश्चिंतयन्त्यो मां ये जना पर्युपासते

तेषां नित्याभियुक्तानां योग क्षेमं वहाम्यहम्
भगवान गोपाल कृष्ण महाराज की जय
कृष्ण कृष्ण कृष्ण मुरारी नाम हे सुंदर
नाम हे सुंदर स्वरुप हे सुंदर (तीन वेळा म्हणावे)
राधेसहीत श्रीकृष्णाय नम
ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः

श्री

।।उमासुताय नमः।।

।। गीतं शृणु मम।।

गीतं शृणु मम यदुकुलनन्दन।
रुदनं मा कुरु वसुदेव नन्दन।
हे कुलभूषण, हे अघनाशक।
हे सुखदायक, हे वरदायक।
हे विश्वपालक, त्वं प्रिय बालक।
सुखशयनं कुरु श्वःकाल शासक।।१।।
तव तनुस्पर्शः, मम रोमहर्षः।
तव डिम्भलीला मे दर्शनीया।
मुखारविन्दं तव नन्दनीयम्।
वासुकी - शयन, कुरुअद्य शयनम्।।२।।

हे नन्दनन्दन, आनन्दकन्द।
हे सच्चिदानन्द, परमानन्द।
हे विश्ववन्द्य, मथुरेश निन्द्य।
भूतापाशमनाय, कुरु - अद्यशयनम्।।३।।
जो, जो, जो, जो हे श्यामसुंदर।
जो जो जो जो जो जगदीश्वर।
हे रामाग्रज, त्रिदशेन्द्रेश्वर।
शयनं कुरु मम हे कृष्णसुन्दर।।४।।
शं भवतु

रामात्मजः

श्री

।। श्री गणेशाय नमः ।।

मनोहरी विठ्ठलः

चिन्तयामि सन्ततं,विठ्ठलं विठ्ठलम्।
प्रणमामि सन्ततं विठ्ठलं विठ्ठलम्।। विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ
सेव्यमान पुण्डलीकदर्शनाय आगतम्।
कृष्णरुपधारकं इष्टकोपरि स्थितम्।। विठ्ठलं विठ्ठलम्।ऽऽ
पुण्य पण्ढरे स्थितं,अट्टहास पूर्वकम्।
सन्तजनं सेवितं, भक्तवृन्द वन्दितम्।। विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ
विठ्ठलस्य चिन्तनं, सर्व व्याधिहारकम्।
विठ्ठलस्य दर्शनं, सर्व दुःखनाशकम्।। विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ
विठ्ठलस्य विग्रहं, मुदाकरं मनोहरम्।
समस्त लोक रञ्जकं, विचित्र पुण्यवर्धकम्।। विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ

विठ्ठलस्य वीक्षणं, करुणामयं कृपाकरम्।
दासवृन्दकीर्तनं, रोचकं मोहकम्।। विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ
अतः
चिन्तयामि सन्ततं विठ्ठलं विठ्ठलम्।
प्रणमामि सन्ततं विठ्ठलं विठ्ठलम्।
विठ्ठलं विठ्ठलं विठ्ठलं विठ्ठलम्। ऽऽ
शं भवतु

रामात्मजः
डॉ अरविंद जोशी